पाहून काही भक्तांनी ब्रह्मचाऱ्यांना विनंती केली, थोडेतरी खावून घ्या ! परंतु त्यांचे एकच उत्तर होते, ''दादाजी खिलायेंगे तो ही खायेंगे।'' काही वेळाने दादाजींजवळ एकजण एक मोठे टरबूज घेऊन आला. दादाजींनी त्याच्या खांद्यावरून ते टरबूज उचलून फेकून दिले. टरबुजाचे तुकडे-तुकडे झाले. एक तुकडा ब्रह्मचारीजींच्या मांडीवर पडला. तेव्हा दादाजींनी आज्ञा केली, ''इसे खा लो ! तरबूज खाकर तर जाओगे।'' अशाप्रकारे गुरू-शिष्यांचे मीलन झाले. श्री दादाजी महाराजांनी लहान दादाजींचे जप, तप, ध्यान, योग इत्यादी अनेक परीक्षा घेतल्या. एक घटना अत्यंत चमत्कारिक आहे. एके दिवशी दादाजींनी ब्रह्मचारींचे धोतर, कपडे इत्यादी फाडून टाकले, ब्रह्मचारींना नग्न केले, आणि दंडयाने खूप मारले. ते बेशुद्ध झाले. या स्थितीत त्यांना एका खोलीत झोपवून, त्यांच्या अंगावर दादाजींनी घोंगडे पांघरून दिले. खोलीला बाहेरून साखळी लावली. आश्चर्याची गोष्ट ही की, ब्रह्मचारी ३१ दिवस असेच पडून होते. भक्तांनी दादाजींना म्हटले, ''३१ दिन हो गये, वे मर गये होंगे।'' तेव्हा दादाजींच्या आज्ञेप्रमाणे खोली उघडण्यात आली. आश्चर्याची गोष्ट ही की, ब्रह्मचारी जिवंतच होते. श्री दादाजींचा जन्म व मृत्यूवर अधिकार होता, हे यावरून सिद्ध होते.

सन १९२५ पर्यंत श्री दादाजी व लहान दादाजी अनेक लीला दाखवू लागले. दोघेही अंतर्यामी होते. या गुरू-शिष्यांनी जनकल्याणासाठी अनेक कार्ये केली. मोठे दादाजी दंडयाने मारीत, रागाने व शिव्यांनी गोष्टी करीत असत, तर लहान दादाजी प्रेमळपणे व शांतीने. परंतु दोघांच्याही वाणीमध्ये वाचासिद्धी होती. त्यांच्या मुखातून निघालेले शब्द अमृताप्रमाणे होते. त्यांनी म्हटलेले शब्द सत्य होत होते. याकारणास्तव साईखेडा दरबारामध्ये मालगुजार, राजे-महाराजे, जमीनदार, नेते, इंग्रज अधिकारी, गरीब-श्रीमंतांची नेहमीच गर्दी असे.

श्री दादाजी महाराजांची लीला ऐकून महात्मा गांधी, श्री मोतीलाल नेहरू, श्री मदन मोहन मालवीय, महम्मद अली, शौकत अली व श्री जवाहरलाल नेहरू दर्शनासाठी साईखेडा येथे आले. सर्वांनी प्रार्थना केली की, स्वराज्य मिळू द्या. एवढ्यात श्री दादाजींनी जवाहरलालजींकडे इशारा करून म्हटले, ''ए मोड़ा लायक है।'' आणि स्वराज्यासाठी आशीर्वाद दिले.

सन १९२५ मध्ये दादाजी महाराजांनी साईखेडा सोडले. त्यांच्याजवळ दोन फोर्ड कंपनीच्या गाड्या, रथ, भंडाऱ्याची सामग्री होती. ह्या मोटर-गाड्या आजही खंडवा दरबारामध्ये दर्शनासाठी ठेवलेल्या आहेत. श्री दादाजी आपल्या भक्तांसोबत होशंगाबाद, आवळीघाट, इन्दूर, उज्जैन, खेडीघाट इत्यादी ठिकाणी थांबत-थांबत सन १९३० मध्ये खंडवा येथे आले. याच वर्षी मोठ्या दादाजींनी समाधी घेतली, व सम्पूर्ण जबाबदारी लहान दादाजींवर आली.

लहान दादाजीपण भक्तांची दु:खं दूर करू लागले. अनेक भक्तांना आर्थिक, मानसिक, शारीरिक दु:खांतून त्यांनी मुक्त केले, अनेक चमत्कार दाखविले. सम्पूर्ण चमत्कार न देता फक्त एका घटनेचा येथे उल्लेख करीत आहे. सन १९३७ मध्ये लहान दादाजी धुनीवाला राऊंड केसच्या संबंधाने होशंगाबादला गेले होते. श्री जवाहरलाल नेहरू यांच्या दर्शनासाठी येथे आले होते. लहान दादाजींनी आपल्या गळ्यातील हार काढून जवाहरलालजींच्या गळ्यात टाकला व स्वत: त्यांना कुम-कुम टिळा लावला. ते देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यास यशस्वी झाले व आपल्या मृत्युपर्यंत करोडो जनतेचे हृदयसम्राट बनले.

श्री लहान दादाजींनी सन १९४२ मध्ये समाधी घेतली. त्यांचे कोणीही शिष्य नाहीत. खंडवा येथे दोन्ही दादाजींची समाधिमंदिरं आहेत. असंख्य लोक त्यांचे भक्त आहेत. मुंबई, इन्दूर, नागपूर, दिल्ली, जयपूर, जबलपूर, खेडीघाट, बैतूल, चोपडा (जळगाव) इत्यादी ठिकाणी यांची मंदिरे आहेत.

काही वर्षांपूर्वीची एक घटना अत्यन्त चमत्कारिक आहे. श्री दादाजी-मंदिरात सन १९४२ पासून मोटारगाड्या ठेवल्या आहेत. एका भक्ताने ह्या मोटारगाड्यांची साफ-सफाई-रंगकामाची व्यवस्था केली. चमत्कारिक घटना अशी की, गाडी-दुरुस्तीच्या वेळी एका गाडीच्या पेट्रोल-टाकीमधून जवळपास थोडेसे पेट्रोल निघाले. सन १९४२ पासून ठेवलेल्या गाडीच्या टाकीतून पेट्रोल मिळणे हा चमत्कारच आहे. श्री दादाजींनी हा चमत्कार दाखवून सजीवतेचे प्रमाण दिले, आणि म्हणूनच नित्य मी जिवंत जाणा हेचि सत्य, हे खरे आहे.


श्री गजानन महाराज, श्री साईबाबा, व श्री दादाजी महाराज समकालीन होते. सन १९७० मध्ये गजानन महाराज, सन १९१८ मध्ये साईबाबा, आणि सन १९३० मध्ये दादाजी महाराज यांनी समाधी घेतली, यावरून असे वाटते की हे अवतारी पुरुष एक-दुसऱ्याकडे जनकल्याणाचा भार टाकत गेले असावेत.

श्री दादाजी धुनीवाले दरबार, खंडवा येथे प्रत्येक दिवशी पूजा-अर्चना व दिवसातून चार वेळा आरती होत असते. दादाजींच्या जयघोषाने दरबार गुंजून जातो. नैवेद्य, अभिषेक, समाधीला मालीश आणि नवीन चादर चढविण्याचा क्रम प्रत्येक दिवशी चालत असतो. समाधिमंदिरासमोर दादाजींची धुनी अखंड प्रज्वलित आहे. धुनीतील उदीपासून अनेक भक्तांना फायदा झाला आहे. असा विश्वास केला जात आहे की येथे आल्याने व समाधिदर्शनामुळे भक्तांच्या दु:खांचे व संकटांचे निवारण होते, व मनाला शांती मिळते, जीवनमार्गात आलेल्या अडचणी दूर होऊन सफलतेचा मार्ग सुलभ होतो व आपले जीवन सफल होते.

साईबाबांच्या प्रेरणेनेच हा लेख आपणासमोर सादर करू शकलो. त्यांना कोटी-कोटी प्रणाम. दादाजींच्या दरबारात हा जयघोष होत असतो....

**श्री गौरी शंकर महाराज की जय।**
**श्री धुनीवाले दादाजी की जय।**
**श्री हरिहर भोले भगवान की जय।**
**महान नर्मदे, हर, हर, हर॥**

# श्री साई सच्चरित्र
## मराठी गद्यरूपांतर



**'श्री** साईलीला'च्या वाचकांना श्री. पां. शं. भुजबळ ऊर्फ 'साईरंग' महाराज हे नाव सुपरिचित आहे. त्यांचे आध्यात्मिक, विचारप्रवण, संस्कारी लेख 'श्री साईलीला'तून प्रसिद्ध झाले आहेत. त्यांच्या तत्वज्ञानाने, समाजोपयोगी कार्याने, अमूल्य मार्गदर्शनाने प्रभावित झालेले साईभक्त ठिकठिकाणी पसरले आहेत. त्यांनी श्री साईबाबा मंदिर, साईनगर, गोडोली, सातारा येथे बांधलेले सद्गुरू श्री साईबाबा मंदिर, श्री गणेशाई मोफत वाचनालय, श्री साई सांस्कृतिक भवन, श्री साईरंग मार्केट, श्री साईरंग मंगल कार्यालय, मानव विकास मंडळ, त्यांनी लिहिलेली 'श्री साईअमृतानुभव', 'श्री साईरंग स्वाद', 'श्री साईमहिमा', 'हरि ॐ बाबा', 'मनोगत' ही पुस्तके व त्यांच्या संपादकत्वाखाली प्रसिद्ध होत असलेले त्रैमासिक 'श्री साईचिंतन' साईभक्तांना मार्गदीप ठरले आहेत. श्री साईसच्चरिताच्या पारायणाबरोबरच ते सहज-सोप्या भाषेत साईभक्तांना कळले तर त्याचा प्रभाव त्यांच्यावर पडेल व साईभक्त श्री साईबाबांनी श्री साईसच्चरिताच्या द्वारे सांगितलेले तत्वज्ञान आचरणात आणतील, हा विचार मनात आल्यावर श्री. भुजबळ यांनी श्री साईसचरित या ओवीबद्ध ग्रंथाचे गद्यात रूपांतर करण्याचा संकल्प केला. तो श्री साई सच्चरित्र गद्यरूप ग्रंथाने पूर्ण झाला आहे.


या ग्रंथाचे प्रमुख वैशिष्ट्य हे आहे की श्री साईसच्चरितातील प्रत्येक ओवीचे गद्यात रूपांतर करताना ते सर्वसामान्य वाचकाला सहज आकलन होईल अशा मराठी भाषेत दिले आहे. पुस्तकाच्या ५८३ ते ६१५ ह्या पृष्ठांवर श्री साईबाबांची अकरा वचने सविस्तर समजावून दिली आहेत. यामुळे बाबांना ह्या वचनांद्वारे भक्तांना नेमका काय बोध करावयाचा होता, हे कळणे सोपे जाते. जीवनात यशस्वी होण्यासाठी आचरणात आणावयाची अठरा तत्वे पुस्तकाच्या प्रारंभी दिली आहेत. श्री साईसच्चरिताच्या पारायणाबरोबरच ते कळण्याची ज्यांना उत्सुकता आहे त्यांना श्री. पां. शं. भुजबळ यांचे प्रस्तुत पुस्तक फार मोलाची मदत करील.

पुस्तकाचे नाव : **श्री साई सच्चरित्र**
**मराठी गद्यरूपांतर**
अनुवादक : **श्री. पां. शं. भुजबळ**
प्रकाशक : **सौ. सुलोचनाबाई भुजबळ,**
३७७, सोमवार पेठ,
सातारा - २.
पृष्ठसंख्या : ६१६
मूल्य : रु. ९०

# महाराष्ट्र राज्य करावे । जिकडे तिकडे ।।

## श्रीसमर्थांच्या ओजस्वी अभंगांवर आधारित कार्यक्रम-पुस्तिका

## 'श्रीसमर्थ वाणी'



राष्ट्रीय कीर्तनकार, आकाशवाणीवरील प्रथम श्रेणीचे प्रथितयश गायक कलाकार, एच्.एम्.व्ही.चे प्रख्यात संगीत नियोजक श्री. आत्माराम पांडुरंग नारायणगांवकर हे श्रीसमर्थ रामदास स्वामी यांच्या अथांग कार्याचा प्रसार करण्यासाठी श्रीसमर्थांच्या जीवनावर आधारित 'श्रीसमर्थ वाणी' हा ओजस्वी कार्यक्रम ठिकठिकाणी सादर करीत असतात. श्रीसमर्थांच्या राष्ट्रप्रेमाने ओतप्रोत भरलेल्या अभंगांना श्री. आत्माराम नारायणगांवकर यांनी वेगवेगळ्या ताल व रागांमधून समर्पक चाली दिल्या असल्यामुळे त्यातून व्यक्त झालेला भाव श्रोत्यांना भावतो. 'श्रीसमर्थ वाणी' या कार्यक्रमाला श्रोतृजनांचा उत्तरोत्तर उत्तम प्रतिसाद लाभल्यानेच कार्यक्रमाच्या वेळी श्रोत्यांच्या हाती या कार्यक्रमाची छापील पुस्तिका असेल तर कार्यक्रम अधिक परिणामकारक होईल ही कल्पना पुढे आली व 'श्रीसमर्थ वाणी' पुस्तिकारूपानेही साकार झाली. या पुस्तिकेचे संकलन व लेखन श्री. आत्माराम नारायणगांवकर व त्यांची कन्या सौ. मधुवंती पेठे यांनी केले आहे. श्री समर्थ रामदास स्वामींचं जीवनकार्य हे विशाल सागरासारखं आहे. त्यांनी मरगळलेल्या समाजात चैतन्य निर्माण केले. त्यांच्या अभंगांतून त्यावेळच्या भयानक परिस्थितीचा अंदाज घेता येतो. जुलमी सत्तेचे जोखड झुगारून देण्यासाठी त्यांनी जनजागृतीची मोहीम हाती घेतली. मर्यादापुरुषोत्तम राम व बलशाली हनुमानाचा आदर्श जनतेसमोर असावा म्हणून त्यांनी ठिकठिकाणी राम व हनुमानाच्या मूर्तींची स्थापना केली. तेथे बलोपासनेसाठी आखाडे निर्माण केले, मठस्थापना केली, जेणेकरून तरुण तेथे येऊन बलसंपन्न होतील व अन्यायाच्या प्रतिकारार्थ उभे ठाकतील. महाराष्ट्र धर्माची ज्यांनी अखंड काळजी वाहिली त्या समर्थांची **''अखंड सावधान असावे''** ही सूचना अत्यंत बोलकी आहे व ती समर्थांच्या दूरदृष्टीची प्रचिती देणारी आहे. महाराष्ट्र धर्माबद्दल त्यांना किती तळमळ होती ती त्यांनी संभाजीराजांना त्यांच्या राज्याभिषेकसमयी पाठविलेल्या पत्रातून व्यक्त होते. ते लिहितात....

**''आहे तितुके जतन करावे ।**
**पुढे आणिक मेळवावे ।**
**महाराष्ट्र राज्य करावे ।**
**जिकडे तिकडे ।।**
**श्रीशिवरायास आठवावे ।**
**जिवित तृणवत् मानावे ।**
**इहलोकी परलोकी उरवावे ।**
**कीर्तिरूपे''** ।।

(पृष्ठ क्र. ५६ वर)

# शास्त्रशुद्ध उपासना व फलदायी मंत्र

## श्रीपाद प्रकाशनाची उपासकांना उपयुक्त पुस्तिका

**प्र**त्येक आस्तिक मानवी जीव कोणत्या-ना-कोणत्या देवतेची उपासना करीत असतो; मग त्या देवतेची उपासना घरात परंपरेने चालत आलेली कुलदेवतेची असेल किंवा इच्छापूर्तीसाठी एखाद्या अन्य देवतेची असेल. नास्तिक माणूसही कल्पनातीत अनुभव आल्यानंतर विश्वात्मक गूढ शक्ती मान्य करून ज्या देवतेचा अनुभव त्याला येतो त्या देवतेची उपासना तो करू लागतो. आपण करीत असलेल्या देवतेची उपासना जर शास्त्रोक्त पद्धतीने केली तर तिचा प्रभाव अधिक पडतो, असा या क्षेत्रातील महान साधकांचा अनुभव आहे. ही बाब लक्षात घेऊन श्री. वि. के. फडके लिखित व श्रीपाद प्रकाशन, २७९१ ए, वरूणतीर्थ, कोल्हापूर - ४१६ ०१२ द्वारा प्रकाशित श्रीगणेश उपासना, श्रीदत्त उपासना, श्रीदेवी उपासना, श्रीकृष्ण उपासना, श्रीनृसिंह उपासना ही छोटेखानी पुस्तके त्या त्या देवतांच्या उपासकांना अत्यंत उपयुक्त आहेत.




'श्रीगणेश उपासना' या पुस्तिकेत श्री. वि. के. फडके यांनी श्रीगणेशाच्या उपासनेने मनातील इच्छा कशा पूर्ण होतात, हे सांगताना पुस्तिकेच्या प्रारंभी काही महान गणेशोपासकांचे विलक्षण अनुभव नमूद केले आहेत. सर्व कार्यारंभी प्रथम श्रीगणेशालाच वंदन का केले जाते, तो कोण आहे, तो विघ्नहर्ता व विघ्नकर्ता कसा आहे, त्याचे पुराणांतील वेगवेगळे स्वरूप कसे आहे, त्याच्या मुख, नेत्र, दंत, सोंड, हात या अवयवांतील विविधता, त्याच्या स्वरूपाप्रमाणे त्याची उपासना कशी केली जाते व त्यापासून कोणती फलप्राप्ती होते यांची थोडक्यात, परंतु महत्वपूर्ण माहिती प्रस्तुत पुस्तिकेत देण्यात आली आहे. श्रीगणेशाच्या पंचोपचार, षोडशोपचार पूजेत कोणते पूजा-साहित्य असावे व ती पूजा कशी करावी, श्रीगणेशाची नावे व त्यांचा जप कसा करावा, श्रीगणेश अथर्वशीर्षाचे पठण कसे करावे, श्रीगणेश उपासकांनी कोणते नियम पाळावेत, श्रीगणपतीची जागृत देवस्थाने व त्यांचा महिमा याबद्दलची माहिती श्रीगणेशाची उपासना करणाऱ्यांना अत्यंत उपयुक्त ठरणारी आहे.

इंग्रजी शिक्षणामुळे हिंदूंचे आचार नष्ट होऊ लागले व विचारातही भ्रष्टता आली. धर्माबद्दल लोक उदासीन होऊ लागले. यावर उपाय म्हणून लोकमान्यांनी १८९३ मध्ये पुण्यात सार्वजनिक गणेशोत्सव सुरू केला. या उत्सवाच्या माध्यमातून लोकमान्यांना राष्ट्रीय जागृतीचे महान कार्य साधून जनजागरण घडवायचे होते, असे नमूद करून सदरच्या पुस्तिकेच्या लेखकाने आजच्या सार्वजनिक गणेशोत्सवाला केवळ जागरणाचेच जे स्वरूप आले आहे त्याबद्दल खेद व्यक्त केला आहे व त्यासाठी या सार्वजनिक गणेशोत्सवाबाबत नव्याने विचार करून त्यातील त्रुटी दूर करण्याचा प्रयत्न करण्याचे कार्य आता कुणीतरी जबाबदार व्यक्तीने हाती घेणे फार फार आवश्यक आहे, असे कळकळीचे आवाहन केले आहे.

पुस्तिकेच्या शेवटी गणपतीसंबंधी सर्वसामान्यपणे जे प्रश्न उपस्थित केले जातात त्यांची उत्तरे 'श्रीगणेश प्रश्नोत्तरी' या शीर्षकांतर्गत देण्यात आलेली आहेत. ती सर्वसामान्यांच्या गणपती विषयक ज्ञानात भर घालणारी आहेत.

पुस्तिकेचे नाव : **श्रीगणेश उपासना**
पृष्ठसंख्या : ४७
मूल्य : रु. १२




श्रीदत्ताविषयीची समग्र माहिती अनेक ऋषी-मुनींनी, संत-महंतांनी, विद्वान पंडितांनी, थोर लेखकांनी मोठमोठ्या ग्रंथांतून, पुस्तकांतून विस्तृतपणे दिलेली आहे. श्री. वि. के. फडके यांनी 'श्रीदत्त उपासना' या पुस्तिकेत भाविकांना आवश्यक असलेली महत्त्वपूर्ण माहिती संक्षिप्त रूपात दिली आहे. या पुस्तिकेत लेखकाने पुराणकाळातील, तसेच कलियुगातील दत्ताचा महिमा वर्णन केला आहे. त्याचप्रमाणे श्रीदत्तात्रय हे गुरूंचे गुरु

कसे आहेत, श्रीदत्ताचे सोळा अवतार यांची थोडक्यात माहिती करून दिली आहे.

दत्तसंप्रदायात धर्मभेद, जातीभेद, वर्णभेद यांना बिल्कुल थारा नाही. त्यामुळे 'श्रीदत्त उपासना' ही पुस्तिका वाचल्यावर वाचकांच्या मनात भेदाभेदाच्या किंतुलाही स्थान राहणार नाही. दत्ताच्या अलिकडच्या चार अवतारांविषयीचे वर्णन पुस्तिकेत आहे. अनेक प्रसिद्ध दत्तक्षेत्रांचे वर्णन व त्यांचा प्रभाव विशद केला आहे. श्रीगुरुचरित्राचे महत्त्व नमूद करून पारायण काळात पाळावयाच्या नियमांचे वर्णन करण्यात आले आहे. विशेष महत्त्वाची गोष्ट म्हणजे दत्तउपासनेविषयीचे दिव्य मंत्र व त्यांचे विलक्षण अनुभव दिल्यामुळे उपासकांना त्यांचा अनुभव घेता येईल. त्यासाठी दत्तमंत्रांचा जप कसा करावा व त्यासाठी कोणती पुस्तके संदर्भासाठी घ्यावीत, याबद्दलची पुस्तिकेतील माहिती अत्यंत उपयुक्त आहे. दत्तस्तोत्रे-मंत्र-दत्तमाला यांविषयी मोलाची माहिती दिलेली आहे. शेवटी दत्ताची आरती देऊन 'श्रीदत्त उपासना' या पुस्तिकेचा समारोप केला आहे.

सारांशाने श्री. वि. के. फडके यांनी लिहिलेल्या या पुस्तिकेबद्दल असे म्हणता येईल की या छोटेखानी 'श्रीदत्त उपासना' पुस्तकात थोडक्यात, परंतु सर्वव्यापक माहिती देण्यात आली असून सद्याच्या घाईगर्दीच्या काळात ज्यांना दत्ताविषयीचे मोठाले ग्रंथ वाचता येणे शक्य नाही, परंतु दत्ताविषयी जाणून घेण्यास जे उत्सुक आहेत त्यांना व साधक-उपासकांनाही श्रीदत्त मंत्र-स्तोत्रांचा शास्त्रशुद्ध उपयोग करून त्यांचा अनुभव घेण्यासाठी 'श्रीदत्त उपासना' ही पुस्तिका मोलाची कामगिरी बजावू शकेल.

पुस्तिकेचे नाव : **श्रीदत्त उपासना**
पृष्ठसंख्या : ४४
मूल्य : रु. १२

## श्रीदेवी उपासना



**वि. के. फडके**

श्रीपाद प्रकाशन

'श्रीदेवी उपासना' या पुस्तिकेत श्री. वि. के. फडके यांनी देवांनाही थरकाप करायला लावणाऱ्या महिषासुर दैत्याचा नाश करण्यासाठी विलक्षण तेजस्वी, सामर्थ्यशाली अष्टभुजादेवीची निर्मिती कशी झाली व तिने नऊ दिवस, नऊ रात्र अखंड युद्ध करून महिषासुराला कसे ठार मारले, याची पौराणिक कथा थोडक्यात दिली आहे. ही दैवीशक्ती, आदिशक्ती म्हणजेच महिषासुरमर्दिनी, जगदंबा, चामुंडा, कालिका, दुर्गा, भद्रकाली. नावे जरी विविध असली तरी मूळ शक्ती महामाया एकच आहे. अलग अलग कार्यासाठी तिला वेगवेगळी रूपे धारण करावी लागली. या शक्तीची उपासना वेदकालापासून चालत आलेली असल्याचे नमूद करून आजच्या मरगळलेल्या समाजात चैतन्य निर्माण करण्यासाठी तिची मनोभावे पूजा-अर्चा, आराधना-उपासना करण्यास प्रस्तुत पुस्तिकेच्या लेखकाने सांगितले आहे. देशातील ५२ शक्तिपीठांपैकी महाराष्ट्रातील कोल्हापूरची अंबाबाई, तुळजापूरची भवानी, माहूरगडची रेणुका, वणीची सप्तश्रृंगी या साडेतीन पीठांची थोडक्यात महत्त्वाची माहिती दिलेली असून महाराष्ट्रातील अन्य प्रसिद्ध देवींच्या स्थानांचा उल्लेख आहे. देवीउपासकांचा महान, विलक्षण प्रभावी ग्रंथ 'श्री दुर्गासप्तशती'चे आगळे वैशिष्ट्य विशद करून, त्यातील विशेष मंत्र, स्तोत्रं, सूक्त नमूद करून त्यांचा प्रभाव वर्णन केला आहे. या संबंधाने काही महान देवीउपासकांचे आश्चर्यकारक अनुभवही देण्यात आले आहेत. नवार्ण मंत्राला सप्तशतीत फार महत्त्वाचे स्थान असल्यामुळे त्यावर अधिक भर देण्यात आला आहे. कारण हा मंत्र त्रिगुणात्मक शक्तीचे रूप आहे. या त्रिगुणात्मक ब्रह्मस्वरूप शक्तीने सर्व चराचर उत्पन्न केले, त्याच्या स्थितीचे कार्यही हीच ब्रह्मस्वरूपाशक्ती पार पाडत असून त्याचा लयही हीच ब्रह्मस्वरूपाशक्ती करणार आहे. इतर सर्व देव तिचा अंश आहेत. म्हणूनच नवार्ण मंत्राने या मूळ आदिमायेला आळवले की ते अन्य देवतांनाही आळवल्यासारखेच आहे. पुस्तिकेतील, मंत्र केव्हा ग्रहण करावा, गुरूकडून तो कसा घ्यावा, गुरू नसल्यास तो ग्रहण कसा करावा, तो शास्त्रशुद्ध कसा जपावा, हवन कसे करावे, 'श्रीदुर्गासप्तशती'चा पाठ करताना कोणत्या गोष्टी लक्षात ठेवाव्यात, कोणत्या कामनापूर्तीसाठी सप्तशतीतील कोणता मंत्र प्रभावी आहे, देवीउपासनेचे विविध प्रकार, संस्कृत कळत नसल्याने 'सप्तशती' पोथी वाचण्यास कठीण वाटत असल्यास मराठीतील देवीमाहात्म्य, ललिता सहस्त्रनाम, कुंकुमार्चन, घटस्थापना व नवरात्र इत्यादी माहिती देवीउपासकांना अत्यंत उपयुक्त आहे. 'श्रीगणेश उपासना' या पुस्तिकेतील 'गणेश उपासना-प्रश्नोत्तरी'प्रमाणे याही पुस्तिकेत 'देवी उपासना-प्रश्नोत्तरी' देण्यात आली आहे. पुस्तिकेच्या शेवटच्या भागात 'अथ वंश वृद्धिकरं वंशकवचम्।' '॥ श्रीदुर्गाष्टोत्तर-शतनामस्तोत्रम् ॥', 'क्षमाप्रार्थना', 'देवीची आरती' यांचा समावेश आहे.

पुस्तिकेचे नाव : **श्रीदेवी उपासना**
पृष्ठसंख्या : ४७
मूल्य : रु. १२

'श्रीकृष्ण उपासना' या पुस्तिकेत श्रीकृष्णाचे वर्णन करताना या पुस्तिकेचे लेखक श्री. वि. के. फडके यांनी श्रीकृष्ण हा पुरुषोत्तम आहे, पूर्णावतार आहे, साक्षात् परब्रह्म आहे, अक्षरवाङ्मय गीतेचा उद्गाता, सत्याचा वाली, सुष्टांच्या रक्षणासाठी दुष्टांचा संहारकर्ता आहे, चतुर, शूर, धाडसी, आदर्श, सर्वगुणसंपन्न आहे, अशी विशेषणे योजली आहेत. ज्ञानेश्वर माऊलींनी सांगितल्याप्रमाणे तो षड्गुणांनी

# श्रीकृष्ण उपासना




वि. के. फडके

युक्त असल्याने तो 'भगवान' आहे. त्याच्यासारखे संपन्न व्यक्तिमत्व अन्य दुसरे नाही. त्याचे मनमोहक रूप आकर्षून घेणारे आहे. महाभारतातील मध्यवर्ती व्यक्तिरेखा म्हणून श्रीकृष्णाकडेच बोट दाखविले जाते. धूर्त, मुत्सद्दी, राजनीतीज्ञ, व्यवहारज्ञानी, बुद्धीमान, दूरदर्शी, आत्मज्ञानी, वैरागी, पूर्णकाम, निराग्रही, ऐश्वर्यसंपन्न, सामर्थ्यशाली अशा व्यक्तिमत्वामुळेच महाभारतात पांडवांना कौरवांविरुद्ध विजय मिळविता आला. म्हणूनच लेखक म्हणतो की कृष्ण उणे महाभारत बरोबर शून्य. परिपूर्ण व्यक्तिमत्व असलेल्या या श्रीकृष्णाच्या जन्माची कथाही विलक्षण आहे. ती संक्षिप्त रुपात देवून लेखकाने सदरच्या पुस्तिकेत श्रीकृष्णाशी संबंधित स्थानांची, मंदिरांची, त्यांच्या प्रसिद्ध भक्तांची ओळख करून दिली आहे. पुस्तिकेचा उद्देश श्रीकृष्णाची विधिवत उपासना कशी करावी हा असल्याने त्याकडे विशेष लक्ष पुरविण्यात आले आहे. वेगवेगळ्या इच्छांच्या पूर्तीसाठी, श्रीकृष्णाच्या प्रत्यक्ष दर्शनासाठी प्रभावी मंत्र देण्यात आले आहेत. मंत्रांच्या संदर्भात काही व्यक्तींना आलेले अनुभव मंत्रांचा प्रभावीपणा सिद्ध करतात. परंतु प्रयत्नांबरोबर मंत्रजप करताना तो शास्त्रशुद्धरीत्या करणे आवश्यक असल्याचे लेखकाने आवर्जून सांगितले आहे. भगवान श्रीकृष्णाच्या कृपेसाठी वीसा यंत्राचे चित्र देण्यात आले असून त्याच्या पूजनाविषयीची माहिती दिलेली आहे. रोज संपूर्ण श्रीमद्भगवद्गीतेचा एकदा पाठ करणाऱ्यास कशाचीही कमतरता भासत नाही, परंतु तो पाठ शुद्ध स्वरूपात व मोठ्याने करावयास हवा, त्याचप्रमाणे श्रीकृष्णाच्या कृपाप्राप्तीसाठी श्रीमद्भागवत ग्रंथ नित्य वाचनात ठेवावा, असे मार्गदर्शन लेखकाने प्रस्तुत पुस्तिकेत केले आहे.

पुस्तिकेचे नाव : **श्रीकृष्ण उपासना**
पृष्ठसंख्या : ३५
मूल्य : रु. १२

# श्रीनृसिंह उपासना



वि. के. फडके

श्रीपाद प्रकाशन

'श्रीनृसिंह उपासना' या पुस्तिकेत श्री. वि. के. फडके यांनी प्रारंभी 'अवतार' या संकल्पनेचा अर्थ समजावून दिला असून परमात्म्याची भूतलावर अवतार धारण करण्यामागची भूमिका विशद केली आहे. भगवंताचे मत्स्य, कूर्म, वराह, नृसिंह, वामन, परशुराम, राम, कृष्ण, बौद्ध, कलंकी हे दहा अवतार असून यांपैकी केवळ कलंकी अवतार व्हायचा शिल्लक आहे. सर्वसामान्यांना भगवंताचा चौथा अवतार नृसिंह याच्याबद्दल त्याने हिरण्यकश्यपूचा वध कसा केला, एवढीच माहिती ठाऊक आहे. श्रीनृसिंह हे अनेकांचे कुलदैवत असून त्याची उपासना विविध प्रकारांनी केली जाते व तिचा अनुभवही येतो; तसेच श्रीनृसिंहाची जागृत स्थाने, श्रीनृसिंहाच्या मूर्तीतील भिन्नता यांविषयीची पुस्तिकेतील माहिती सर्वसामान्य बहुतेक वाचकांना नवीन आहे. या पुस्तिकेतील श्रीनृसिंह उपासना कशी करावी, श्रीनृसिंह मंत्र-स्तोत्रं, सिद्ध नृसिंह यंत्र, श्रीनृसिंह सुदर्शन महाचक्र व त्यांचा प्रभाव ही विशेष माहिती श्रीनृसिंह उपासकांना अनुभव घेण्याकरिता निश्चितच उपयोगी ठरेल. याबरोबरच श्रीनृसिंहाची कहाणी - श्रीनृसिंह पंजरस्तोत्र, श्रीनृसिंहाच्या आरत्या यांचा पुस्तिकेच्या अखेरच्या भागात समावेश आहे.

पुस्तिकेचे नाव : **श्रीनृसिंह उपासना**
पृष्ठसंख्या : ३९
मूल्य : रु. १२

---

(पृष्ठ क्र. ५३ वरून)

प्रस्तुत पुस्तिकेचा समारोप करताना श्रीसमर्थांच्या या तत्वज्ञानाची, कार्यप्रणालीची आजच्या बिकट काळात अत्यंत गरज असल्याचे प्रतिपादन लेखकाने आवर्जून केले आहे. श्रीसमर्थांचे महाराष्ट्र धर्माला समर्पित धगधगते जीवन श्रोत्यांसमोर, वाचकांसमोर सादर करणे व तेही थोडक्या शब्दांत ही खचितच सोपी गोष्ट नव्हे. ती श्री. आत्माराम नारायणगांवकर यांना साध्य झाली, ते श्री. नारायणगांवकर यांना लाभलेल्या श्रीसमर्थांच्या आशीर्वादाचे फळ म्हणावे लागेल.

'श्रीसमर्थ वाणी' या कार्यक्रमाला उपस्थित राहणाऱ्या श्रोत्यांनी, समर्थभक्तांनीच केवळ नव्हे, तर महाराष्ट्रावर प्रेम करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीने ही पुस्तिका एकदा नव्हे, संग्रही ठेवून वारंवार वाचावी, त्यातून स्फूर्ती घ्यावी, एवढी या पुस्तिकेची मौलिकता आहे.

पुस्तिकेचे नाव : **॥ श्रीसमर्थ वाणी ॥**
लेखन व संकलन :
**आत्माराम पां. नारायणगांवकर व सौ. मधुवंती सुहास पेठे**
प्रकाशक : **चंद्रिका प्रकाशन,**
बंगला नं. १, जसवंत बाग,
रुणवाल पार्क, चेंबूर नाका,
चेंबूर, मुंबई - ४०० ०७१.
पृष्ठसंख्या : २०
मूल्य : रु. १२

# ॥ 'साई' नामस्मरणाचे सामर्थ्य ॥

- श्री. प्रभाकर कोळमकर
बोरिवली (पूर्व), मुंबई.

'साई' हा शब्द 'ॐ प्रणव' सिद्ध मंत्र, आरोह अवरोहादि स्वर-मात्रांनी भरलेला आहे. 'साई' उच्चाराने पापनाशक वलये-वर्तने वातावरणात निर्माण होतात व ती दुष्ट, दूषित कुविचारांपासून भक्ताच्या आत्म्याला, मन-विचारांना मुक्त ठेवतात.

'साई' शब्दाची रचना, अर्थ, उच्चार पुढीलप्रमाणे प्रेरित आहे, प्रेरणादायक आहे -

१. सा + आई = ती सद्गुरू (साई) माऊली = सर्वांची आई.

२. 'साई' म्हणजे सामर्थ्य देणारी.

सा + आई = जगन्माता आणि पिता होय.

३. स: + आ + आई = विश्व-पोकळीत काश, म्हणजे कलश (आत्मानंदाचा) दाखविणारा सद्गुरू.

४. 'साई' म्हणजे साक्षात् मार्ग दाखविणारा सद्गुरू.

५. 'साई' म्हणजे समता, सामर्थ्य, साधुत्त्व देणारी साईमाऊली.

६. 'साई' म्हणजे सर्वार्थाने समभाव साधणारा सामर्थ्यवान सद्गुरू.

७. साई म्हणजेच सा+इ+ई -

स्वर-शब्दांचा-अक्षरांचा-साक्षात्कार, समन्वय साधणारा - घडविणारा - सुशील, सुमधुर, चैतन्यदायी उच्चार, जो उच्चार (स्वर-शब्द-वर्ण-अक्षरांचा उच्चार) शरीरातील भाव-भावना-विचारांना चैतन्यमय शुद्धत्त्व देणारा वातावरणातील पवित्र शब्दोच्चार होय.

'साई' शब्द मन, हृदय, आत्मा, शरीर यावर पवित्र संस्कार घडवितो. 'साई' शब्दाच्या सतत उच्चाराने वातावरणात अनेक पवित्र वलये निर्माण होतात. यामुळे दुष्ट वासना, विचार-कृती पवित्र आत्म्याला स्पर्शूच शकत नाहीत.

'साई' आणि 'सोहम्' शब्दांत साधर्म्य आढळते. स: अहम् म्हणजे तो (ईश) मी (परम-आत्मा) होय. म्हणजेच मी-आत्मा त्या दयाघन प्रभूचा अंश होय. परम ईश, म्हणजेच 'साई' असाही अर्थ येतो.

साऽई.... साऽऽई.... साऽऽऽई असा उच्चार करताना (नाम-स्मरण करताना) साईसा.... साईसा.... ईसा.... म्हणजेच साई-ईशा असाही अर्थ, ध्वनी येतो. 'साई' म्हणजेच ईश होय. म्हणजेच तो स्वानंदात - ब्रह्मानंदात समरसलेला आत्मा-जो ईशठायी लीन झालेला आहे असा आत्मा !

साईसा.... असा मंत्रोच्चार (शब्दोच्चार) केला तर तो साई, तो ईश ज्याच्या चरणी आत्मा विनित झाला आहे असा ईश. परमेशाच्या चरणी लीन झालेला - स्वरूपाच्या स्वानंद समाधीत समरसलेला अंतरात्मा नेहमीच साई-परमेशाच्या ठायी लीन असतो.

साई.... सा.... ई.... सा....
साऽई.... साऽऽईऽऽसाऽऽ
सा....

अशा श्वसनातून (नाक आणि छातीच्या पोकळीतून वाहणाऱ्या वायुची स्पंदने) आवर्तन घेणाऱ्या 'साई' शब्द-मंत्रातून व्यक्त होणारे वात-वायु-तरंग सर्व परिसरात शुद्ध, पवित्र भाव-भावना, विचार प्रसृत करतात आणि यामुळेच 'साई' महाशब्दाचा अविरत, सातत्याने स्मरण करणाऱ्या भक्ताला संपूर्ण चैतन्यमय शक्तीचा सतत साक्षात्कार घडत असतो.

सतत 'साई.... ईसा.... ईसाई.... साई' असा नामघोष होत असताना 'ईसा ईसाई' अशा कोमल-मृदु स्वर-व्यंजनांची आवर्तने-वलये वातावरणात पसरत असतात आणि ध्वनी-वात-वलयातूनच परमेश्वर परमईश साईमहाराजांच्या पवित्र 'साई' महाशब्द-मंत्राचे सतत नामस्मरण घडत असते, चित्तशुद्धी होत असते व भक्त-मनाला चैतन्यमय चिदानंद प्राप्त होत असतो.

'सा....ईश....सा....आई....साई....'
'सा....आई....ईस....' अशा ध्वनि, प्रतिध्वनीत लहरी शब्द-स्वर-आरोह-अवरोह-मृदु अक्षर-मंत्रातून सतत निर्माण होत असतात. याचा अर्थ -

तो (अविनाशी, वायुरूप आत्मा) 'ईश' मीच आहे.

तो ईश माझी आई आहे.

तो ईश माझा अंश, म्हणजे माझी आई, म्हणजे मीच आहे.

तो ईश साई माझी आई व पिताही आहे.

तो साई ईश-साक्षात् माझाच आत्मा आहे.

तो (आत्मा, अदृश्य तेज) ईशमय आहे.

माझा आत्मा 'साई' ईशाचाच एक अविभाज्य अंश-तेज आहे.

हा सर्वसापेक्ष साधुत्त्व साक्षात्कार, अनुभूती 'साई' मंत्राच्या सतत उच्चार-सहवासातून उमटलेल्या ध्वनी-शब्द-स्वर, वायुलहरीतून भक्ताच्या सभोवताली, शरीराभोवती एकप्रकारचे सात्त्विक, चैतन्यमय आवरण, कवच तयार होत असते व ते 'साई'मंत्र-नाम-स्मरणाचे कवच, कुंडलच सर्व काळी, सर्व स्थळी भक्ताचे संरक्षण करीत असते.

साईनामाचा महिमा वर्णावा किती याला अंत नाही. साईनामाच्या गुणवर्णनास शब्द-सामर्थ्य अपुरेच आहे. 'विठ्ठल.... विठ्ठल....' नामस्मरणाने ज्ञानोबा माऊली, तुकाराम, चोखोबा, गोरोबा, नामदेव, जनाबाई इत्यादी संत-भक्त-मंडळी उद्धरून गेली आहेत, याचा साक्षात् पुरावा आपल्या

भक्त-संत-साहित्यात आहेच. तसेच केवळ 'साई'नाम-जपाने अनेक उद्धरले व पुढेही उद्धरतील असा पुरावा, सिद्धान्त अण्णासाहेब दाभोलकरांनी श्री साईसत्‌चरितात जागोजागी दिला आहे -

नमस्कारातील 'नाम-महिमा' -

**बाबा हे शामराव येथेच असती ।**
**दक्षिणेऐवजी नमस्कार देती ।**
**हेच पंधरा रूपये म्हणती ।**
**बाबांप्रती अर्पावे ।।९२।।**

- अ. १९

नाम-जपाविषयी साईचरित्रकार आश्वासन देतात -

**जेथे रामनामाचे गर्जन ।**
**फिरे तेथे विष्णूचे सुदर्शन ।**
**करी कोटी विघ्नांचे निर्दळण ।**
**दीनसंरक्षण नाम हे ।।१८६।।**

- अ. १९

भल्या भल्या विद्वान कोट्याधिशांना, तपस्वीजनांना मोहविणारा हा प्रपंचाचा फापटपसारा अत्यंत मायावी आणि कपटी आहे. म्हणूनच साईचरित्रकार सावध करतात -

**सोडूनिया लाख चतुराई ।**
**स्मरा निरंतर 'साई साई' ।**
**'बेडा पार' होईल पाही ।**
**संदेह कांहीं न धरावा ।।१३५।।**

- अ. १०

आणि कळकळीने आर्जवतात -

**हे नाहीत माझे बोल ।**
**असती साईमुखींचे सखोल ।**
**मानूं नका हो हे फोल ।**
**याचे ते तोल करूं नका ।।१३६।।**

- अ. १०

केवळ मरा.... मरा.... मराम.... रामरा.... असे सातत्याने नाम (रामनाम) स्मरत 'वाल्या कोळ्याचा' 'वाल्मिकी मुनी' झाला, हे आपणास माहीत आहे. नारद मुनींनी 'राम.... राम....' म्हण, असे त्याला सांगितले व वाल्या कोळ्याने दृढनिश्चयाने नारद मुनींना गुरुस्थानी मानून 'राम' या मंत्राचा सतत उच्चार करून सर्व ब्रह्मज्ञान मिळविले आणि 'रामायण' हा महान काव्य-ग्रंथ निर्माण झाला. नामजपाच्या महान सामर्थ्याचे हे उत्तम उदाहरण आहे.

'राम' नामस्मरणाची अक्षरे उलटी स्मरूनदेखील वाल्या कोळी महान मुनीपदास पोहोचला असा पुरावा साईचरित्रकार पूर्ण आत्मविश्वासाने देतात -

**केवढी या नामाची महती ।**
**वर्णिलीसे संतमहंती ।**
**काय म्या पामरें ती वानावी किती ।**
**स्वरूपप्राप्ती येणेनी ।।१८१।।**

**ही दो अक्षरे उलटी स्मरला ।**
**तो कोळी वाटपाडयाही उद्धरला ।**
**वाल्याचा वाल्मीक होऊनि गेला ।**
**वाक्सिद्धी पावला नवलाची ।।१८२।।**

- अ. १९

आणि पुढे अध्याय २२, ४० व्या ओवींत श्री साईभक्त दाभोलकर अतिविनयाने साईनाम-जपाचे महत्त्व सांगतात -

**असोत हीन दीन बापुडी ।**
**वाढेल साईकथेची आवडी ।**
**जपता साईनाम हरघडी ।**
**लावील परथडी साई त्या ।।४०।।**

राम = र् + अ + आ + म् + आ = या शब्दात र् आणि म् ही दोन मृदु व्यंजने आहेत व तीन स्वर आहेत.

साई = स् + अ + आ + ई = या शब्दात स् एक मृदु व्यंजन व तीन स्वर आहेत.

संख्याशास्त्राप्रमाणे चार किंवा पाच व्यंजनस्वरांनी युक्त असलेला शब्द पठणास अत्यंत सोपा, सरळ व चैतन्यदायी असतो. त्याचे सुपरिणाम शरीर, बुद्धी, मन यावर घडतात. ईश्वराच्या सतत सान्निध्यात हे शब्द (नाम-स्मरण) नेत असतात. म्हणून आधुनिक काळात 'साई' शब्दाचे सतत पठण (स्मरण) अंतर्मनात (किंवा बाह्य उपचारात मोठ्याने) केल्यास भक्ताला पूर्ण मन:शान्ती मिळते.

आपल्या बोलीभाषेतील शब्दांचे अचूक ज्ञान झाल्यास, ते शब्द सतत आपल्या स्मरणात राहिल्यास, त्यांचे सतत स्मरण अंतर्मनात - मनातल्या मनात होत राहिल्यास 'साई'भक्ताला साईमहाराज साक्षात् रूपाने सतत संरक्षण देत असतात आणि म्हणूनच श्री साईचरित्रकार म्हणतात - लिहितात -

**मग जो गाई वाडेकोडे ।**
**माझे चरित्र माझे पवाडे ।**
**तयाचिया मी मागे पुढे ।**
**चोहीकडे उभाचि ।।१२।।**

- अ. ३

मनाच्या मलीनतेला दूर करायला लावणारा साबण उपलब्ध नाही, पण साईमहाराजांनी मात्र आपल्याला 'साई' मंत्राचा महान साबण दिलेला आहे. आपण भक्तांनी जर सतत चिंतन-मनन-स्मरण करून 'साई' शब्दाचे सतत स्मरण ठेवले तर अनेक कार्यात त्यांना श्रद्धा-सबुरीने उच्च यश प्राप्त होत असते. भक्ताची मानसिक अवस्था स्थिर आणि उच्च राहते, सहनशक्ती वाढते. संकटकाळी भक्त स्थिर राहतो. संकट सहन करतो. 'साई' नामस्मरणाने मनावरील ताण नाहीसा होतो व शरीर-मन हलके-फुलके वाटते, शरीरातील जडत्व नाहीसे होते, चैतन्यमय कार्यक्षमता वाढते, एकाच वेळी अनेक कामे सहन करण्याची ताकद, एकाग्रता वाढते.

'साऽऽ' म्हणताना श्वास नाकाने आत घ्यावा. नंतर 'ईऽऽ' म्हणताना श्वास तोंडातून सोडावा. सतत नामस्मरणाने ही क्रिया आपोआपच घडते व तोंडातून शरीरात (छातीत) कोंडलेला वायु आपोआप बाहेर येतो. हा वायुच शरीरातील दूषित द्रव्ये बाहेर फेकतो व मन-शुद्धीस मदत करतो, मन चैतन्यपूर्ण आनंदमय करतो, त्रासिकपणा, चिडचीड कमी होते, स्वभाव उदार बनतो. स्वभावात लीनता-नम्रता येते, ती केवळ 'साई' नामस्मरणानेच !

काही काळाने साईभक्ताला असा अनुभव येतो की ही नामस्मरणाची-उच्चारणाची सवयच आपोआप मंत्रोच्चार (शब्दोच्चार) करीत असते. आपल्या अंतर्मनातून आपोआप नामस्मरण घडत असते. आपल्या अंतरातील 'साई-ईश'च हे नामस्मरण करीत असतो. याचा असा

अनुभव श्रद्धा-सबुरीपूर्वक दृढ, चिरंतन साईनाम जपणाऱ्या साईभक्ताला आपोआप येत असतो. अनुभवासारखा गुरु नाही, असे म्हणतात, मग 'साई' नाम-स्मरणासारखा सद्गुरू नाही, असेच म्हणावे लागेल.

श्री बाबा देहधारी असतानाही त्यांनी आपल्या परम भक्तांना 'नाम-महिमा' सांगितला होता आणि देहत्यागानंतरही त्यांनी नाममहिमाचे महत्त्व पटवून दिले आहे, असे श्री साईचरित्रकार आवर्जून सांगत आहेत व म्हणूनच ते बाबांचे शब्द स्मरणपूर्वक लिहितात -

**....मात्र माझे करा स्मरण।**
**विश्वासयुक्त अंत:करण।**
**ठेवा करा निष्काम भजन।**
**कृतकल्याण पावाल ॥१०८॥**

- अ. २५

आणि पुढे हेमाडपंत - श्री साईचरित्रकार निर्णयपूर्वक निर्वाळा देतात - ....वादावादी-बाष्कळ बडबड करण्यापेक्षा हे गुरुराया, तू 'नामाचा छन्द' आम्हाला लाव -

**वादावादी इतर अवकळा।**
**कृपाबळे समूळ निर्दळा।**
**रसनेस लागो नामाचा चाळा।**
**सुनिर्मळा साईराया ॥११७॥**

- अ. २५

'नामस्मरणाच्या छन्दातूनच-वेड-चाळ्यातूनच या मायावी संसारातील चंचलपणा नष्ट होतो आणि मनाला निश्चलपण प्राप्त होत असते -

**घडो तुझे नामस्मरण।**
**व्हावी न इतर आठवण।**
**यावे मनासी निश्चलपण।**
**चंचलपण नातळो ॥११९॥**

- अ. २५

नामाच्या सतत, अविरत स्मरणाने अनेक आवर्तने घडोत व त्यातूनच आम्हा सर्वांना समाधान लाभो, अशी विनित प्रार्थना तन्मयतेने ओवीबद्ध करताना साईचरित्रकार म्हणतात -

**अनिमेष तुझे नामावर्तन।**
**हेचि आम्हा कथाकीर्तन।**
**हेचि आमुचे नित्यानुसंधान।**
**हेचि समाधान आम्हाते ॥२५॥**

- अ. २६

श्री साईचरित्रकारांनी बाबांची मानसपूजा 'साईनाम' बळावर कशी बांधली आहे ते पाहणे फारच उद्बोधक आहे -

**आनंदाश्रू उष्ण जीवन।**
**करू तेणे चरणाक्षालन।**
**शुद्धप्रेम चंदनचर्चन।**
**करवूं परिधान सच्छ्रद्धा ॥२७॥**

**हे अंतरंग पूजाविधान।**
**बाह्योपचार पूजेहून।**
**येणे तुज सुप्रसन्न।**
**सुखसंपन्न करू की ॥२८॥**

- अ. २६

पुढे हेच बाबांचे लाडके भक्तश्रेष्ठ नामस्मरणाचा सामर्थ्यवान कानमंत्र देत सांगतात -

**स्मरूं नित्य "साई समर्थ"।**
**याच मंत्रे साधू परमार्थ।**
**होऊ कृतार्थ निजनिष्ठा ॥३३॥**

- अ. २६

बाबांची सर्वात महत्त्वाची शिकवण नामस्मरणाबद्दल आहे. इतर वायफळ गप्पागोष्टींत, वादावादीत, थट्टानिंदेत वाणीचा अपव्यय, दुरुपयोग करण्यापेक्षा आपल्या आराध्य देवतेचे, गुरुचे नामस्मरण करण्यात जीभेचा उपयोग करावा, असा त्यांचा सतत उपदेश आहे, होता व त्याप्रमाणे बाबांचे वागणेही होते -

**नामस्मरणी मोठी प्रीति।**
**'अल्ला-मालिक' अखंड वदती।**
**नामसप्ताह करवूनि घेती।**
**दिवसराती सन्मुख ॥८२॥**

- अ. ४

आणि म्हणूनच श्री साईचरित्रकार विनयपूर्वक आत्मविश्वासाने म्हणतात -

**नामापरीस सोपे आन।**
**अंत:शुद्धीस नाही साधन।**
**नाम जिव्हेचे भूषण।**
**नाम पोषण परमार्था ॥८८॥**

**नाम घ्यावया न लगे स्नान।**
**नामासि नाही विधि-विधान।**
**नामे सकळ पापनिर्दळण।**
**नाम पावन सर्वदा ॥८९॥**

- अ. २७

'विष्णुसहस्त्रनाम' पोथी लाडका भक्त शामा याच्या हाती देतेवेळी श्री बाबा स्वत:च 'नाम-महिमा' सांगतात -

**नाम पापाचे पर्वत फोडी।**
**नाम देहाचे बंधन तोडी।**
**नाम दुर्वासनेच्या कोडी।**
**समूळ दवडी लोटूनी ॥८५॥**

**नाम काळाची मान मोडी।**
**चुकवी जन्म-मरणओढी।**
**ऐसिया सहस्त्रनामाची जोडी।**
**शाम्यास गोडी लागावी ॥८६॥**

**नामापरीस सोपे आन।**
**अंत:शुद्धीस नाही साधन।**
**नाम जिव्हेचे भूषण।**
**नाम पोषण परमार्था ॥८८॥**

**अखंड माझेही नाम घेता।**
**बेडा पार होईल तत्त्वता।**
**नलगे काही इतर साधनता।**
**मोक्ष हाता चढेल ॥९०॥**

**जया माझे नामाची घोकणी।**
**झालीच तयाचे पापाची धुणी।**
**तो मज गुणियाहूनि गुणी।**
**जया गुणगुणी मन्त्राभी ॥९१॥**

- अ. २७

श्री बाबांचे वरील मनोगत साईचरित्रकारांनी अवतरणात दिलेले आहे आणि आपणा सर्वांना नामस्मरण, पूजेचा महान मार्ग दाखविला आहे. साईचरितकर्त्यांनी 'नाम'संदर्भात श्री सन्त एकनाथांचे सुंदर उदाहरण सांगितले आहे -

ते म्हणतात: नामोपासना साधी आहे. एकनाथांनी आपल्या दुराचरणी शेजाऱ्याला नाममंत्र दिला व परमार्थाच्या मार्गावर आणले.

श्रीमती खापर्डे बाबांच्या निस्सीम भक्त होत्या. त्या बाबांची सेवाचाकरी मनापासून

करीत. बॅरिस्टर खापर्डे यांच्या पत्नी असूनही त्यांना अभिमान, अहंकार नव्हता. बाबांनी त्यांना एके दिवशी प्रसन्न चित्ताने हळूच कानमंत्र दिला तो नामस्मरणाचा !

**पाहोनि तिचा सेवाकाम ।**
**प्रसन्न बाबांचे अंतर्याम ।**
**हळुच म्हणती 'राजाराम ।**
**राजाराम' वद वाचे ॥१६६॥**

**ऐसे म्हणत राही नित ।**
**सफल होईल आई जीवित ।**
**शांत होईल तुझे चित्त ।**
**हित अपरिमित पावसील ॥१६७॥**

- अ. २७

अशाप्रकारे शक्तिपात-योगबळाने, केवळ शब्द-वाणी-बळाने बाबांनी श्रीमती खापर्डेबाईंना नामस्मरणाचा कानमंत्र दिला.

श्री साईसत्‌चरित्रकार हेमाडपंत नामाची महती, नामाची थोर परंपरा, नाम-शब्दाचे श्रेष्ठत्व सिद्ध करताना कुंतीमातेच्या अपरंपार दु:खाची, दैन्याची आठवण करून देतात -

**कुंती पाच पांडवांची आई ।**
**अज्ञात आणि वनवासापायीं ।**
**कष्टली जरी अनंत अपायीं ।**
**प्रार्थी अपायचि देवाते ॥११०॥**

भगवान श्रीकृष्णाचे स्मरण नित्य व्हावे म्हणूनच कुंतीमाता नित्य दु:ख-परंपराच मागत आहे -

**मज द्या निरंतर दु:खपरंपरा ।**
**पाडी न विसरा तव नामी ॥१११॥**

**तेच की देवा माझे मागणे ।**
**देणे तरी मज हेंच देणे ।**
**होईल मग तव नाम तेणें ।**
**अखंड लेणें मम कंठा ॥११२॥**

- अ. २२

कुंतीमातेच्या 'अखंड, दिव्य नाम-अलंकाराचे' श्रेष्ठत्व सिद्ध करावयास साक्षात् वाक्‌सिद्धीसुद्धा अपुरीच पडेल असाच नित्यानुभव साई-भक्तांचा आहे आणि म्हणूनच श्री साईचरित्रकार 'नाम' विसरू नये यासाठी प्रार्थना करतात -

**श्रोता वक्ता अहर्निशी ।**
**हेच की मागू साईंपाशी ।**
**विसर न व्हावा तव नामाशी ।**
**पायापाशी ठेविजे ॥११३॥**

- अ. २२

साईनाम-स्मरणाचा, साई-प्रार्थनेचा, साईंचा धावा करण्याचा आनंद परम संतोषजनक, आरोग्यवर्धक, तसेच शक्तिदायक आहे. भक्ताला साई-स्मरणाच्या कृपेने प्रचंड संकटांवर मात करण्याचे अलौकिक सामर्थ्य प्राप्त होत असते. अध्याय २९, ओवी १२१ आणि १२८ यांत साईचरितकारांनी उचित, उत्कृष्ट कथा सांगून याचे स्पष्टीकरण केले आहे.

आत्मविश्वास गमाविलेल्या भक्ताला बाबांनी आपल्याठायी खेचून आणले. त्याला ईश-भक्ती-नामाची गोडी लावली. वांद्रे येथे राहाणारे 'भजन-माला-कार' श्री. रघुनाथराव तेंडुलकर आणि त्यांच्या पत्नी सावित्री यांचा जेष्ठ मुलगा बाबू वैद्यकीय परीक्षेस ज्योतिष्याच्या सांगण्यानुसार बसत नव्हता. तेव्हा बाबा सावित्रीबाईंना म्हणाले -

**"सांगे तयास माझे मान ।**
**पत्रिका ठेवी गुंडाळून ।**
**बैसे जा स्वस्थ मन परीक्षे ॥१०९॥**

**नादा कुणाच्या लागू नका ।**
**जन्मपत्रिका पाहू नका ।**
**सामुद्रिका विश्वासू नका ।**
**चालवा निका अभ्यास" ॥११०॥**

- अ. २९

बाबांच्या पायीं, ठायीं नितांत, नित्य, प्रचंड आदर, प्रेम, निष्ठा बाळगून बाबांचा अहोरात्र, क्षणोक्षणी धावा, नामस्मरण, प्रार्थना करणारा भक्त असंख्य संकटांचे पर्वत सहज, लीलया उल्लंघून जातो, असे साईचरितकार अतिनम्र अभिमानाने सांगत आहेत -

**देऊनिया संकटा तोंड ।**
**करिता साईस्मरण अखंड ।**
**होतील सकळ अपाय दुखंड ।**
**शक्ति ही प्रचंड नामाची ॥१२८॥**

- अ. २९

परंतु हे 'साई'नाम-स्मरण स्फुरविणारा - हृदयात अहोरात्र गुणगुणविणारा - बाबांची कृपाभिलाषा बाळगणाऱ्या भक्त-हृदयीं 'साई'नामस्मरण स्फुरविणारा हा प्रत्यक्ष 'साईश्वर'च आहे, हे आपण प्रत्येक भक्ताने मनोमनी श्रद्धापूर्वक जाणले पाहिजे, ठसविले पाहिजे. तेव्हाच हे 'साई'स्मरण आपोआप आपल्या 'हृदय-मंदिरात' निनादत असते -

**हेंच या अंतरायांचे प्रयोजन ।**
**तेंही करी साईच निर्माण ।**
**तेव्हांच घडेल साई-स्मरण ।**
**संकटोपशमनही तेव्हांच ॥१२९॥**

- अ. २९

नामस्मरणाच्या अविरत, नित्य घोषाने चित्त चैतन्यमय, तदाकार होते, मन ईशपायी संपूर्ण लीन होते. भक्त मेघा बाबांच्या-सद्‌गुरुच्या दर्शनाने, त्यांच्या अलौकिक आत्मज्ञानाने, दया, क्षमा, शांत प्रवृत्तीने प्रभावित झाला व बाबा मुसलमान आहेत की ब्राह्मण आहेत, या द्वैताचा त्याला पूर्ण विसर पडला व बाबांच्या नामस्मरणाने हा शंकरभक्त 'साई-शंकर', 'साई-शंकर' असा नित्य श्रद्धा-प्रेमपूर्वक नामघोष करू लागला -

**करी मेघा अहर्निश ।**
**साईशंकर - नामघोष ।**
**बुद्धिही तदाकार अशेष ।**
**चित्त किल्मिषविरहित ॥१४८॥**

- अ. २८

संकटाने त्रासून ज्याचे चित्त आशाहीन, दु:खी झालेले आहे अशा भक्ताने-साधकाने-उपासकाने केवळ 'श्री साईसद्‌गुरु'चे केवळ मन:पूर्वक, भक्तिभावे, कळवळून केवळ 'स्मरण' केले तरी हा दयाळू, कृपाळू शांतिनाथ, साई-परमेश्वर भक्ताला तात्काळ दु:खमुक्त करतो, असे चरितकार स्वानुभवाने सांगत आहेत -

**ऐसा संकटी गांजिता ।**
**भक्त स्मरे जो साईनाथा ।**
**तयाचिया उद्विग्नचित्ता ।**
**शांतिदाता तो एक ॥११॥**

- अ. ३०

मानवजन्माचे सार्थक, मानव-उद्धारासाठी करावयाचे सामर्थ्य शक्ती, बळ, देणाऱ्या गुरुमाऊलीच्या 'नाम-स्मरणात' अपार, अथांग आहे. भक्त, साधकांजवळ अनुभवबळाने प्राप्त झालेली चिकित्सक अभ्यासूवृत्ती हवी. मोहमयी, मायावी, क्लेशकारक मानवदेहाच्या जनन-मरण फेऱ्यातून ज्याला मुक्तता हवी आहे, ज्याला 'मरणाला', 'मृत्यूला' निर्भयपणे सामोरे जायचे आहे त्याने 'नाम-स्मरणाचा' सतत ध्यास, अभ्यास करावयास पाहिजे.

**याचकरिता नामस्मरण ।**
**लाविला अभ्यास हेच कारण ।**
**प्रसंगी जावे न गांगरून ।**
**अंती आठवण राहावी ॥८॥**

- अ. ३१

नामाची अखंड घोकणी, नामस्मरण प्रीतिवर अढळ प्रेम, नाम-चिंतनाची गोडी घरी-दारी, क्षणोक्षणी, पावलो-पावली भक्तसाधकाने साधली पाहिजे, जेणेकरून सदासर्वकाळ सद्गुरुच्या नामस्मरणाने अखंड भक्ति - प्रेमज्योत अंतरात प्रज्वलित राहते, सत्मार्गदर्शन करते -

**आसनी भोजनी शयनी ।**
**बाबांच्या नावाची अक्षय स्मरणी ।**
**एका बाबांवीण दुजा कोणी ।**
**देव ज्यांनी नाठविला ॥७७॥**

- अ. १०

बाबा सद्गुरु हे साक्षात् देव आहेत अशी श्रद्धा धारण करणारे व त्यांच्या नामाची अक्षय घोकणी करणारे भक्त-साधक भाग्यवान आहेत. सॉलिसिटर काकासाहेब दीक्षितांनी बाबांना विनविले की बाबा, म्हाळसापतींना दुसऱ्या फळीवर झोपायला सांगा, तेव्हा बाबा म्हणाले, माझ्याशिवाय 'फळीवर शयन' करणे कोणालाच शक्य नाही, कारण माझे 'गुरु-नाम-स्मरण' अखंडित असले. मी शयन केले तरी माझे नामस्मरण अविरत, सातत्याने माझ्या हृदयात तो 'अल्ला-ईश' करीत असतो. आणि म्हणूनच टांगलेली फळी ही फक्त माझीच बिछाईत आहे, इतर कोणालाही शक्य नाही -

**नामस्मरण चाले हृदयात ।**
**पाहे तेथें ठेवून हात ।**
**निजता मी मज करी जागृत ।**
**ऐसा अनुज्ञापित तो असता ॥१३९॥**

- अ. ४५

सद्गुरु-नामस्मरणाला कोणतेही विधी-विधान-पूजा-थाट-माट यांची श्रीमंती नको, फक्त भक्ताने शुद्ध-चित्त-भावाने बाबांचे नाम घ्यावे, म्हणजे बाबा स्वत:च प्रगट होतात, भक्ताची मनोकामना पूर्ण करतात -

**जया माझे स्मरण ।**
**निरंतर आठवण मज त्याची ॥३१॥**
**मज न लागे गाडीघोडी ।**
**विमान अथवा आगीनगाडी ।**
**हांक मारी जो मज आवडी ।**
**प्रकटे मी ते घडी अविलंबे ॥३२॥**

- अ. ४०

ज्याचे चित्त, तन, धन, क्षणक्षण साई-गुरू-नामात गुंतून, रूतून राहिले आहे तो साईभक्त-साधक-उपासक अत्यंत 'उत्तम' प्रतीचा भक्त होय -

**चित्त साईनामस्मरणी ।**
**दृष्टि साईसमर्थचरणी ।**
**वृत्ति साईध्यानधारणी ।**
**देह कारणी साईच्या ॥१४३॥**

- अ. २३

श्री सद्गुरू-नामाचा महिमा कोणत्याही कागदावर, कोणत्याही लेखणीने, कोणत्याही शब्दांनी लिहिता येणार नाही इतका अथांग, अगाध आणि अपार, अपरिमित आहे. गुरुनाम-स्मरणाची प्राप्ती महत्प्रयासाने प्राप्त होते. नाम-स्मरणात प्रचंड शक्ती आहे. भक्त महान शक्तीचा उपासक बनतो. श्री साईसद्गुरूंचे महान भक्त हेमाडपन्त अतिलीनतेने म्हणतात,

**श्रीसद्गुरूनाम पवित्र ।**
**हेचि आमुचे वेदशास्त्र ।**
**'साईसमर्थ' आमुचा मंत्र ।**
**यंत्रतंत्रही ते एक ॥६२॥**

- अ. १

भक्त बाळाराम मानकर यांना गुरु-नाम-स्मरणाची अवीट, अखंडित, अविरत सदा-सर्वकाळ गोडी लागावी, त्यांचे तन-मन-धन या 'नामस्मरणात' गुंतून राहावे म्हणूनच श्री सद्गुरू साईंनी त्यांना मच्छिंद्रगडावर एकटे राहण्याची आज्ञा केली. या एकलेपणाच्या परीक्षेत भक्त मानकर मानाने उत्तीर्ण झाले व श्री साई-नाम-स्मरण त्यांच्या देह-अणू-रेणूतून स्फुरू लागले, मंत्रू लागले. मरण हे सर्वांनाच येत आहे, येत असते, येणार असते, पण श्री साई-नाम-स्मरणाची अविरत गुणगुण, ध्यान-धारणा करणारा जीव निर्भयपणे 'मृत्यूला' सामोरा जातो, असे बाळकराम मानकरांच्या कथेद्वारे सांगून आपणा सर्व भक्तांना साईचरित्रकार हेमाडपन्त 'अविरत साईनाम-स्मरणाची' पताका उंचावून ठामपणे सांगू इच्छितात -

**साईनामाची घालीत रुंजी ।**
**भक्त भ्रमर बालक रामजी ।**

**होऊनि साईंचा दृष्टिविषय ।**
**लागून तया पायीं लय ।**
**मरण निर्भय पावे जो ॥११८॥**

- अ. ३१

दिव्य, भव्य 'श्री साई-सद्गुरू-नाम-स्मरणात' अंतिम श्वासानंतरही आपणा सर्वांचा जीव-तेज-प्रकाश या 'नामा'भोवती रूंजी घालीत राहो, हीच श्री सद्गुरू साईचरणी नम्र प्रार्थना आहे.

सदासर्वकाळ सुखविणारे श्री साई-नामस्मरण करत असताना श्री सद्गुरू साईनाथ स्फूर्तिचैतन्य देत आहेत आणि आपोआपच पुढील शब्द लिहिण्यास सांगतात -

**साईनाम स्मरणी प्रीति ।**
**तेचि जीव धन्य होती ।**
**'साई' 'साई' स्मरति नित्य ।**
**तेचि प्राण धन्य होत ॥**

# श्री सद्गुरू सत्संगती स्मरणाचे महत्त्व आणि फायदे

श्री साईसत्चरित्कार हेमाडपन्त ऊर्फ अण्णासाहेब दाभोलकर यांचा श्री साईबाबांवर-सद्गुरूंवर नितान्त आदर आणि श्रद्धा होती. अमर्याद निष्ठा, भक्ती,

श्रद्धा, प्रेम या भावनांनी त्यांनी आपले सर्वस्व तन, मन, धन श्री बाबांना 'सद्गुरू'स्थानी मानून पूर्ण निष्काम बुद्धीने अर्पण केले होते. हेमाडपन्तांसारखा भक्त-शिष्य बाबांच्या ठायी-पायी अतिलीनतेने नम्र झालेला कोठेच पाहण्यात नाही. ही गुरू-भक्ताची जोडी अजोड आहे. अध्याय दहामध्ये चरितकारांनी सद्गुरूच्या कृपा-आशीर्वाद-बळाचे महत्त्व आणि ओळख, विश्वासाचे फायदे भक्ताला अमाप मिळतात, असे पूर्णनिष्ठा-भक्तिपूर्वक निवेदित केले आहे.

**जयाच्या (गुरू) स्मरणमात्रेंच ।**
**उकले जन्ममरणांचा पेच ।**
**साधनात साधन तें हेंच ।**
**नाहीं वेंच कपर्दिक ॥२॥**

- अ. १०

एका पैचाही खर्च न करता भक्ताला अमाप माया, प्रेम, ज्ञान देणाऱ्या गुरु-माऊलीचे प्रेम, संगत-सोबत प्राप्त करणारा भक्त ह्या विश्वात खरोखरच भाग्यवंत भगवंत होय! जोपर्यंत हा शरीर-रथ यथायोग्य जीवनक्रम आक्रमित आहे, तोपर्यंत साधक, उपासक, भक्ताने या परमेश्वररूपी सद्गुरूचे स्मरण, सेवा, प्रेमभावाने करून अमर्याद पुण्याचे फळ आपोआप-सहजपणे मिळवावे, असेच हेमाडपन्त खुबीदारपणे, चातुर्याने सुचवित आहेत -

**अल्प प्रयासें अनल्प फळ ।**
**अनायासे हाता ये सकळ ।**
**जोंवरी हा इंद्रियगण अविकल ।**
**तोंवरी पळपळ साधावे ॥३॥**

- अ. १०

आपल्या हिन्दूधर्मकल्पनेनुसार आपणा सर्वांच्या एकूण तेहतीस कोटी देव-देवता या विश्वात संचार करीत आहेत; पण हेमाडपंतांच्या विचारानुसार त्या सर्व काल्पनिक मानलेल्या आहेत. त्यांच्या उपदेश-सुचनेनुसार, अनुभव-अभ्यासाप्रमाणे शाश्वत, चिरंतन व चिरंजीव असा एकच देव आहे, तो म्हणजे 'सद्गुरू', आपले उपास्य दैवत! आपले नशीब बळकट करणारा, त्यावर पक्के शिक्कामोर्तब करणारा सर्वात श्रेष्ठ देव एकच, तो म्हणजे सद्गुरू! अर्थात्, या 'सद्गुरुच्या' चरणी भक्त-भाविकाची-उपासकाची पूर्ण अढळ श्रद्धा हवी! सद्गुरूसेवा मनापासून प्रेम-श्रद्धापूर्वक केली, तर संसारातील कोणतेच कष्ट, क्लेश भक्ताला स्पर्शूच शकत नाहीत. या विश्वातील मायिक सुख-दु:खांचा संसार-सागर तरून जाण्यासाठी ज्या तारूवर 'सद्गुरू' नावाडी आहे, त्याच नावेत भक्ताने पूर्ण प्रेम-श्रद्धापूर्वक बसले पाहिजे. असा हा आनंद-मोक्ष प्राप्त करून देणारा 'सद्गुरू' भक्ताला भेटणे, हे त्याचे पूर्ण भाग्य होय! भक्ताला सहजपणे आपल्या सेवेत परायण, तत्पर करणारा 'सद्गुरू' हा खरोखरच गारूडी असतो. तो प्रेमाने पूर्णपणे भक्ताला आपलेसे करतो.

जो ईश्वर-भक्त-उपासक-साधक सहजपणे आपल्या प्रेमपाशात भक्ताला गुंगवून, रंगवून ठेवतो, खरोखर तोच 'सद्गुरू' होय! हेमाडपंत म्हणतात,

**गारूडी स्वयें मोठा चतुर ।**
**खेळ न करी अज्ञानियासमोर ।**
**जाणे कुशलतेचे वर्मसार ।**
**तो प्रेक्षकसंभार अपेक्षी ॥५४॥**

- अ. ८

ढगातून मिळणाऱ्या पाण्यात समुद्राचा खारटपणा नसतो. सद्गुरूच्या चरणी भक्तीत रममाण होणाऱ्या भक्ताला सुखाची सीमाच नाही. चैतन्यमय ब्रह्माच्या आनंदात तो सदैव डुंबत, बागडत असतो.

**समुद्रीचें क्षारोदक ।**
**मेघाहाती पडता देख ।**
**होते जैसे गोड पियुख ।**
**ते सुख जडता गुरुपायीं ॥७९॥**

**ऐशिया नरदेहाची सद्गती ।**
**गुरुविना नकळे कवण्याप्रती ।**
**गुरुचि जेव्हां धरती हाती ।**
**तैंचि उद्धरती जड जीव ॥८०॥**

- अ. ८

हेमाडपंत म्हणतात, माझे सद्गुरू श्री साईमहाराज पूर्ण ब्रह्मज्ञानी, ऐश्वर्यवंत, श्रीमंत, परोपकारी, निरहंकारी, क्षमाशांतीपूर्ण आहेत, पण राहतात मात्र एखाद्या गरीब, लीन, नम्र फकिरासारखे! हा साऱ्या विश्वाचा 'विश्वेश्वर', 'कुबेराचा कुबेर', 'पोरी मला एक चतकोर भाकरी दे!' म्हणून हात पसरतो, दारोदारी टमरेल घेऊन रोज भिक्षा गोळा करतो, अशा 'साईं'ना 'सद्गुरू'स्थानी पूज्य मानणारे त्यांचे भक्त हेमाडपंत खरोखरच भाग्यवान होत!

सद्गुरू साईनाथांवाचून कुसंग, क्लेश, दु:ख-ताप इत्यादी पापांचे परिमार्जन कोणीच करू शकत नाही, ही दृढ श्रद्धा श्री साईचरणी दृढ पाहिजे. कळवळ्याचे गुरुमुखातून निघालेले गुरुवचन भक्ताचे नित्य रक्षण करीत असते. गुरुमुखीचे शब्द अंत:करणात श्रवणाद्वारे शिरले, तरी हृदय-मंदिर सुन्दर बनते.

गुरुभक्तीचा महिमा डॉक्टर पंडितांच्या कृतीने भक्त दादा केळकरांच्या हृदयपटलावर बाबांनी किती सहजपणे बिंबवला, याची कथा अ. ११, ओ. ६२ मध्ये आली आहे -

**"दादा तयाचा गुरु बामण ।**
**मी जातीचा मुसलमान ।**
**तरी मी (धोपेश्वरीचे रघुनाथ**
**सिद्ध ऊर्फ काका पुराणिक**
**नामे प्रसिद्ध) तोचि ऐसे मानून ।**
**केले गुरुपूजन तयानें" ॥६२॥**

सद्गुरूवरील दृढविश्वासाचे महत्त्व ध्यानी ठेवल्याने प्राप्त होणारे फायदे अनंत आणि अवर्णनीय आहेत. योग्य सद्गुरू ओळखून त्याची योग्यता, महती पूर्ण ध्यानी आणून दृढप्रेमभावनेने त्याच्या चरणी लीन होण्याने, त्याच्या नित्य स्मरणाने भक्ताला अमाप सुख-शान्ती, समृद्धीचे, समाधानाचे जीवन साधता येते; यातच भक्ति-भावना-साधनेचे फळ आपसूक प्राप्त होते.

सद्गुरु हा नित्य लोकानुग्रही, करुणाघन, कृपाळू, लोण्याहूनही मृदु, हृदयाचा अत्यंत दक्ष, व्यवहारी, शुद्ध आचरणाचा, परमानंदी अवस्थेत असतो. हीच सद्गुरू ओळखण्याची सात्त्विक लक्षणे होत.

म्हणूनच साईसत्चरितकार कळवळून उपदेश, विचार प्रगट करतात, मार्गदर्शन करतात. साई सद्गुरूंना अत्यंत लीनतेने शरण जा. त्यांच्या कथा, उपदेश, विचार

श्रवण केल्याने जीवनकाळ धन्य होत असतो.

**गुरूकथेची सत्संगति ।**
**धरा उगवा संसारगुंती ।**
**यांतचि तुमचे सार्थक निश्चिती ।**
**विकल्प चित्ती न धरावा ॥१३४॥**

- अ. १०

'श्री साईनाथ' हाच आपणा सर्वांचा एकमेव 'सद्‌गुरू' आहे, अशी मनाशी पक्की खूण-गाठ बांधा आणि जेव्हा अशा अवस्थेला 'भक्त' दृढधारणा धारण करतो, तेव्हा 'सद्‌गुरू' आपोआपच भक्ताचा-साधकाचा-उपासकाचा सदासर्वकाळ चहुदिशांनी 'रक्षणकर्ता' असतो.

**मग जो गाई वाडेकोडे ।**
**माझे चरित्र माझे पवाडे ।**
**तयाचिया मी मागे पुढे ।**
**चोहीकडे उभाच ॥**

- अ. ३, ओ. १२

**एका साईनाथावाचून ।**
**अथवा एका सद्‌गुरूवीण ।**
**कुसंगाचे परिमार्जन ।**
**करील आन कवण की ॥१३८॥**

**कळवळ्याचे गुरुमुखातून ।**
**निघाले जे गुरूवचन ।**
**करा करा भक्त हो जतन ।**
**कुसंगनिरसन होईल ॥१३९॥**

- अ. १०

एकदा का भक्त-साधक सद्‌गुरूच्या नित्य सत्संगात रममाण झाला की, संसारातील व्याधी-दु:खातून त्याची आपोआप मुक्तता होत असते. त्याला देह-दु:खाची, आसक्ती तोडण्याची दिव्य-भव्य शक्ती प्राप्त होत असते. मानवी जीवनात सुख-दु:ख यांचा पाठलाग नित्यच होत असतो, पण या उभय भोगांपासून मोचन करणारा एकच मार्ग आहे, तो म्हणजे श्री सद्‌गुरुचा नित्य सत्संग (तन-मन-धनपूर्वक) करणे होय! साईनाथांसारखा ब्रह्मज्ञानी, भक्तकल्याणतत्पर सद्‌गुरु साईसत्‌चरितकार हेमाडपंत उर्फ अण्णासाहेब दाभोलकरांना पूर्वपुण्याईबळाने प्राप्त झाला; म्हणूनच ते अति-लीनतेने, भक्ती-दृढ-प्रेमपूर्वक म्हणतात -

**हेमाड साईस शरण ।**
**मी तो तयांच्या पायींची वहाण ।**
**करीत राहीन कथानिरुपण ।**
**होईन सुखसंपन्न तितुकेनी ॥१५५॥**

- अ. १०

अ. १८, ओ. १० यात चरितकार म्हणतात, गुरुवाणी नेहमीच चैतन्यदायी, स्फूर्तिमय आहे, म्हणूनच ती इतरांना सांगण्यात हितमय असते. रामरक्षा-दीक्षेचे स्वप्न बुधकौशिक मुनींनी सर्वांना कथन केले. गुरु सदासर्वकाळ भक्तावर प्रेमाचीच बरसात करीत असतात. जशी आई प्रेमाने बाळाच्या आरोग्यासाठी कडू गुटी पाजते, तद्वत गुरुही भक्ताला प्रेमळ, चैतन्यमय उपदेश-गुटी पाजत असतात. आपल्या भक्ताचा हेतू-ध्येय पूर्ण करणे सद्‌गुरूचे नित्य कर्तव्य-कर्मच असते. सर्व सेवा-पूजा-स्मरण-साधनात गुरु-मुख-चरणांचे स्मरण ही उच्च कोटीची गुरूपूजन-सेवा होय. गुरु प्रत्यक्ष ईश्वर, परमेश्वर, प्राणप्रिय पिता, त्राता होय.

**धन्य धन्य सद्‌गुरूसंगती ।**
**कोणा वर्णवे तियेची महती ।**
**आठविता एकेक तयांच्या उक्ती ।**
**निजस्फूर्ति उचंबळे ॥१७॥**

**प्रेमे करिता ईश्वरार्चन ।**
**गुरुसेवा गुरूपूजन ।**
**हाईल गुरुगम्य संपादन ।**
**इतर साधन ते फोल ॥१८॥**

**विक्षेप आणि आवरण ।**
**तेणे हा भवमार्ग संकीर्ण ।**
**गुरुवाक्य दीपकिरण ।**
**निर्विघ्न मार्गदर्शक ॥१९॥**

**गुरु प्रत्यक्ष ईश्वर ।**
**ब्रह्मा विष्णु महेश्वर ।**
**गुरुचि वस्तुत: परमेश्वर ।**
**ब्रह्म परात्पर गुरुराय ॥२०॥**

**गुरू जननी गुरु पिता ।**
**गुरु त्राता देव कोपता ।**
**गुरू कोपता कोणी न त्राता ।**
**सदा सर्वदा जाणावे ॥२१॥**

**गुरू दर्शक प्रवृत्तीचा ।**
**तीर्थव्रत निवृत्तीचा ।**
**धर्माधर्म विरक्तीचा ।**
**वेदश्रुतीचा प्रवक्ता ॥२२॥**

- अ. १८

चरितकारांच्या वरील विधानांतून गुरुओळख, गुरू-महती, गुरू-श्रेष्ठत्व, गुरू-लाभ इत्यादी सर्वगुणसंमेलनाचे विराट दर्शन भक्त-साधक-उपासकाला सहज कळेल अशा शब्दांतून व्यक्त झालेले आहे. फक्त हे सर्व गुरु-गुह्य-ज्ञान तत्परतेने जाणून घेण्यासाठी भक्त-वाचक सावध चित्त पाहिजे.

सद्गुरू हा संतरूपच होय! म्हणून चरितकार अतिसूक्ष्मतेने सन्त-सद्‌गुरुची लक्षणे, प्रवृत्ती आवर्जून सांगतात -

**उघडूनि बुद्धीचे डोळे ।**
**(गुरू) संत दाविती निजरूप सोहळे ।**
**पुरविती भक्तीचे डोहळे ।**
**अति कोवळे कारुणिक ॥२३॥**

**तेणे विषयवासना मावळे ।**
**निद्रेंतही ज्ञानचि चावळे ।**
**विवेक वैराग्य फळ जावळे ।**
**(गुरू) कृपाबळे हाती ये ॥२४॥**

**जाहलिया (सद्‌गुरू) सत्समागम ।**
**(सद्‌गुरू) संतसेवा (गुरू) संतप्रेम ।**
**स्वयें भक्तकामकल्पद्रुम ।**
**सर्व श्रम निवारी ॥२५॥**

- अ. १८

भक्त साठे बाबांचे परम श्रद्धाळू साधक होते. बाबांनी त्यांना गुरुमहती सांगताना म्हटले -

**वाचिता ही गुरूची पोथी ।**
**भक्त होती निर्मळ ॥५६॥**
**या पोथीचे पारायण ।**
**करिता होईल कल्याण ।**
**परमेश्वर होईल प्रसन्न ।**
**भवबंधन सुटेल ॥५७॥**

- अ. १८

पक्का गुरु आणि निष्ठावन्त शिष्य-साधक-भक्त यांचे नाते अतूट प्रेममय दृढश्रद्धेने बांधलेले असते. आई आणि तिचे

लेकरू यांतील अपार प्रेमदृष्टीने ते भरलेले असते. बाबांनी गुरू-भक्ताचे दृढनाते स्पष्ट करताना कासवी आणि तिची पिल्ले यांचा व्यवहारी दृष्टान्त, निसर्ग-नियम सहजतेने पटवून दिला आहे -

**''कासवी नदीचे ऐल काठी।**
**तिची पिल्ले पैलतटी।**
**ना दूध ना ऊब केवळ दृष्टी।**
**देई पुष्टी बाळका ॥११११॥**

**पिलिया सदा आईचे ध्यान।**
**नलगे कांहींच करणे आन।**
**नलगे दुग्ध ना चारा ना अन्न।**
**मातानिरीक्षण पोषण त्या ॥११२॥**

**हे जे निरीक्षण कूर्मदृष्टि।**
**ही तो प्रत्यक्ष अमृत वृष्टी।**
**पिलिया लाधे स्वानंदपुष्टी।**
**ऐक्यसृष्टि गुरुशिष्या'' ॥११३॥**

- अ. १९

गुरु आणि ईश्वर यांत फरक नाही. ईश्वर हाच गुरू आणि गुरु हाच प्रत्यक्ष ईश्वर होय आणि अशी तदाकार दृष्टी आत्मज्ञानी भक्त-साधकालाच आपोआप प्राप्त होत असते.

आत्मा, ईश्वर, गुरु यांत काहीच भेद नाहीत -

**प्रत्यगात्मा तोचि ईश्वरू।**
**आणि जो ईश्वरू तोचि गुरू।**
**तिहीत भेद नाही अणुमात्रु।**
**नागवे करू जाई तो ॥१२८॥**

- अ. १९

जसा भाव तसा देव, जसा गुरुभाव तसा भक्तभाव. भाव-श्रद्धा जेवढी अढळ तेवढे मिळते निश्चित फळ, असा बाबांचा विचार आहे. ते सहजपणे प्रगट करतात -

**''मंत्र तीर्थ द्विज देव।**
**दैवज्ञ वैद्य की गुरुराव।**
**यांच्या ठायी जैसा भाव।**
**तैसाच उद्भव फलाचा'' ॥६४॥**

- अ. २२

अध्याय २३ मध्ये सद्गुरु साईनाथांनी त्यांचे परम भक्त-साधक-उपासक श्रीमान सॉलिसिटर दीक्षितांची गुरुभक्ती किती उच्च कोटीतील उत्कट आहे याची प्रचिती तत्कालीन सर्व भक्त-प्रेक्षकांना साधार पटवून दिली आहे. मरणाधीन बोकडाला सुरीने ठार मारण्याची आज्ञा दीक्षितांनी मान्य केली व सुरा उगारला, पण बाबांनी स्वतःच त्यांना थांबायला लावले आणि त्यांची, दीक्षितांची निर्भत्सना केली. अरे, अहिंसक ब्राह्मण असून गरीब बोकडाला मारतोस काय? असा सवाल बाबांनी त्यांना केला तेव्हा दीक्षितांनी दिलेले उत्तर सर्व गुरुभक्त-साधकांनी हृदयसंपुटात रेखाटून ठेवण्यासारखे समर्पक आहे -

**''आम्हा नाही लाज शरम।**
**गुरुवचनपालन हेच वर्म।**
**हाचि आगम (नशिबात)**
**आम्हाते ॥१७१॥**

**हिंसा अहिंसा आम्ही नेणू**
**आम्हासी तारक सद्गुरुचरणू।**

**गुर्वाज्ञा जेथ स्पष्ट।**
**युक्तायुक्त वा इष्टानिष्ट।**
**हें विचारी तो शिष्य नष्ट।**
**सेवाभ्रष्ट समजे ॥१७६॥**

**गुर्वाज्ञा परिपालन।**
**मुख्य धर्माचरण हे ॥१७७॥**

**चित्त गुरुपदी सावधान।**
**राहोत की जावोत प्राण।**
**आम्हा गुरुचीच आज्ञा प्रमाण।**
**परिणाम निर्वाण तो जाणे ॥१७८॥**

**योग्यायोग्य नाणूं मनास।**
**वेळी वेंचू जीवितास।**
**परी गुरुवचनास प्रतिपाळूं'' ॥१८१॥**

- अ. २३

भक्त दीक्षितांच्या वरील सडेतोड विचारांनी बाबांचे पूर्ण समाधान झाले व इतर पळपुट्या भक्तांना मात्र चांगलीच अद्दल घडली. गुरुआज्ञा अव्हेरल्यामुळे त्यांच्या माना लाजेने खाली झुकल्या. भक्त दीक्षितांची 'गुरुभक्ती' बाबांनी सर्वांसमक्ष शिखरावर चढविली. ज्या भक्त-साधक-उपासकाला स्व-सामर्थ्याची, बुद्धी-वैभवाची प्रौढी असते तो गुरूंचा योग्य भक्त-शिष्य होवूच शकत नाही. कर्ता-करविता तो एक (सद्गुरू) भगवंत ही नम्रता, लीनता भक्तहृदयात अहोरात्र पाहिजे. तसा अभ्यास, तसा प्रयत्न सतत भक्ताने करीत राहिले पाहिजे. म्हणजे एक क्षण आपोआप असा येईल की त्या भक्ताला सद्गुरू चिन्तन-चित्-शक्ती-विराट रूपाचे दर्शन होईल, त्याची मनोकामना पूर्ण होईल. साक्षात् बाबा स्वतः परमेश्वरीरूप, अवतार असतानादेखील गरीब वणजारी त्यांनी गुरुस्थानी पूज्य मानला, त्याचा आदर केला. म्हणूनच बाबा 'ईशमय' साक्षात्कारी 'सद्गुरू' झाले, असे स्वतःच बाबांनी कथन केले आहे. त्यांचे तिघे शिष्य-बंधु मात्र घोर अरण्यात अहोरात्र अन्नपाण्यावाचून तडफडत राहिले. त्यांच्या बुद्धीला सुख-शान्ती-समाधान लाभले नाही. म्हणूनच चरितकार बाबांच्या अनुभव-कथनाचा साक्षात् आधार घेऊन विधान करीत आहेत -

**स्वयें आपण**
**(सद्गुरु साई परमेश्वर) अवतारी।**
**वंद्य मानूनिया वणजारी।**
**अन्नब्रह्म निज निर्धारी।**
**सेवूनि थोरी गाइली ॥१०४॥**

**कोणी न ज्ञानी गुरूविण ॥१०५॥**

- अ. ३२

गुरुमहती अवर्णनीय, शब्दातील आहे. गुरुप्रेमाचे वर्णन करण्यास शब्दांचे सामर्थ्य अपुरे आहे. श्रेष्ठ गुरुचा भक्तही श्रेष्ठ असतो. नितांत आदराने, पूर्ण, शुद्ध प्रेमश्रद्धेने असा परमभक्त गुरुपायी अतिलीन, प्राणदान करण्यास सदा तत्पर असतो -

**गुरुसेवेसी जो तत्पर।**
**गुर्वाज्ञेचाच ज्या आदर।**
**इष्टानिष्टतेचा सर्व विचार।**
**गुरुशिरावर तो ठेवी ॥१४१॥**

सद्गुरुची कोणतीही आज्ञा निंद्य असो अथवा वंद्य तो सत्भक्त ती पूर्ण करण्यास नित्य निमग्न असतो -

**गुर्वाज्ञेचा तो किंकर।**
**स्वतंत्र नाही तया विचार।**
**नित्य गुरुवचनपालनपर।**

**सारासार देखेना ॥१४२॥**

मानवी मनाच्या या मायावी मोहजाळात प्रत्येक मनुष्यजीव संसार-सुख-दुःखात गुरफटला आहे, गुंतला आहे. ईशस्मरण-सद्‌गुरूस्मरण-चिन्तन-पूजन-साधन-उपासना करण्यास त्याच्या मनाला स्वस्थ शांतता लाभत नाही. पण प्रिय वाचकांनो, आपणा सर्वांचे परमप्रिय सद्गुरू-साईचरितकार सांगतात - गुरूवचनावर, गुरूशब्दावर पूर्ण विश्वास ठेवा, म्हणजे आपणा सर्वांची सर्व कार्ये आपोआप यशस्वी होतात.

घार फिरे आकाशी, तिची दृष्टी पिलांपाशी अशीच अवस्था गुरूदृष्टीप्रेमाची असते. पूर्ण सद्‌गुरूप्रेम लाभलेला भक्त-साधक खरोखरच भाग्यवान होय. कारण पूर्वपुण्यबळानेच त्या भक्ताला सद्‌गुरू भेटतो किंवा त्याच्या भेटीला येतो. राम-भरत-भेटीचाच योग असे म्हणावयास पाहिजे. बंधु भरताने राम-पादुकाच 'सद्‌गुरूस्थानी' मानून, पवित्र प्रेमाने वंदन करून अयोध्यानगरीतील प्रजाजनांचे पालन केले, तद्‌वत सच्चा भक्त सद्‌गुरू-प्रेरणेनेच सत्कृत्ये सहज प्रवृत्तीने करीत असतो.

**वाटेल हे श्रोतिया**
**(गुरूसेवा) अवघड ।**
**परी हे सद्गुरूघरचे गारूड ।**
**व्हा एकदा गुरूवचनारूढ ।**
**तात्काळ गूढ उकलेल ॥१८३॥**

- अ. २३

सद्गुरू नेहमी सत्‌भक्ताला भवरोग निवारण्याची प्रेरणा-शक्ती देत असतो. गुरूमुखातून निघालेली वाणी भक्ताने आदरपूर्वक श्रवण करून तिला कार्यप्रवण केले पाहिजे. गुरूशब्दांचे नित्य स्मरण, चिन्तन केले तर भक्ताचा उद्धार होत असतो. अध्याय ५१, ओ. ११२ ते १२० यात वर्णिल्याप्रमाणे गुरूचे उपकार अनंत, अपार आहेत. त्याचे उपकार फेडणे अशक्य होय. परंतु त्यांच्या उपकारांचे स्मरण हेच खऱ्या भक्त-शिष्य-साधक-उपासकाचे भूषण आहे, असे चरितकार म्हणतात. नित्य गुरूस्मरणाने सद्‌गुरूचा नित्य शुभ आशीर्वाद मिळतो, मनोकामना पूर्ण होतात -

**सद्गुरूप्रसादावीण ना**
**परतत्त्वज्ञान ॥५८॥**

- अ. ५२

सद्गुरू आणि माता यांच्या प्रेमाची सुन्दर उपमा, श्रेष्ठत्त्व सिद्ध करताना चरितकार सद्गुरू हाच मातेहून अधिक श्रेष्ठ, अधिक प्रेमळ आहे, असे म्हणतात. कारण साक्षात् श्री सद्‌गुरू साई-मातेच्या अमृतमय प्रेमधारांनी त्यांची शब्दगंगा दुथडी बहरून येत आहे -

**माता नऊ मास पोटीं धरी ।**
**जन्म देता घाली बाहेरी ।**
**गुरूमातेची उलटी परी ।**
**बाहेरील भीतरी घालील ॥६१॥**

- अ. ५२

सद्‌गुरूमातेच्या विलक्षण, विचक्षण, अमृततुल्य प्रेमाची माधुरी चरितकारांनी पूर्ण चाखलेली आहे. म्हणूनच ते भक्त-वाचकांना अधिकारवाणीने सांगतात -

**गुरूचि जेव्हा धरती हाती ।**
**तैंचि उद्धरती जड जीव ॥८०॥**

- अ. ८

आणि म्हणूनच खऱ्या सद्‌गुरूची कास धरा, हात धरा, पाय धरा, त्याला सोडू नका, असा कळकळीचा उपदेश ते साऱ्या साई-चरितातून, शब्दाशब्दातून अधिकारवाणीने प्रगट करीत आहेत -

सद्गुरूला ओळखण्याच्या खुणा सांगत आहेत -

**क्रोध ज्याचा घेई न वारा ।**
**द्वेषास जेथें न लाभे थारा ।**
**डोळां न देखे जो उदरंभरा ।**
**साधु (सद्गुरू !) खरा तो**
**समजावा ॥११६॥**

- अ. ३०

गुरूकृपेचा नवलावा विलक्षण आहे, कारण कठोर हृदयातही विलक्षण प्रेमओलाव्याने दाट प्रेमफुलांचा ताटवा फुलतो.

चरितकारांचा गुरूप्रेमाचा उमाळा उत्कट आणि प्रेमभावपूर्ण आहे. देवालये, मठ बांधण्यापेक्षा भक्ताने आपल्या हृदयात सद्गुरू-चरित्राचे पाठ गावेत, असे ते सुचवितात. ध्यान, भजन, अर्चन यांनी प्राप्त होणारे सर्व पुण्य केवळ सद्‌गुरूच्या नामकीर्तनाने, भजनाने प्राप्त होते. आपली शक्ती असेल तशी 'भक्ती' असावी, असे चरितकार अध्याय ३, ओ. २८ यात पूर्ण अधिकारवाणीने उपदेशीत आहेत. साक्षात् सद्‌गुरू-अधिकाराला ते पूर्णपणे पोहोचले आहेत याची जाणीव साईगुरू-वर्णनाच्या प्रत्येक शब्दातून व्यक्त होत आहे.

**शिष्य ही करिता निजगुरूभजन**
**निजगुरूसमान तो होय ॥१०६॥**

**गुरूचि जेव्हा धरती हाती**
**तैंचि उद्धरती जड जीव ॥८०॥**

- अ. ८

श्रद्धाळू भक्त श्री. साठे यांना बाबा सद्‌गुरूंनी आज्ञा केलेली आहे -

**वाचिता ही गुरूची पोथी**
**भक्त होती निर्मळ ॥५६॥**

- अ. १८

गुरूकृपा नसेल तर कोणतेच कार्य आपल्या हातून पूर्ण होणार नाही. संसारातील माया-मोहातच आपण गुंतून जावू -

**चहू वेदांचे जे सार ।**
**तेंच उपनिषदांचे भांडार ।**
**हरिगुरूकृपा नसलियावर ।**
**अति दुस्तर गाठावया ॥१९॥**

- अ. २०

**गुरूकृपा नसता सांकडे ।**
**गुप्त प्रमेय हातीं न चढे**

**तेंच जो गुरूपदी जडे**
**तयाचिया दृष्टीपुढे**
**आपेआप उघडे गूढार्थ ॥२२॥**

- अ. २०

सद्‌गुरू साईनाथांनी भक्त मानकर यांना

शिरडीतून मच्छिंद्र गडावर जाण्याची आज्ञा केली, त्यावेळी त्यांच्या मनात 'गुरुदर्शना'विषयी संशय निर्माण झाला, परंतु बाबांनी त्यांना पूर्ण आश्वासन दिल्याने त्यांना सद्‌गुरुआशीर्वाद व मन:शान्ती यांचा लाभ झाला -

**परी न भक्तें धरावा अल्प।**
**निजगुरुवचनी ऐसा विकल्प ॥**

मानकरांनी नंतर बाबांची पूर्ण क्षमा मागितली. त्यांना बाबांनी गडावर पूर्ण साक्षात्कार देवून आशीर्वाद दिला व या भवसागरातून मुक्त केले.

बाबा स्वत: अध्यात्माचे पूर्ण अधिकारी असतानादेखील जव्हार अली याचे त्यांनी शिष्यत्त्व पत्करुन तत्कालीन भक्तजनांसमोर निष्ठावन्त भक्त-शिष्याचे उत्तम उदाहरण ठेवले आहे.

तसेच बाबांनी उपदेशिले की सद्‌गुरुंनी मागितलेली दक्षिणा भक्ताने तात्काळ दिली पाहिजे, कारण त्यातच भक्ताचे हित असते, दानपुण्य प्राप्त होते.

**दक्षिणेची काय किंमत।**
**साधावया गुरु वचनार्थ।**
**प्राण ही द्यावया नाही जो उद्यत।**
**त्याचा परमार्थ कायसा ॥**

जसे सद्‌गुरु अनेक, तसेच भक्तही अनेक. जसे उत्तम, मध्यम, अधम 'गुरु' असतात, तसेच उत्तम, मध्यम, अधम भक्त-शिष्यही असतात. वैराग्य, विवेक नाही त्याला गुरुकृपा मिळत नाही, पण जो गुरुशी एकरूप होतो त्याला प्रत्यक्ष गुरुमाऊली-ईश्वरच सहाय्य करतो -

**तरी जो गुरुपदी निरंतर।**
**इच्छा तयाची पुरवी ईश्वर।**
**निश्चळ निष्काम करी सत्त्वर।**
**तो परात्पर सोइरा ॥१९१॥**

- अ. २३

अनुग्रह-आज्ञा-तत्पर भक्त-शिष्याला सद्गुरुसिद्धी तात्काळ मिळते. सॉलिसिटर काका दीक्षितांना (लंगडेकाकांना) 'उत्तम भक्त' म्हणून सद्गुरुंनी, बाबांनी गौरविले, प्रसिद्धीस आणले.

**सद्गुरुसी शरण गेले।**
**सद्गुरुरूपचि ते जहाले।**
**सैंधव सिंधुस्नानार्थ रिघाले**
**ते काय निघाले बाहेरी ॥२००॥**

- अ. २३

कच्चा गुरु, कच्चा चेला, पक्का गुरु, पक्का चेला, गुरुदृष्टी, गुरुचरणांशी दिव्य दृष्टी इत्यादी गुरुलक्षणांबाबत सद्‌गुरु साईनाथांनी भक्तश्रेष्ठ हेमाडपंतांना पूर्ण ज्ञानी बनविले. सद्‌गुरुघरच्या खुणा, सद्‌गुरुयोग्यता ओळखण्याचे बुद्धी-ज्ञान बाबांनी त्यांना पूर्णत्वाने दिले -

**कृपा उपजलिया पोटी।**
**सद्गुरु देतील दिव्य दृष्टि।**

**कच्चा गुरु तो कच्चाही चेला।**
**परी जो पक्क्या गुरुचा केला।**
**द्वैती अबोला तयासी ॥१७३॥**

- अ. २७

गुरु आणि भक्त हे नित्य अविभक्त असतात म्हणूनच मानकर आनंदाने गडावर राहिले, तपाचरण आचरले. बाळाराम मानकर मच्छिंद्रगडावर गेले, गुरुवचनावर दृढ विश्वासून - अ. ३१

गुरुनाम-सामर्थ्यावर अढळ भक्ती ठेवून भक्त मानकर बाबांना अत्यंत प्रिय झाले.

भक्त बॅरिस्टर खापर्डे साईनाथ सद्‌गुरुंचे निष्ठावन्त भक्त होते. ते सद्‌गुरु-ब्रह्मतेज पूर्णपणे जाणत होते. बाबांपुढे ते नित्य नतमस्तक होत. या परमश्रेष्ठ साईगुरुच्या पक्क्या भक्ताविषयी त्यांचेच परममित्र-बंधु हेमाडपन्त आदरपूर्वक म्हणतात -

**खापर्डे नव्हेत सामान्य गृहस्थ।**
**अतिविद्वान मोठे प्रस्थ।**
**साई (गुरु) सन्निध जोडूनि हस्त।**
**पायीं मस्तक खालवीत ॥१४०॥**

**आंग्लविद्या पारंगत।**
**धारासभेत कीर्तिमन्त।**
**वक्तृत्वें सर्वांस हालवीत।**
**मूग ते गिळत साईं (गुरु)**
**पुढे ॥१४१॥**

- अ. २७

सद्‌गुरु साईनाथांनी स्वत:च्या सद्‌गुरुंची उफराटी रीति, पद्धत सांगून त्यांच्या परीक्षेला बाबा कसे आनंदाने उत्तीर्ण झाले ही कथा सांगून भक्त गोखलेबाईंना बाबांनी पूर्ण उपदेश देवून त्यांना भक्तिमार्गात स्थिर केले.

**खाली डोके वरती पाय।**
**टांगी उफराटे जैं गुरुराय।**
**तैं मज आनंद कैसा होय।**
**समर्थ गुरुमाय जाणाया ॥९०॥**

- अ. ३२

श्री सद्‌गुरु साईनाथ भक्ति-प्रेमाची ज्योत अंतिम श्वासानंतरही सर्व भक्त-हृदयात तेजस्वीपणे तेवत राहो, हीच सद्‌गुरु साईचरणी नित्य दृढ प्रार्थना आहे.

## श्री साईबाबा संस्थानतर्फे प्रकाशित दैनंदिनी (डायरी) तील दुरुस्ती

श्री साईबाबा संस्थानतर्फे श्री बाबांची दुर्मिळ व संग्राह्य चित्रे असलेली दैनंदिनी (डायरी) नेहमीप्रमाणे यंदाच्या वर्षीही प्रकाशित करण्यात आली. ती दैनंदिनी अत्यंत सुंदर, उपयुक्त व संग्राह्य असल्याचे अनेक भक्तांनी कळविले आहे.

या दैनंदिनीत नजरचुकीने राहून गेलेली एक त्रूटी श्री साईलीलाचे एक जागरूक वाचक व साईभक्त श्री. एच. एल. कुलकर्णी (नाशिक) यांनी आमच्या लक्षात आणून दिली आहे. ती अशी -

श्री गोंदवलेकर महाराज यांची पुण्यतिथी मार्गशीर्ष वद्य १९, दि. १७ डिसेंबर, ९५ रोजी आहे. नजरचुकीने आम्ही ती ३० नोव्हेंबर, ९५ रोजीच्या पानावरही छापली आहे. भक्तांनी नोंद घ्यावी, ही विनंती. श्री. कुलकर्णी यांना धन्यवाद.


**– संपादक**

## श्री साईबाबा संस्थान, शिरडी
### प्रकाशित फोटोंची यादी

| अनु-क्रमांक | फोटोचे नाव | आकार | किंमत |
|---|---|---|---|
| १. | दगडावर बसलेले बाबा (४ रंगात) | १४'' x २०'' | २.६० |
| २. | दगडावर बसलेले बाबा (४ रंगात) | पोष्टकार्ड | - |
| ३. | दगडावर बसलेले बाबा (४ रंगात) | २'' x ३'' | ०.२० |
| ४. | द्वारकामाई (४ रंगात) | १४'' x २०'' | २.६० |
| ५. | द्वारकामाई (४ रंगात) | १०'' x १४'' | १.३० |
| ६. | मूर्ती (४ रंगात) | १४'' x २०'' | २.६० |
| ७. | मूर्ती (४ रंगात) | १०'' x १४'' | १.३० |
| ८. | मूर्ती (४ रंगात) | ७'' x १४'' | ०.७० |
| ९. | द्वारकामाईत बसलेले बाबा (४ रंगात) | १४'' x २०'' | २.६० |
| १०. | द्वारकामाईत बसलेले बाबा (४ रंगात) | १०'' x १४'' | १.३० |
| ११. | द्वारकामाईत बसलेले बाबा (४ रंगात) | ७'' x १०'' | ०.७० |
| १२. | चेहरा फोटो (४ रंगात) | पोष्टकार्ड | ०.३० |
| १३. | पालखी (४ रंगात) | ७'' x १०'' | ०.७० |
| १४. | दगडावर बसलेले बाबा (काळा/पांढरा) | १४'' x २०'' | २.१० |

सर्व फोटोंकरिता पॅकिंग व पोस्टेजचा दर रु. ९.०० आहे.

## श्री साईंच्या पादुका केवळ शिरडी येथेच !



आज-काल बाबांच्या नावावर असंख्य ठिकाणी पादुका दिसतात. या पादुका म्हणजे नुसत्या पादुकांच्या प्रतिमा असतात. त्या बाबांनी वापरल्या असण्याचा प्रश्नच उद्भवत नसतो. तरीही त्या प्रतिमांच्या दर्शनासाठी हजारो भाविक गर्दी करतात. हा त्या पादुकाप्रतिमांचा प्रभाव नसून सामान्य माणसाच्या मनातील बाबांविषयीच्या श्रद्धेचा प्रभाव असतो. श्री साईबाबा संस्थान, शिरडीच्या व्यवस्थापन मंडळाने एका ठरावाद्वारे सर्व भाविकांना सूचित केलेले आहे की, श्री साईबाबांनी वापरलेल्या प्रत्यक्ष पादुका शिरडी येथे समाधीमंदिरातच असून तशा पादुका अन्यत्र कुठेही नाहीत, याची भाविकांनी कृपया नोंद घ्यावी.

Registered with the Registrar
of News-Papers in India
No. [illegible]

# श्री साईबाबा संस्थान, शिर्डी


## प्रकाशित पुस्तकांची यादी

| अनु-क्रमांक | पुस्तकाचे नाव | भाषा | किंमत | पॅकिंग व पोस्टेज |
|---|---|---|---|---|
| १. | श्री साई सत्चरित | मराठी | ४८.०० | १२.०० |
| २. | श्री साई सत्चरित | इंग्रजी | १८.५० | १०.०० |
| ३. | श्री साई सत्चरित | हिंदी | २४.०० | १०.०० |
| ४. | श्री साई सत्चरित | गुजराथी | २३.०० | १०.०० |
| ५. | श्री साई सत्चरित | कन्नड | २२.०० | १०.०० |
| ६. | श्री साई सत्चरित | तेलुगु | २७.०० | १०.०० |
| ७. | श्री साई सत्चरित | तामीळ | २७.०० | १०.०० |
| ८. | श्री साई सत्चरित | सिंधी | २२.०० | १०.०० |
| ९. | श्री साई सत्चरित पोथी | गुजराथी | ३१.०० | १२.०० |
| १०. | श्री साईलीलामृत | मराठी | ९.५० | १०.०० |
| ११. | श्री साईलीलामृत | हिंदी | १२.५० | १०.०० |
| १२. | श्री साईलीलामृत | गुजराथी | ६.६५ | ८.०० |
| १३. | अवतार व कार्य | मराठी | ६.८० | ८.०० |
| १४. | स्तवन मंजिरी | मराठी | १.०० | ८.०० |
| १५. | स्तवन मंजिरी | हिंदी | १.१५ | ८.०० |
| १६. | स्तवन मंजिरी | गुजराथी | १.३० | ८.०० |
| १७. | स्तवन मंजिरी | इंग्रजी | २.०० | ८.०० |
| १८. | सगुणोपासना (आरती) | मराठी | १.२५ | ८.०० |
| १९. | सगुणोपासना (आरती) | हिंदी | १.५० | ८.०० |
| २०. | सगुणोपासना (आरती) | गुजराथी | १.१० | ८.०० |
| २१. | सगुणोपासना (आरती) | तेलुगु | ४.६० | ८.०० |
| २२. | सगुणोपासना (आरती) | सिंधी | - | ८.०० |
| २३. | दासगणूकृत ४ अध्याय | मराठी | ३.०० | ८.०० |
| २४. | सचित्र साईबाबा | मराठी/इंग्रजी | - | ८.०० |
| २५. | मुलांचे साईबाबा | मराठी | २.०० | ८.०० |
| २६. | मुलांचे साईबाबा | इंग्रजी | २.६० | ८.०० |
| २७. | मुलांचे साईबाबा | हिंदी | २.०० | ८.०० |
| २८. | मुलांचे साईबाबा | गुजराथी | १.७५ | ८.०० |
| २९. | मुलांचे साईबाबा | तेलुगु | - | ८.०० |
| ३०. | रुद्राध्याय (अ. ११ वा) | मराठी | १.१५ | ८.०० |
| ३१. | साई दि सुपरमॅन | इंग्रजी | ६.७० | ८.०० |
| ३२. | साईबाबा ऑफ शिर्डी (भरुचा) | इंग्रजी | - | ८.०० |
| ३३. | साईबाबा ऑफ शिर्डी (प्रधान) | इंग्रजी | ३.५० | ८.०० |
| ३४. | रघुनाथ सावित्री भजनमाला | मराठी | - | १०.०० |
| ३५. | खापर्डे डायरी | इंग्रजी | ११.०० | १०.०० |

मे-जून, १९९५ रु. ८

# श्री साईलीला

श्री साईबाबा संस्थान, शिरडीचे अधिकृत नियतकालिक



# श्री साईबाबा संस्थान, शिरडी

## विश्वस्त मंडळ

श्री. ह. म. सुकथनकर

(अध्यक्ष)

श्री. मोहन सी. जयकर

श्री. रमेश हर. सोनी

श्रीमती रेखा म. शिंदे

श्री. प्रकाश प. कराडपाटील

श्री. मुकेश र. पटेल

श्री. मधुकर ह. जोशी

श्री. प्रकाश धी. वैशंपायन

श्री. मधुकर ज. गर्दे पाटील

श्री. देवकीनंदन सारस्वत

श्री. अप्पासाहेब खं. कोते

श्री. रामनाथ ग. शिंदे

श्री. भास्कर शं. बोरावके

श्री. अण्णासाहेब सा. म्हस्के पाटील

श्री. इस्माइल हि. पटेल

श्री. रवींद्र दु. पैठणे

श्री. संभाजी कि. काळे

श्री. अशोक शि. खांबेकर

सौ. प्रेमाबाई सी. शहा

श्री. रामचंद्र शि. गोसावी

श्री. प्रभाकर तु. बोरावके

श्री. सोपान मा. थोरे

# श्री साईलीला

श्री साईबाबा संस्थान,
शिरडीचे अधिकृत नियतकालिक

वर्ष ७४ अंक २-३

मे-जून १९९५

संपादक
**द. म. सुकथनकर**

कार्यकारी संपादक
**विद्याधर ताठे**

अक्षर जुळवणी व ऑफसेट छपाई
गीता ऑफसेट, वडाळा, मुंबई.

कार्यालय
'साईनिकेतन', ८०४-बी, डॉ. आंबेडकर मार्ग,
दादर, मुंबई - ४०० ०१४.
दूरध्वनी : ४१२२५६१

वार्षिक वर्गणी - रु. ५०/-
आजीव सभासद वर्गणी - रु. १,०००/-
परदेशाकरिता वार्षिक वर्गणी - रु. १,०००/-
(टपाल खर्चासहित)
किरकोळ अंक - रु. ८/-

मुद्रक, प्रकाशक द. म. सुकथनकर, अध्यक्ष, श्री साईबाबा संस्थान, शिरडी यांनी हे नियतकालिक, 'साईनिकेतन', ८०४-बी, डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई - ४०० ०१४ येथे छापून तेथेच प्रसिद्ध केले.


या नियतकालिकातील लेखांत प्रसिद्ध झालेली मते ही त्या लेखातील लेखकांची स्वतंत्र मते असून त्या मतांशी संपादक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही.

## संपादकीय

मे-जून, ९५ चा प्रस्तुत अंक आपल्या हाती देताना मला एका कार्यपूर्तीचा व या माध्यमातून होणाऱ्या आपल्या भेटीचा आनंद होणे अगदी स्वाभाविक आहे. अंकांना होणारा विलंब ही निश्चितच खेदाची गोष्ट आहे, पण अपरिहार्य कारणांमुळे विस्कटलेली घडी बसविणे हे काम किती जिकीरीचे असते हे आपण जाणताच. आपले सहनशील सहकार्य हे जणू श्री साईबाबांचेच आशीर्वाद आहेत असे मी मनोमन समजतो.

प्रस्तुत अंकात आम्ही बारा ज्योतिर्लिंगांपैकी दक्षिणेतील कैलास म्हणून ओळखल्या जाणाऱ्या **श्रीशैल** येथील **मल्लिकार्जुनाची** माहिती दिली असून **पत्रकार विद्याधर ताठे** यांनी लिहिलेले काश्मीरमधील **अमरनाथ यात्रेचे** महात्म्यही आपणास निश्चित आवडेल असे वाटते. त्याशिवाय **नाममहात्म्य-अग्निहोत्र** आणि **महाराष्ट्रातील नाथसंप्रदाय** हे लेखही उद्बोधक ठरावेत असे आहेत.

श्री साईबाबांच्या प्रेरणेने अनेक भक्तांना काव्याचे स्फूरण येते आणि अशी काव्ये आमच्याकडे येतात. त्यापैकी प्रस्तुत अंकात काही कविता दिल्या आहेत. त्यातील भाव अनेक भक्तांना आपल्या भावभावनांशी सुसंवादी वाटेल असे वाटते.

श्री साईबाबांचे अनुभव हे तर भक्तांच प्रचितीचे बोल असतात. विविध प्रसंगात विविध रूपात भक्तांना बाबांचे दर्शन घडत असते. त्या साईलीलांचे वर्णन अनंत व अगाध आहे. शब्द तेथे तोकडे आहेत. भक्तांचे काही अनुभव नेहमीप्रमाणे या अंकात दिलेले आहेत.

एप्रिल महिन्यात शिरडी येथे झालेल्या चैत्र प्रतिपदा आणि रामनवमी उत्सवाचे सचित्र वृत्त या अंकात दिले असून त्याद्वारे अनेकांना घरबसल्या शिरडीत जावून आल्याचा आनंद लाभणार आहे. नेहमीप्रमाणे श्री साईलीलाचा हा अंकही आपण गोड मानून घ्याल असा विश्वास आहे.

**– द. म. सुकथनकर**
मुख्य संपादक

## लेखक-कवी आणि भक्तांना नम्र निवेदन

लेखक-कवी आणि भक्तांनी आपले लेख-कविता-अनुभव 'श्री साईलीला'साठी जरूर पाठवावेत. त्यांचे सहर्ष स्वागतच आम्ही करू. परंतु ते साहित्य पाठविताना खालील सूचनांचे पालन करावे ही विनंती -

★ लेख-कविता या अध्यात्मिक-पारमार्थिक विषयावरच असणे आवश्यक आहे. सामाजिक विषयाचा उद्देश उद्बोधक व समाजहितैषी असेल तरच त्याचा विचार होईल.

★ लेख-कविता-अनुभव हे कागदाच्या एकाच बाजूस पुरेसा समास सोडून लिहावेत. पाठपोट लिहिलेले साहित्य स्वीकारले जाणार नाही.

★ लेख-कविता-अनुभव यांची हस्तलिखित या टंकलिखित मूळ प्रतच पाठवावी. झेरॉक्सप्रत पाठवू नये.

★ अनुभव कथनामध्ये ते श्री साईबाबांशी संबंधितच असावेत. तसेच ते इतरांना वाचण्यासारखे असावेत. अत्यंत खासगी स्वरूपाचे अनुभव पाठवू नयेत. अनुभव कथनाचे लेखन विज्ञानयुगाचे भान ठेवून केले जावे.

★ कोणतेही साहित्य आमच्याकडून पोस्टेज खर्च करून परत पाठविले जाणार नाही तरी आपल्या साहित्याची एक प्रत स्वत:कडे जरूर ठेवावी.

★ साहित्य मिळाल्याची पोच, ते मिळताच पाठविली जाते आणि योग्य मजकूर नजिकच्याच अंकात प्रसिद्ध केला जातो.

★ लेखासमवेत आवश्यक ते फोटोग्राफ-चित्रे जरूर पाठवावीत.

**संपादक**
श्री साईलीला

# अमरनाथ यात्रा : श्रद्धा-निष्ठांचे विराट दर्शन

- विद्याधर ताठे

'श्री साईलीला'चे कार्यकारी संपादक श्री. विद्याधर ताठे, पत्रकार म्हणून नुकतेच काश्मीरमधील 'अमरनाथ यात्रा' पाहून आले आहेत. काश्मीरमधील पाकधार्जिण्या दहशतवादी संघटनांनी दिलेली धमकी, विदेशी पर्यटकांचे अपहरण व अतिरेक्याच्या कारवाया या पार्श्वभूमीवर यंदा 'अमरनाथ यात्रा' सुखरूप पार पडणार का ? अशी सर्वांनाच चिंता होती. भारत सरकारने सेना तैनात करून सर्व खबरदारी घेतली होती. आणि सेनादलाच्या सुयोग्य नियंत्रणामुळेच यंदाची यात्रा सुखरूप पार पडली. याबद्दल सेनादलाच्या जवानांचे करावे तेव्हढे कौतुक थोडे आहे. अशा या यात्रेच्या धार्मिक महात्म्याचा हा प्रथम लेखांक.



काश्मीरमधील अमरनाथ गुहेतील शिवलिंग

## पूर्वार्ध

### अमरनाथाचे महात्म्य

चत्वा रिशंदथापि पंचगिरिशा:
षष्टिश्च चक्रायुधा: ।
ब्रह्माणास्त्रय इत्यनादिनिधना:
द्वाविशन्ति: शक्तय: ।
नीलादीनि शतानि सप्त
फणिनां तीर्थोकसा कोट्यो ।
विख्यालाश्च चतुर्दशोत्तमतरा:
काश्मीर भूमण्डले ॥

काश्मीर प्रदेशामध्ये ४५ शिवधाम, ६० विष्णुधाम, ३ ब्रह्माधाम, २२ शक्तिधाम, ७०० नागधाम तथा अनेक तीर्थे आहेत. त्यामध्ये १४ तीर्थ अत्यंत महत्त्वाची मानली गेली असून त्या सर्वांमध्ये **'अमरनाथ'** विशेष महत्त्वाचे मानले जाते.एवढेच नव्हे तर काशी येथील लिंगदर्शनाच्या दसपट, प्रयागच्या शंभरपट आणि नैमिष्यारण्य - कुरुक्षेत्र तीर्थांच्या हजारपट अधिक पुण्यफल एका अमरनाथ यात्रेने लाभते. अशाप्रकारे अनेक प्राचीन ग्रंथामध्ये 'अमरनाथ यात्रेचे' महत्व सांगण्यात आलेले आहे.

### अमरनाथाचे वैशिष्ट्य

अमरनाथ हे ठिकाण काश्मीर प्रांतातील बर्फाच्छादित पर्वतावर असून १५,५०० फूट उंचावर आहे. **'नाही स्थापिला नाही बैसविला'** असे पंढरीतील पांडुरंगाच्या स्वयंभू मूर्तीचे वर्णन केले जाते. हेच वर्णन शब्दश: अर्थाने अमरनाथाचे आहे. येथे आपण ज्या शिवलिंगाचे दर्शन घेऊन धन्य

होतो ते लिंग हे पूर्णत: बर्फाचे असून ना ते कोणी केलेले असते, ना कोणी रचलेले असते. हे लिंग १५ हजार फूटावरील एका गुहेमध्ये आपोआप तयार होत असते. गुहेच्या छतातून थेंब थेंब झिरपणाऱ्या पाण्याचा बर्फ होऊन हे लिंग तयार होते. आषाढ अमावस्या ते श्रावण पौर्णिमा या काळात हे लिंग पाहता येते नंतर ते वितळून जाते असे म्हणतात. हे लिंग ७ ते ७॥ फूट उंचीचे असते व हळूहळू वितळत कमी कमी होत जाते. त्या गुहेत इतरत्रही पाणी झिरपते पण एका विशिष्ट ठिकाणीच ते थेंब बर्फ होतात व लिंग तयार होते.

बर्फाचे हे लिंग निसर्गाचा अतर्क्य असा विस्मयकारक चमत्कार असून **'निसर्गो देवो भव ।'** एवढेच प्रार्थनेचे शब्द आपल्या तोंडी येऊ शकतात. निसर्गातील धरती, अग्नि, आकाश, वारा, पाणी या पंचमहाभूतांना आपण देव मानतोच. त्यातील वरूण देवतेचे वरील बर्फाचे लिंग हे एक दर्शन असून ह्याचा आकार शिवलिंगासारखा असल्याने ते विश्वेश्वर शिवशंकराचे मूर्तीरूप मानले जाते. त्या



**अमरनाथ यात्रेचा निसर्गरम्य पण खडतर मार्ग आणि भाविक भक्त**

लिंग दर्शनाचे वर्णन व त्याचा स्वर्गिय आनंद शब्दात सांगता येणे कोणा शब्दपंडितालाही अशक्य कोटीतील गोष्ट आहे. **धन्यता म्हणजे काय ?** असे जर कोणी विचारले तर **अमरनाथाचे दर्शन घेतल्यावर मनाला प्रतित होते ती;** असे उत्तर अधिक योग्य - नेमके ठरणारे आहे. धन्यतेचा-कृतार्थतेचा अनुभव ज्यांना ज्यांना घ्यायचा आहे त्यांनी त्यांनी अमरनाथाचे दर्शन घेतले पाहिजे.

भारतातील सर्वात अवघड तीर्थयात्रा म्हणून अमरनाथ यात्रेचे वर्णन केले जाते. यापेक्षा अधिक अवघड बिकट तीर्थयात्राच नाही. त्यामानाने बद्रीनाथ, केदारनाथ, गंगोत्री-जमनोत्री यात्रा अगदी सोप्या आहेत. दुसरी गोष्ट म्हणजे केदार-बद्रीनाथला दर्शनास दरवर्षी ३-४ महिन्याचा अवधी असतो पण अमरनाथाचे दर्शन वर्षातून केवळ एकदाच व तेही ठराविक १५ दिवसातच. एरवी तेथे जाणे अशक्य असते. अशाप्रकारे अमरनाथ यात्रा ही भारतातील एक वैशिष्ट्यपूर्ण अशी यात्रा आहे. या यात्रेचे धार्मिक महत्व तर आहेच त्यापेक्षाही निसर्गाच्या विविधतेची असंख्य-अनंत रूपे पाहून आपणास विराट रूप दर्शनाचे अर्जुनभाग्यच लाभते. आपला अहंकार त्या विराटरूपापुढे क्षणार्धात गळून पडतो, काम-क्रोध-मद-मत्सर अशा क्षुद्र भावाचाही जागच्या जागी थिजून बर्फ होतो. आपण (मनुष्यप्राणी) विराट निसर्गातीलच एक यत्किंचित घटक आहोत अशी मनोमन जाणीव होते. अशी जाणीव हीच परमार्थाची - अध्यात्मजीवनाची पहिली पायरी आहे. अशी जाणीव व्हावी म्हणून संतश्रेष्ठ तुकाराम महाराज म्हणतात -

**लहानपण देगा देवा ।**
**मुंगी साखरेचा रवा ॥**

तर ज्ञानेश्वर महाराज आपल्या ज्ञानेश्वरीत म्हणतात -

**जगा जै धाकुटे होईजे ।**
**तै जवळीक माझी ।**

## अमरनाथाचा मार्ग

अमरनाथ यात्रेला जाण्याचा काळ आषाढ अमावस्या ते श्रावण पौर्णिमा असा फक्त १५ दिवसाचा असून या बिकट अशा यात्रेला जाण्याचे दोन मार्ग आहेत. (१)

जम्मू-श्रीनगर-सोनमर्ग-अमरनाथ असा एक मार्ग असून अतिरेक्यांच्या कारवायामुळे हा मार्ग बंद करण्यात आलेला आहे. (२) दुसरा मार्ग हाच यात्रेचा मुख्य मार्ग असून यात्रेस निघणारी साधूसंतांची **'पवित्र छडी'** याच मार्गाने अमरनाथास जाते. तो मार्ग असा - जम्मू ते पहलगाम, पहलगाम ते चंदनवाडी आणि चंदनवाडीहून पुढे चालत वा घोड्याने पिसूघाटी-शेषनाग-पंचतरणी मार्गे अमरनाथला जातात.

जम्मू ते पहलगाम व पहलगाम ते चंदनवाडी हे अंतर आपणास बसने व मिनीबसने पार करता येते. चंदनवाडीच्या पुढे मात्र पायी वा घोड्यानेच जाता येते. वृद्धांसाठी डोली-कंडी आदी सोई आहेत. चंदनवाडी ते अमरनाथ गुहा हे अंतर ३२ कि.मी. असून वाटेत शेषनाग वा पंचतरणी येथे एक मुक्काम करून दोन दिवसात ही यात्रा घोड्याद्वारे करता येते. पायी जाऊन येण्यास मात्र पाच दिवस लागतात.

चंदनवाडी, शेषनाग, पंचतरणी येथे मुक्कामासाठी सेनादल, राखीव पोलीस दल व जम्मू-काश्मीर पर्यटन विभाग यांच्यातर्फे तंबू (राहुट्या) मिळतात. त्याचे भाडे नाममात्र २५ ते १०० रु. असते. या भागातील सर्व शिखरे बर्फाच्छादित असतात त्यामुळे खूप गारठा असतो. गरम कपड्याअभावी निभाव लागणे कठीण असते. अर्थात तेथे भाड्यानेही ब्लँकेट मिळतात.

## लंगरांची रेलचेल

चंदनवाडी ते अमरनाथ यात्रेकरूंना खाण्यापिण्याची सोय करण्याची गरज नसते कारण प्रत्येक ठिकाणी **'लंगर'**मध्ये मोफत खाद्यपदार्थ व चहा मिळतो. ज्या ठिकाणी स्वत:चे सामान घेऊन जाणेसुद्धा ओझे वाटते अशा ठिकाणी पंजाबमधील हिंदु बांधवांच्या विविध समित्या अन्नछत्र (लंगर) चालवितात. गरमागरम पुरीभाजी, शिरा, जिलेबी, पुलाव, डाळभात, पकोडे आदी विविध पदार्थ हे लोक मोफत व सन्मानाने बोलावून देतात. यात्रेकरूंनी अन्नछत्राचा लाभ घ्यावा अशी हात जोडून विनंती करतात. त्या मंडळींचा सेवाभाव व पदार्थांचा दर्जा पाहून भाविकभक्त थक्क होऊन जातात. एकेक समिती यात्रेच्या काळातील एकेका लंगरवर ५ ते १० लाख रुपये खर्च करीत असते. आणि हा सर्व पैसा पंजाबमधील उद्योजक-व्यापारी दरमहा ठराविक रक्कम धर्मार्थ बाजूस काढून ठेवून करीत असतात. काशी-प्रयाग-नाशिक-पंढरपूर याठिकाणी अन्नदान करणे फार सोपे आहे पण बाराहजार-पंधराहजार फूट उंचीवर, बिकट परिस्थितीत, प्रतिकूल हवामानात एवढी प्रचंड सामुग्री घोड्यावर लादून न्यायची व शिजवून वितरण करायची ही गोष्ट अत्यंत अवघड आहे. आणि तरीही तेथे लंगरांची (अन्नछत्राची) रांग पाहून मन कृतज्ञतेने भरून येते. केवळ अन्नच नव्हे तर ज्याला पाहिजे त्यास पिण्यासाठी गरम पाणी व पेलाभर नव्हे, चक्क थर्मास भरून चहा देण्याची त्या मंडळींची भावना सेवाभावाचे एक वंदनीय रूप आहे. **'भूकेलेल्या अन्न - तहानलेल्यास पाणी जय बर्फानी'** अशी घोषवाक्ये लंगरच्या फलकावर असतात. बर्फानी म्हणजे बर्फाची पिंड असलेला भोले बाबा अमरनाथ. अनेक लंगरांच्या समितीचे नाव 'बर्फानी सेवा मंडळ', 'बर्फानी सेवा समिती' असेच आहे. आणि बहुतेक मंडळे पंजाबमधीलच



**पहलगाम येथील लिडर नदीचे दृश्य**

आहेत हे विशेष.

## अपूर्व निसर्ग दर्शन

जम्मूहून निघून भाविक सर्वप्रथम **'पहलगाम'** येथे येतात. हे गाव **'लिडर'** नदीच्या काठी विलसित झालेले आहे. येथील रम्यता पाहण्यास आपले दोन डोळे अपुरे ठरतात. क्षणाक्षणाला रूप बदलत अनंत रूपांनी इथे निसर्ग आपणास दर्शन देतो. **हिरवे हिरवे गार गालिचे। हरिततृणांच्या मखमलींचे।** या बालकवीच्या काव्यपंक्ती येथे मूर्त झाल्याचे दिसते. निसर्गाचे ते मनमोहक रूप पाहून कोणीही कवी होऊ शकतो. काव्य त्याला प्रतित होतं, फक्त ते अक्षररूप घेत नसतं एवढंच. 'राहिले ओठातल्या ओठात वेडे, शब्द माझे !' असे गुणगुणत तो निसर्गातून झरणारे काव्य डोळ्याने-कानाने-मनाने आनंदाच्या कुपीत साठवित असतो. अमरनाथाच्या गुहेत पार्वतीला गूढज्ञान देण्यासाठी निघालेल्या शिवशंकरानी आपला प्रिय नंदी या गावात सोडून दिला. म्हणून या गावास बैलगाव, पहल (काश्मीरी भाषेत बैल) गाम (गाव) नाव पडले असे सांगतात.

पहलगामहून १६ कि.मी. अंतरावरील 'चंदनवाडी' येथे भाविक छोट्या मिनीबसने येतात. चंदनवाडी सुमद्रसपाटीपासून सुमारे ८,५०० फूट उंचीवर असून या ठिकाणी शिवशंकरांनी आपल्या डोक्यावरील चंद्राला अर्धचंद्र दिला म्हणून या ठिकाणाचे नाव चंदनवाडी असे पडले असे सांगतात. येथे भाविक घोडे भाड्याने घेतात व पुढील यात्रेचा प्रारंभ करतात. यात्रेला येणाऱ्यांपैकी ६० टक्के भाविक हे सर्व यात्रा पायी करतात. त्यामध्ये लहान-मोठे, तरूण-वृद्ध असे सर्वजण असतात. अनेक वृद्धांना विशेषत: वृद्ध महिलांना हातात काठी घेऊन चालताना पाहून आपणास घोड्यावरून यात्रा करीत असल्याची मनोमन खंत वाटते. शर्मेने मान खाली झुकते.

## पिसूघाटी: एक अग्निदिव्यच

चंदनवाडी ते शेषनाग हे अंतर १३ कि.मी. असून मध्ये पिसूघाटी नावाचा प्रचंड महाकाय असा खडा पर्वत आहे. हा पर्वत चढून जाणे यात्रेतील एक **दिव्यकर्म** आहे. बऱ्याच वेळा घोड्यावरून आपणास खाली उतरून पायी चालावे लागते. या घाटात देवांनी दैत्यांना ठार केले. एकेका दैत्याच्या महाकाय मृतदेहाची एकेक शिला होऊन हा महाकाय पर्वत तयार झाला अशी एक समजूत आहे. पिसूघाटी पार करण्याचे दिव्य कार्य करून आपण ज्या पर्वतसपाटीवर पोहोचतो तेथील उंची ११,७३० फूट एवढी आहे. येथे शेषनाग नावाचे भले मोठे सरोवर असून एवढ्या उंचीवर एवढे विशाल सरोवर व त्यावरून येणारा रक्त गोठवून टाकणारा वारा सारेच कार्य आश्चर्याने स्तंभित करून टाकते. अनेक जण अशा गारठ्यात सरोवरात स्नान करतात व पिसूघाटी चढल्याच्या क्षीण क्षणार्धात घालवितात. अमरनाथ गुहेत जाताना या ठिकाणी शिवशंकरांनी आपल्या गळ्यातील सर्प या ठिकाणी सोडून दिला म्हणून या सरोवरास 'शेषनाग' असे नाव पडले असे सांगतात. या ठिकाणी सरोवरात भोवतालच्या बर्फाच्छादित पर्वतांचे मनोहर प्रतिबिंब पडलेले दिसते. आणि एखाद्या गूढ चित्रपटातील. गूढदृश्यासारखेच सरोवराचे एकूण दृश्य भासते. या पर्वतावर बर्फाचे आकार शेषनागाच्या फण्यासारखे दिसतात म्हणून या ठिकाणास शेषनाग म्हणतात असेही काहींचे मत आहे.

शेषनागहून पुढील टप्पा म्हणजे पंचतरणी. हा टप्पाही १३ कि.मी.चा आहे. या टप्प्यात महागुणस् नावाचा उंच पर्वत आपणास चढावा लागतो. हा पर्वत १५,५०० फूट उंच असून यात्रेतील सर्वात उंच ठिकाण आहे. येथील थंडी रक्त गोठणारी असते. महागुणस हे काश्मीरी भाषेतील गणपतीचे नाव आहे. या पर्वतावर शिवशंकर आपला प्रिय सुपुत्र गणेश यास सोडून अमरनाथ गुहेकडे प्रस्थान करतात अशी लोकांची समजूत आहे. हा पर्वत चढल्यानंतर मात्र उतारास प्रारंभ होतो ५-६ किलोमिटर उतारावरून जाताच आपण पंचतरणी या पाच नद्यांच्या संगमावरील सपाट किनाऱ्यावर येतो.

## निसर्गाचे रौद्र रूप

पंचतरणीच्या किनाऱ्यावरून अमरनाथाची गुहा ६ कि.मी. दूर असून यापुढील पर्वताची चढाई एकदम खडी असून अत्यंत अरूंद आहे. एकीकडे प्रचंड पर्वत व दुसरीकडे हजारो फूट खोल दरी अशा निसर्गाच्या भयंकर रूपाच्या दर्शनाने छातीचे ठोके वाढलेल्या अवस्थेतच आपण **'जय भोलेनाथ'** म्हणत अमरनाथ गुहेकडे जात असतो. दरीचे रौद्र रूप पाहून अनेकांना चक्कर येते पण भोलेनाथावरील ठाम निष्ठा-श्रद्धा यांच्या बळावर हा टप्पाही भाविक पार करून जातात. दीड-दोन फूटांची पायवाट आणि चढणाऱ्या व उतरणाऱ्या घोड्यांची जा-ये. समोरून येणाऱ्या घोड्याचा जरा जरी धक्का लागला तरी तोल जाऊन हजारो फूट दरीत पडण्याची भीती **'आपुले मरण पाहिले म्या डोळा'** असाच तो क्षण असतो. पण ज्या देवाला आपण निघालो आहोत त्याचे नावच **'अमरनाथ'** आहे, मग तो आपणास असे कसे मरू देईल ? पण याविषयी भक्तांच्या मनात दृढ श्रद्धा-निष्ठा असावी लागते. दरवर्षी हजारो भाविक ही खडतर यात्रा करतात पण दरीत पडून मेल्याची घटना अभावानेच घडल्याचे दिसते. यावर्षी सुमारे ७० ते ८० हजार भाविकांनी ही यात्रा केली त्यामध्ये दरीत पडून एखाद्याचे निधन झाल्याची एकही घटना झालेली नाही. काही भाविक दगावतात पण ते थंडीने-आजारी पडून, अपघाताने नव्हे. ही गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे. यादृष्टिने अमरनाथाचे नाव अगदी सार्थ आहे असेच म्हणावे लागते.

पंचतरणीपासून अमरनाथ गुहेपर्यंत जाण्यास घोड्यावर दोन तास लागतात. अमरनाथांच्या मुख्य पर्वतावर गुहेच्या अलिकडेच अमरगंगा नावाची नदी असून तेथे स्नान करूनच भाविक दर्शनास गुहेत जातात. थंड गार बर्फाचे पाणी-थंडगार वारे दाट धुके, मधून मधून एखादी पावसाची सर अशा वातावरणात स्नानाची कल्पनाच अंगावर काटा आणणारी असते पण निष्ठावान भाविक जीवाची-प्रकृतीची पर्वा न करता अमरनाथाचे नाव घेत समर्पित भावाने स्नान करतात.

## दोन कबुतरांचे आश्चर्य

अमरनाथाची गुहा थोडी उंचावर असून २०-२५ पायऱ्या चढून जावे लागते.

(पृष्ठ क्र. १० वर)

# दक्षिण कैलास : श्रीशैल मल्लिकार्जुन

– म. वि. सामंत
डोंबिवली.

**भारतीयाच्या धर्मजीवनात १२ ज्योर्तिलिंगाचे स्थान काही आगळे–वेगळे आहे. या ज्योर्तिलिंगांचे महात्म्य अगाध आहे. आंध्र प्रदेशातील श्रीशैल येथील 'मल्लिकार्जुन' हे बारा ज्योर्तिलिंगांपैकी एक महत्त्वाचे स्थान असून छत्रपती शिवाजी महाराज यांनीही तेथे जाऊन ध्यानसाधना केलेली होती हे अनेकांना ठाऊक नसेल. अशा या ज्योर्तिलिंगांची महती सांगताहेत श्री. म. वि. सामंत.**

आंध्र प्रदेशातील कुर्नूल जिल्ह्याच्या श्रीशैल विभागाच्या डोंगर टेकड्याच्या आणि पाताळगंगेच्या परिसरांतील निसर्गरम्य भागांत श्रीक्षेत्र मल्लिकार्जुन वसलें आहे. म्हणून या क्षेत्राला दक्षिण कैलास अशीही संज्ञा आहे. श्री भगवान शंकरानी दिव्य अशा ज्योतिर्लिंग स्वरूपाने या ठिकाणी कायम वास्तव्य केलें म्हणून या भागाला खूप महत्त्व प्राप्त झाले आहे.

स्मशान क्रीडा करणारे, स्मशानवासी, विरक्त, निराकारी, वैराग्याचे महामेरू, अशी अनेक विशेषणे लावून ज्याच्या भक्तींत भक्त नेहमी दंग राहून तल्लीन होतात; व भक्तांच्या हितासाठीं व कल्याणासाठीं सदैव तत्पर असणारे भोलानाथ अर्थात भगवान शंकर या निसर्गरम्य पण दुर्गम भागांत आले कसे ? आणि या ठिकाणी वास्तव्य का केले ? ही गोष्ट अतिशय मनोरंजक आणि श्रद्धाळू भाविकांची उत्सुकता वाढवणारी आहे.

## कार्तिकस्वामींचा दृढनिश्चय

कार्तिकस्वामी हा भगवान शंकराचा मुलगा लग्न करण्याचे वयांत आला होता. त्याला सहा तोंडे होती म्हणून त्याला षडानन असेंहि म्हणत असत. तो आपल्या पित्याप्रमाणे शूर, निग्रही आणि विरक्त होता. लग्न करण्यापेक्षा ब्रह्मचर्य पालन करावे अशी दृढ मनिषा होती.

गिरीजा मातेने आपल्या स्त्रीसुलभ भावनेने सहज एकदा कार्तिकस्वामीचें लग्नाविषयीचं मत जाणून घेण्यासाठीं त्याला म्हणाली ''तूं लग्न करून एक चांगली बायको आण. मला सूनमुख पहाण्याची अनिवार इच्छा झाली आहे.'' असे म्हणून लग्न करण्याबद्दल त्याचें मत वळविण्याचा प्रयत्न करूं लागली. आणि त्याने विवाहबद्ध व्हावें, मनाजोगी सुंदर पत्नी मिळून आपणाला मानसिक समाधान मिळावें, सांसारिक जबाबदारीतून काही प्रमाणांत मुक्त व्हावे, नव्या सूनेचे काही कोडकौतुक करावे ही गिरीजा मातेची मनापासूनची जबरदस्त इच्छा होती.

ही आपल्या मनातील खरीखुरी इच्छा पूर्ण करण्यासाठी पार्वती मातेने षडाननाला मनोमन खूप विनवणी केली. आणि शेवटी कार्तिकस्वामीवर गिरजामातेने खुषीची सक्ति केली. त्यामुळें आपल्या प्रेमळ मातेला कांहीच उत्तर देतां येईना आणि आईचे मनही मोडवेना.

यासाठी कार्तिकस्वामी कोणालाही काहीही न सांगता एके दिवशी फार दूर अरण्यांत जायला निघाला. गिरी गव्हरांतून, निबिड अरण्यातून; जिकडे वाट दिसेल तिकडे जाऊन, अखेर निवांत जागीं जाऊन तो स्थिर राहीला.

गिरीजेपासून कार्तिकस्वामी दूर गेल्यावर ती अस्वस्थ झाली. ती त्याचा सगळीकडे शोध घेत राहिली. पण त्याचा ठावठिकाणा कोठेही मिळेना. अखेर विमनस्क मन:स्थितीत पार्वती माता ही षडाननाचा शोध घेत घेत, ज्या वनात कार्तिकस्वामी स्थित झाला होता त्याच जागी योगायोगाने आली. आई आणि मुलाची भेट झाली. त्यामुळे पार्वती मातेला मनस्वी आनंद झाला. जसें दशरथ नन्दन बारा वर्षांच्या खडतर वनवासानंतर अयोध्या नगरींत येऊन परत माता कौसल्येला भेटले तोच प्रसंग हा होता.

मात्र या पुढील काळात देवी पार्वतीने षडाननाला त्याच्या लग्नाबद्दल काही विचारलें नाही आणि आपल्या मनातून लग्नाचा जणू विचारच काढून टाकला.

## श्रीशैल पर्वताचा शोध

रागावलेल्या कार्तिकस्वामींचा, पार्वती माता शोध घेत आली, शैल शृंग प्रदेशांत येऊन पोचली. निसर्गरम्य आणि सुंदर वनश्री असलेल्या प्रदेशांत पार्वती माता आली. त्याठिकाणी भोळ्या स्वभावाचे निष्कपटी आणि सरळ मनाचे लोक वस्ती करून राहात असत.

त्या लोकांच्या भोळ्या भक्तिभावाला पार्वतीचे मन प्रसन्न होऊन ती आकृष्ट झाली व तिने आपले कायम राहाण्याचे ठिकाण याच ठिकाणी केले आणि ती या भागांत अखेर स्थिर झाली.

भगवान शंकर सदैव समाधी लावून बसत. ते त्यांतच खरा आनंद मानीत असत. पार्वती माता पुत्रशोधासाठीं बाहेर पडल्यावर भगवान शंकर समाधी अवस्थेतून जागृतावस्थेंत आले. तेव्हा नेहमीप्रमाणे हसतमुख राहून आपल्या नवऱ्याचे स्वागत करणारी पार्वती कोठें

जवळ दिसेना. खूप वेळ त्यांनी आपल्या पत्नीची वाट पाहिली. अखेर भोलानाथसुद्धा पार्वतीला पाहायला कैलास सोडून बाहेर पडले. आणि पार्वतीचा तपास करीत करीत तेही पार्वती ज्या ठिकाणी होती त्याच ठिकाणी आले. त्यांना सुंदर वनश्री असलेले, पुरेपूर नैसर्गिक सौंदर्य असणारे, मनमोहक ठिकाण खूपच आवडलें.

तेथील भोळीभाबळी सरळ स्वभावाची प्रामाणिक माणसें खूपच आवडली. त्या लोकांत भोलानाथ रमले. त्या ठिकाणीच पार्वती होती. तिने भोलानाथांना ओळखले. आपली ओळख मात्र तिने दाखविली नाही.

तिने सुंदर भिल्लीणीच्या वेषांत सांबसदाशिवापुढे नृत्य, गायन करायला सुरुवात केली. आणि आपल्या नेत्रकटाक्षाने भोळ्या सांबाला; म्हणजे भगवान शंकरांना मोहून टाकले आणि भिल्लीणीने त्यांना आपलासा करूनही घेतले. अर्थात सांबसदाशिव त्या भिल्लीणीचे पूर्ण अंकित झाले. या सर्व गोष्टीची तेथील निवासी आदिवासी लोकांना चांगलीच कल्पना होती. तेथील आदिवासी लोकांनी गिरीजा मातेला आपली कन्या मानली होती.

## श्रीशैल : दक्षिण कैलास

त्या आदिवासी लोकांनी गिरीजेचा आणि भगवान शंकराचा आपल्या पद्धतीने थाटामाटाने विवाह केला. या आदिवासी चेंचू जमातीने आपल्या आपल्या परीने महादेवांचा सत्कार करून त्यांना आपलासा करून घेतले. या भागांतच कायम वास्तव्य करण्याची विनंती केली. आणि महादेवानी तात्काळ संमति दिली व या ठिकाणी भगवान शंकर ज्योतिर्लिंगाचे रूपाने स्थित झाले. या ख्यातनाम ज्योतिर्लिंगाला दक्षिण कैलास मानतात.

भगवान शंकर गिरीजेसह शैलशृंग पर्वतावर स्थित झाले ते चेंचू जातीच्या आदिवासी जमातीमुळे. आदिवासी चेंचूजमात भगवान शंकराना आपला जावई (चेंचू - मल्लिहा) मानते. या ठिकाणी ज्योतिर्लिंगाचे महोत्सवांत चेंचू जमातीला अनन्यसाधारण महत्व आहे. अर्थात ज्योतिर्लिंग महोत्सवांत चेंचू जमातीचा खरा मान असतो.

**श्री शैल शृगे विबुधति संगे**
**तुलाद्रि तुंगेऽपि मुद्रा वसन्तम् ।**
**तमर्जुनं मल्लिक पूर्व मेकं**
**नमामी संसार समुद्र सेतूम् ॥**
**ज्योतिर्मय द्वादश लिंगकाना**
**शिवात्मना प्रोक्त मिदं क्रमेण ।**
**स्तोत्रं पठित्वा मनुजोति भक्त्या**
**फलं तदा लोक्य निजंभवेत ॥**

पूर्वी पांडवाचा भाऊ वीर धनुर्धर अर्जुन तीर्थाटन करीत या भागात आला. भोलानाथ शंकरांना त्याच्या क्षात्र तेजाची कसोटी पाहायची होती. एका रानडुकराची शिकार करीत शंकर अर्जुनाच्या रोखाने धावत आले. पण सव्यसाची अर्जुनाने आपल्या तीक्ष्ण बाणाने अगोदरच समोर आलेली शिकार टिपली होती.

## मल्लिकार्जुन कथा

या गोष्टीवरून किरात वेषी शंकर आणि अर्जुन यांच्यात मोठा विलंडवाद माजला. द्वंद्व जुंपले गेलं आणि अर्जुनाने शंकरांना जिंकले. तेव्हा भगवान शंकरांनी आपलें खरें रूप प्रकट करून ते अर्जुनाला प्रसन्न झाले व अर्जुनाला पाशुपत अस्त्राची देणगी दिली आणि शंकर अंतर्धान पावले. आणि त्या जागीं एक दिव्य ज्योतिर्लिंग प्रगट झाले. त्या लिंगाची स्थापना करून अर्जुनाने मनोमन उपासना केली. म्हणून या ज्योतिर्लिंगाला **'मल्लिकार्जुन'** असे नांव मिळाले.

परमपावन परमपवित्र ईश्वरनिष्ठ अशी चंद्रानना नांवाची एक राजकन्या वननिवासी बनून तप:साधना करीत असे. तिने एके दिवशी ध्यानधारणेला बसताना एक कपीला गाय, एका बिल्व वृक्षाखालीं उभी राहून आपल्या चारही सडांमधून दुग्धधारा सोडीत आहे, हाच प्रकार दोन-तीन वेळां पाहिल्यावर; ज्या ठिकाणी गाईने दूध सोडलें तिथे कुतुहलपूर्वक जागा खणून पाहिली आणि आश्चर्यचकित झाली.

जमीन खोदल्यावर खाली सूर्यासारखें तेजस्वी ज्योतिर्लिंग मिळालें. चंद्रावतीने त्या ज्योतिर्लिंगाची मनोभावें यथासांग पूजा करून चांगली आराधना केली. नित्यनियमाने मोगरा, जाई-जुई (मल्लिकार्जुनि) यांनी पूजा करीत असे. शिवाय या जागी चंद्रावतीने एक सुंदर शिवमंदिर बांधले. तिचा भक्तिभाव पाहून भगवान शंकर तिला तात्काळ प्रसन्न झाले आणि राजकन्या चंद्रावतीला मुक्ति देऊन तिला कैलासपदाला नेले. मंदिर प्राकारांतील एका भागांत चंद्रावतीची कथा कोरली आहे.

## अपूर्व निसर्गसौंदर्य

हा भाग प्रवासाला काहीसा दुर्गम आहे. परंतु संपन्न अशी वनश्री असून या कदली बिल्व वनांत मल्लिकार्जुनाचे पायाशी पाताळगंगेचे पात्र थोडेसे संथ आणि विशाल बनलें आहे. ह्या पाताळगंगेच्या विशुद्ध पाण्यात स्नान करून मल्लिकार्जुनाचें दर्शन घेणारे भक्त स्वत:ला कृतकृत्य आणि धन्य समजतात.

पुरातन कालाचे महत्व आजही सांगण्यासारखें म्हणजे सारे पुराणकाळांतील आणि इतिहासप्रसिद्ध लोकांनी या ज्योतिर्लिंगाची उपासना केली, दर्शन घेतलें, आणि ते कृतकृत्य झाले असा पुराण ग्रंथांत उल्लेख आहे.

श्री रामप्रभू, नारद, हिरण्यकश्यपू, पांडव इत्यादी सारे या दिव्य ज्योतिर्लिंगाचे दर्शन घेऊन पुनीत झालेत. तसेच नागार्जुन, बसवेश्वर, विठ्ठलपंत कुलकर्णी (ज्ञानेश्वर महाराजांचे वडील) इत्यादी इतिहासप्रसिद्ध लोकांनी या ठिकाणी तप:साधना केली, उपासना केली. अर्थात या ठिकाणी येऊन गेल्याचा पुरावा सापडतो.

ह्या तपोवन भूमीतील औषधी वनस्पतीचा शोध लावून आणि विशेषप्रकारें संशोधन करून आचार्यांनी रसपूट;

रसरत्नाकर यांसारखे दिव्य आणि महान ग्रंथ लिहीले आहेत.

## छत्रपती शिवाजी महाराजांची स्मृती

युगपुरूष छत्रपती शिवाजी महाराज या दिव्य ज्योतिर्लिंगाचे दर्शन घेण्यासाठी आले होते. त्यांनी शिवमंदिराचे उत्तरेकडे उजव्या बाजूस विशाल गोपूर बांधले आहे. एक अन्नसत्रहि चालू केलें होतें. गोपुराचे आतील भिंतीवर देवीने शिवरायांना तरवार दिली असें चित्र कोरलें आहे.

या प्रदेशांतील कदली बनांत पूर्वकाळीं स्त्रीराज्य होते. त्यांत गोरक्षनाथाचे गुरू मच्छेंद्रनाथ रमले, परंतु त्यांना त्यांच्या अंगीकृत कार्याची जाणीव करून देऊन गोरक्षनाथांनी परत नेले. आणि नाथपंथाची स्थापना केली. ही गोष्ट सर्वश्रुत आहे.

या ठिकाणी आपल्या भरभराटीच्या काळात विजयनगरच्या हिंदू राजांनी या ठिकाणी अनेक देवळें, ओवऱ्या, गोपुरे बांधली होती. तसेच साध्वी अहिल्यादेवी होळकर यांनी पाताळगंगेच्या काठीं भव्य प्रशस्त असा साडेआठशे पायऱ्यांचा घाट बांधला आहे.

अगदी अलिकडे भारताचे माजी पंतप्रधान माननीय श्री लालबहादूर शास्त्री यांनी या देवस्थानाला दर्शनाचे हेतूने जाऊन सरकारी खजिन्यातून भरघोस मदत दिली.

दत्तावतारी श्री नृसिंह सरस्वती स्वामी महाराजांनी आपलें अवतारकार्य संपविताना याच पाताळगंगेच्या परमपावन पवित्र पात्रांतून पुष्पशय्येवर बसून परतीरावर गेल्याची गोष्ट गुरूचरित्रांत उद्धृत आहे.

## वीरशैवांचा सिद्धमठ

लिंगायत लोकांचें श्रीशैल हें महत्वाचें स्थान असून तेथें पूर्वी वीरशैव सिद्धमठ होता. पाताळगंगेच्या परिसरांतील प्रत्येक खडयाला शिवलिंग मानून तें चांदीच्या पत्र्यांत मढवून प्रत्येक प्रत्येक लिंगायत श्रद्धापूर्वक आपल्या गळ्यांत घालतो.

पूर्वी येथील देवाचे पूजेचे अधिकार जंगम जमातीचे लोकाकडे होते. एकदां पांडवांचा भाऊ भीमसेन या भागांत फिरत आला आणि त्याला खूप तहान लागली. जवळपास कोठे पाणी सापडेना तेव्हा त्याने जमिनीवर एक गदेचा प्रहार केला. आणि पाण्याचा झरा निर्माण झाला. याला भीम-तोळा असें नांव आहे. हा अखंड पाण्याचा झरा म्हणजे अमृताचा झरा असें समजलें जाते.

हिंदू धर्माचे पुनरूद्धारक श्रीमत् आद्य शंकराचार्य हे येथें येऊन गेले. त्यांनी आपल्या पर्यटनाच्या वेळीं शैलस्थवासिनी देवीवर तिचें दर्शन घेऊन स्तुतिसुमनांचा वर्षाव केला.

**अन्नपूर्णे सदा पूर्णे शंकर प्राण वल्लभे ।**
**ज्ञान वैराग्य सिध्यर्थं**
**भिक्षां देहीच पार्वती ॥**
**माता देवी पार्वती पिता देवो महेश्वर: ।**
**बांधवा शिव भक्त्याश्च**
**स्वदेशो भुवनत्रयम् ॥**
**कदंब वन वासिनीम**
**कनक वल्लकी धारिणीम् ।**
**महार्ह भवती हरिणीम्**
**मुख समुल्ल सह्मरिणीम् ॥**
**दया विभवं कारिर्णाम्**
**विशद लोचनी चारिणीम ।**
**त्रिलोचन कुटुंबिनी**
**त्रिपुर सुंदरीऽमाश्रये ॥**

दिव्य तेजाने युक्त अशी भवानीसह महादेवांनी श्रीशैल पर्वतावर वास केला. येथील देवसरोवरांत श्रद्धेने व भाविक मनाने जो स्नान करील त्याला अश्वमेध यज्ञाचे पुण्य प्राप्त होईल. आणि बेचाळीस पिढ्यांचा उद्धार केल्याचा पुण्यलाभ होईल.

श्री मन्महाभारताच्या वनपर्वामध्ये श्रीशैल मल्लिकार्जुन परमपावन पवित्र या शिवस्थानाचे वर्णन पुढीलप्रमाणे आहे.

**श्रीपर्वत महादेवो देव्यासह महद्युति ।**
**व्यवसत परम प्रीती**
**ब्रह्माच त्रिदशै सह ॥**
**तत्र देव ह्रदे स्नात्वा**
**शुची प्रयत मानस: ।**
**अश्वमेध फलं वाप्नोति**
**कुलंचैव समुद्धरेत् ॥**

मल्लिकार्जुन ज्योतिर्लिंगाचें महात्म्य सांगताना -

**''श्रीशैल शिखरं दृष्ट्वा**
**पुनर्जन्म न विद्यते''**

असे सांगितलें जातें.

**ॐ नम: शैलशृंगाय तुभ्यं नमामि**

---

(पृष्ठ क्र. ७ वरून)
गुहेमध्ये एका ठिकाणी भींतीतून भस्म निघते हेही एक आश्चर्य मानले जाते. या ठिकाणचे आणखी एक आश्चर्यवत वैशिष्टय म्हणजे सभोवतालच्या ४० कि.मी. परिसरात बर्फामुळे एकही पक्षी आपल्याला आढळत नाही पण या गुहेत दोन कबुतरे दिसतात. ही कबुतरे शंकराचे शापित गण आहेत असे म्हणतात. ती कबुतरे दोनच असून गुहेच्या छताला असलेल्या खोबणीत बसून असतात. गेली कित्येक वर्षे भाविक त्यांचे दर्शन घेत आहेत. आजवर ना त्यांची संख्या घटली ना वाढली आहे. शिवपार्वतीचा गुप्त संवाद या गणांनी ऐकला म्हणून ते दोघे अमर झाले पण हा संवाद चोरून ऐकल्याने **'तुम्ही दोघे कबुतर व्हाल व या गुहेतच रहाल'** असा शंकरांनी त्यांना शाप दिला आहे अशी एक पुराणकथा प्रसिद्ध आहे. अमरनाथाच्या गुहेत समोर अमरनाथांचे बर्फाचे लिंग दिसते तर डावीकडे गणेश व उजवीकडे पार्वतीचे स्थान आहे.

महाकृच्छ चांद्रायण व्रतांचे पुण्य केवळ अमरनाथाच्या दर्शनाने लाभते. तसेच प्रयागसंगमी हजार गाई दान दिल्याचे पुण्य एका अमरनाथ यात्रेने मिळते अशी भाविकांची दृढ श्रद्धा आहे.

प्रस्तुत लेखात (पूर्वार्ध) आपण अमरनाथ यात्रेचे धार्मिक पौराणिक व नैसर्गिक महात्म्य पाहिले आहे. या यात्रेच्या सामाजिक-आर्थिक व राष्ट्रीय पैलूचा विचार पुढील लेखात (उत्तरार्ध) पाहूया. ॐ नम: शिवाय !

---

# महाराष्ट्रातील नाथसंप्रदाय

– गजानन कुलकर्णी
रत्नागिरी.

**नाथसंप्रदायातील सत्पुरुषांच्या वास्तव्याने – ध्यानाने व समाधीने महाराष्ट्रातील अनेक स्थळे पवित्र झालेली आहेत. त्र्यंबकेश्वर, कनिफनाथाची मढी; वृद्धेश्वर, अंबेजोगाई, पैठण, नाशिक, डुडुळगाव, दिवेघाट आदी ठिकाणे ही नाथ सत्पुरुषांनी पावन झालेली प्रमुख ठिकाणे असून या पंथाने भारतीय सांस्कृतिक इतिहासात मोलाची कामगिरी केलेली आहे. नाथपंथाच्या महाराष्ट्रातील कार्याचा साद्यंत आढावा वाचकांना अनेक नव्या गोष्टीचा परिचय करून देईल असे वाटते.**

महाराष्ट्रातील नाथसंप्रदायाचा विचार करताना ज्याच्यामुळे या संप्रदायाचे खरे संघटन आणि विकास झाला त्या सिद्धपुरुषाचा प्रथम विचार करणे महत्त्वाचे आहे. नवनाथामध्ये ज्यांना फार मोठे मानाचे स्थान आहे असा हा सिद्धपुरुष म्हणजे गोरक्षनाथ ! गोरक्षनाथ हे नाथपंथातले अग्रणी आणि उच्च तत्वज्ञानी सिद्धपुरुष म्हणून ओळखले जातात. नाथपंथाचा खरा विकास गोरक्षनाथांनीच केला. त्याआधीच्या काळात नाथपंथ अस्तित्वात होता. परंतु त्यात बौद्ध, जैन, तांत्रिक, महायान, हीनयान, मंत्रयान, वज्रयान आणि सहजयान इत्यादी पंथांची तत्वे शिरली गेल्याने तो काहीसा वाममार्गी बनलेला होता. ह्या साऱ्या वाममार्गी साधना गोरक्षनाथांनी निषिद्ध ठरविल्या आणि शुद्ध आचरणावर भर देणारे आपलं नवं वेगळं तत्वज्ञान त्यांनी या पंथात रूजवलं. नाथपंथाचं स्वरूप शुद्ध केलं आणि खऱ्या योगमार्गाचा अर्थ सर्वांना समजावून दिला.

गोरक्षनाथांचं तत्वज्ञान नाथपंथात अत्यंत मोलाचे समजले जाते. त्यांनी आपलं तत्वज्ञानविषयक संस्कृत, प्राकृत, हिंदी आणि इतर लोकभाषांमधून अगणित साहित्य निर्माण केले. योग्यांना अमोल मार्गदर्शन करणारे, योगांची रहस्ये उलगडून सांगणारे मोठमोठे विस्तृत ग्रंथ लिहीले; आणि ते सर्वांसमोर खुले केले. त्यांनीच योगाला ज्ञान आणि भक्तिची जोड दिली. किंबहूना ज्ञान आणि भक्तिला त्यांनी योगमार्गात आपल्या नाथपंथात एक आगळं आणि स्वतंत्र स्थान प्राप्त करून दिलं. त्यांच्या ह्या अमोल कार्याचं फळ म्हणजेच महाराष्ट्रात संत ज्ञानेश्वरांच्या काळात जन्माला आलेला आणि आज प्रचंड वृक्षाप्रमाणे वाढलेला 'वारकरी पंथ' आहे. ह्या वारकरी पंथाची मूळ बीजं गोरक्षनाथांच्या नाथपरंपरेतच रूजलेली आहेत.

अशा ह्या महानतम् योगी पुरुषाची गोरक्षनाथांची आज आपल्याला ओळख करून घ्यायची आहे. परंतु त्यांच्या कार्याचा आढावा घेण्याआधी त्यांनी ज्या काळात ह्या पंथाची वाटचाल नेटाने पुढे नेली त्या काळातील समाजस्थिती त्यांच्या तत्वज्ञानास पोषक होती कीं प्रतिकारात्मक स्वरूपाची होती याचा थोडासा आढावा घेणं उचित ठरेल. कारण त्यामुळेच त्यांच्या ह्या महानतम कार्याचं महत्व आपल्याला अधिक प्रकर्षाने कळून येणार आहे.

## गोरक्षनाथांचा कालखंड

गोरक्षनाथांच्या कालखंडाविषयीही बरीच मतभिन्नता दिसते. तरीपण संत ज्ञानेश्वरांचा कालखंड सन १२०० तला असल्यामुळे गोरक्षाचा कालखंड ९०० ते १००० मानायला कांहीच हरकत नाही. भारतीय इतिहासात हा कालखंड हर्षोत्तर कालखंड म्हणून ओळखला जातो. हा कालखंड सामाजिक विघटनासाठी आणि नाना जाति–जमातींच्या निर्मितीसाठी प्रसिद्ध आहे. जन्म, स्थान, व्यवसाय, संप्रदाय, धर्म, आचार, रिवाज, भोजन, विवाहसंबंध इत्यादी विविध कारणांनी नव्या नव्या जातींची निर्मिती होत राहीली. जैन व विशेषत: बौद्ध यांनी पारंपारिक वर्णव्यवस्थेवर हल्ला करून श्रमण, परिव्राजक, बनण्यासाठी कोणालाही सवलत दिली. बौद्ध धर्माचे मठ व विहार भिक्षूंनी आणि भिक्षूणींनी भरत गेले. साधू, संन्यासी, सिद्ध, बैरागी, जपी, तपी, वैष्णव, शैव, शाक्त, पाशुपत, कापालिक यांची संख्याही फार मोठ्या प्रमाणात वाढत राहीली. महायान, हीनयान, मंत्रयान, वज्रयान, सहजयान इत्यादी धर्मतत्वांचाही प्रभाव जनमानसावर फार मोठा होता. याच काळी शंकराचार्य, कुमारिल, उदयन इत्यादी दार्शनिक पंडितांनी सनातन वैदिक धर्माची पुन: नव्याने उभारणी केली. त्यांची विद्वत्ता आणि प्रतिभा थोर दर्जाची होती. तरीही त्यांचा बौद्धिक प्रभाव फार मोठ्या प्रमाणात बहुजन समाजाच्या मनावर झाला नाही. उलट मंत्रयान, वज्रयान इत्यादींच्या सहज सुलभ पण कांहीशा तांत्रिक व गुढ अशा तत्वज्ञानाचा प्रभाव सतत वाढत राहीला. थोडक्यात म्हणायचे झाले तर तंत्र, मंत्र, जादूटोणा, ध्यानधारणा, समाधी, कायासिद्धी, चमत्कार याचाच प्रभाव जनमानसावर जास्त होता. अशा परिस्थितीतच नाथपंथ वाढत होता. कसातरी तग धरून होता. वामाचाराला सर्वत्र उत आलेला होता.

समाजातील बहुसंख्य लोक अशाप्रकारे विविध जातीजमातींच्या जंजाळात गुरफटून गेले असतानाच भारतीय समाजरचनेवर आणखी एक जबरदस्त आघात झाला. याच कालखंडात उत्तर हिंदुस्थानावर एका अगदी परकीय व भिन्न संस्कृतीचे आक्रमण

झाले. मुहंमद पैगंबराच्या इस्लामी धर्माने आपल्या आक्रमक वृत्तीने भारतात प्रवेश केला. खलीफा उमर, महंमद इब्न कासीम, गझनीचा महंमूद, महंमद घोरी बाबर इत्यादी मुघल सेनानी व राज्य संस्थापक इत्यादींनी सतत स्वाऱ्या करून जबरदस्ती करून उत्तर भारतात इस्लामी धर्माचे राज्य प्रस्थापित करण्याचा मोठाच प्रयत्न केला. मूर्तिपूजक आणि मूर्तिभंजक यांच्यात मोठा संघर्ष पेटला. भारतीय धर्म, संस्कृती, जीवनपद्धती यांत कित्येक महत्वाचे बदल या इस्लामी आक्रमणामुळे झाले. इस्लामी राज्यकर्ते इथे राज्य करू लागले. त्यामुळे त्या धर्माचा प्रसार होण्यास राजाश्रयच प्राप्त झाला. राज्यकर्त्यांचा हा इस्लाम धर्म आचरणात आणण्यास सोपा आणि ऐहिक सुखाची प्राप्ती करून देणारा असल्यामुळे तसेच जातीसंस्था, कर्मकांड आणि बाह्य आचरणाला विरोध करणारा असल्यामुळे अनेकांना तो आकर्षक वाटला. त्यातच सनातन हिंदू धर्मातील वर्णाश्रमामुळे निर्माण झालेली ही जातीसंस्थाच त्यांना मारक ठरली. कारण या वर्णाश्रम धर्मात मुठभर वरिष्ठ वर्ग सोडला तर बाकीच्या बहुसंख्य समाजाला मानाचे स्थान नव्हते. त्यांची सतत अवहेलनाच होत होती. या सगळ्या जाचाला कंटाळलेल्या लोकांना नवा इस्लामी धर्म जवळचा वाटला. अनेक हीन जातीय हिंदू लोक सामुदायिकरीत्या इस्लाम धर्मात सामील होत राहीले. आणि त्यामुळे हिंदू धर्माला फार मोठे खिंडार पडत राहिले. या इस्लाम धर्माचा प्रभाव त्यावेळी अस्तित्वात असलेल्या सर्व धर्मपंथावरही सतत पडत गेला.

## गोरक्षनाथांच्या उपदेशाचे वेगळेपण

अशा या भीषण पार्श्वभूमीवर नाथपंथाच्या महानतम् सेनानीचा योगेश्वर गोरक्षनाथांचा उदय झाला. त्यांनी सर्वत्र भारतभर भ्रमण करून परिस्थितीचे अवलोकन केले. आणि शुद्ध आचरणावर भर देणारं, जाती, पंथ, धर्म यांचा कसलाच अडसर नसलेलं, प्रत्येक जीवाला परमपदाची प्राप्ती करून घेण्याचा अधिकार आहे असं ठामपणे सांगणारं स्वतःचं नवीन तत्वज्ञान जनमानसावर रूजवायला सुरुवात केली. नवीन ग्रंथसंपदा आणि साहित्य निर्माण करून योगाची सहजसुलभ साधना सर्वांपुढे स्पष्ट केली. याचा जनमानसावर अनुकूल परिणाम होत गेला. नाथपंथ नव्या जोमाने भरभराटीस येऊ लागला. इस्लामी धर्मीयांनाही या पंथाचे आकर्षण वाटू लागले आणि इस्लामी साधक गोरक्षनाथांच्या नाथपंथाकडे वळू लागले.

अफगाणिस्तान, पश्चिम पंजाब, सिंध, कच्छ इत्यादी बहुसंख्य इस्लामी असलेल्या भागातील इस्लामी साधक या पंथाकडे वळले. धिनोधर, कंदाहार आणि दिल्ली इत्यादी ठिकाणी नाथपंथाची केंद्र स्थापन झाली. गोरखपूरच्या मुख्य केंद्रात अनेक नाथयोगी पीर म्हणून ओळखले जाऊ लागले. पीर हा यावनी शब्द असला तरी तो सिद्धपदाचा बोधक म्हणून समजला जातो. पीर शब्दाचा अर्थ नाथ, सिद्ध, योगी, गुरू असाच घेतला जातो. अशाप्रकारे इस्लामी धर्मीयांना आपल्या तत्वज्ञानाने प्रभावित करून आपल्या पंथाकडे वळवून गोरक्षनाथांनी पहिला विजय संपादन केला. इथून पुढे मात्र नाथपंथाची फार मोठ्या झपाट्याने वाढ होत गेली.

गोरक्षनाथांच्या उदयकालाआधीही नाथपंथ अस्तित्वात होता. परंतु तो वामाचाराने अत्यंत बरबटलेला होता. अनेक गैरप्रकार या पंथात होत होते. त्यामुळे जनमानसावर ह्या पंथातील साधकाबाबत बरेच गैरसमज पसरलेले होते. मंत्रसिद्धीच्या जोरावर हे जोगी लोकांना भारावून सोडतात. मूठ मारणे, भानामती इत्यादी प्रकार यांना अवगत असतात. विभूती अथवा अंगारा किंवा भस्म देवून हे लोकांना फसवितात. स्त्रियांना भूल पाडून पळवून नेतात. छा छू करून जादूटोणा करण्यात हे तत्पर असतात. गांजा, चरस, अफू यासारख्या मादक पदार्थांचे सेवनात हे दंग असतात. मद्य, मांस, मैथून आदी पंचमकार यांना प्रिय असतात. हे लोक तर्कट आणि रागीट असल्यामुळे वारंवार डोळे लाल करून क्रोधीष्ट होतात. कुणालाही शाप देऊन हे भस्म करून टाकतात इत्यादी अनेक गैरसमज या पंथाबद्दल लोकांत रूजलेले होते. हे सारे गैरसमज दूर करून नाथपंथाचे शुद्ध, उदात्त, सर्वांपेक्षा निराळे असे रूप लोकांसमोर मांडण्याचे खडतर कार्य गोरक्षनाथांनी केले.

महाराष्ट्रात नाथपरंपरा कानाकोपऱ्यांत पोहचली ती निवृत्तिनाथ ज्ञानेश्वरांची ! निवृत्तीनाथांचा जन्म १२७३ मधला तर ज्ञानेश्वरांचा जन्म १२७५ मधला. निवृत्तिनाथांना गहिनीनाथांचा अनुग्रह होता. हे गहिनीनाथ गोरक्षनाथांचे शिष्य होते. गोरक्षनाथांचे गुरू मच्छिंद्रनाथ हे पहिले मानवी सत्पुरुष म्हणून या पंथात मानले तर साधारणतः त्यांना दहाव्या शतकातले मानावे लागेल. म्हणजेच नाथसंप्रदायाचा उदय साधारणपणे नवव्या, दहाव्या शतकातील मानणे भाग आहे. या नाथपंथाचा उदय झाल्यानंतर महाराष्ट्रात त्यांचा विकास ज्ञानेश्वर तुकारामाच्या काळात भक्तिमार्गी वारकरी किंवा माळकरी या रूपात होत गेला. त्याआधी नाथसिद्धांचा मेळा आणि त्याच्याही आधी पौराणिक काळात भैरवमेळा या नावाने नाथपंथी साधक ओळखले जात होते.

## उदयस्थानाबद्दल मतभिन्नता

नाथपंथाच्या उदयस्थानाबद्दलही बरीच मतभिन्नता आहे. कांहीच्या मते हा पंथ महाराष्ट्रातच स्थापन झाला असावा असे वाटते. नगर जिल्ह्यातील वृद्धेश्वर अथवा म्हातारदेवाचा डोंगर हेच आदीनाथाचे मूळस्थान व तेथूनच नाथपंथाचा उदय झाला. मढीचा मायंबा आणि कान्होबा म्हणजेच मत्सेंद्र आणि गोरक्षनाथ असे मानले जाते. महाराष्ट्रात नाथपंथीय सिद्धांची स्थाने अनेक ठिकाणी आहेत. नगर जिल्ह्यांत डोंगरगण येथील गोरखनाथ, मढी येथील कानीफनाथाची समाधी. सप्तश्रृंगी डोंगरावर हात-पाय तुटलेले चौरंगीनाथ. तिथे असलेली गोरक्षनाथांची गुहा. गहिनीनाथांचा मठ, नेवाशाच्या डोंगरावरील गोरक्षनाथांची समाधी,

सातान्याजवळचा मत्सेंद्रगड, तिथे असलेली मत्सेंद्रनाथांची समाधी, बत्तीस शिराळ्याची गोरखचिंच, मत्सेंद्रीशाळू आणि पैठण इथे असलेली नाथपंथीय साधूंची स्थाने. अशा विविध स्थानांनी आणि खुणांनी महाराष्ट्र भरलेला आहे.

आणखी एक महत्वाचा दुवा सापडतो तो म्हणजे त्र्यंबकेश्वर येथील गोरक्षमठ. या मठाची स्थापना ८६६ सालची आहे. म्हणजे ऐतिहासिकदृष्टचा ग्राह्य मानल्या गेलेल्या मच्छिंद्रनाथ आणि गोरक्षनाथ यांच्या काळातीलच आहे. तसेच खानदेशातील तळोदे तालुक्यातील तोरणमाळ येथील मठही फार प्राचीन आहे असे अलिकडेच उजेडात आले आहे. त्या काळात तोरणमाळ हे एक मोठे संस्थान होते आणि या संस्थानात नाथपंथाचे एकूण ११५ मठ होते. या मठात सापडणाऱ्या नामावळीत गोरक्षनाथ, मच्छिंद्रनाथांचा उल्लेख प्रामुख्याने आला असून इतर नाथसिद्धांच्या मागे 'पीर' हा शब्द लावलेला आढळतो. तसेच या संस्थानमधिल नाथमठांना उत्पन्नाचे साधन म्हणून अल्लाउद्दीन खिलजीने जमिनीची सनद दिलेली आढळून येते. त्यामुळे हा पंथ महाराष्ट्रातच प्रथम रूजला असावा या म्हणण्याला अधिकच बळकटी येते.

## नाथ म्हणजे अनादि

'नाथ' म्हणजे धनी, स्वामी, मालक, इत्यादी या शब्दाचे अर्थ आपल्याला माहीत आहेतच. त्यादृष्टीने पहायचे झाले तर या चराचर सृष्टीचा निर्माता, उपकारकर्ता, पालनकर्ता जो ईश्वर तोच धनी, मालक किंवा नाथ आहे अशी कल्पना करून साधना करणारा पंथ म्हणून हा पंथ ओळखला जातो. प्रभू, पति, श्रेष्ठ, वरिष्ठ, समर्थ अशा अर्थानेही नाथ हा शब्द उपयोगात येतो. तसेच हा संप्रदाय अनादि आहे असे मानले जाते म्हणून न+अथ = नाथ. ज्याला आरंभच नाही, म्हणजे जो अनादि आहे तो नाथपंथ असाही अर्थ लावला जातो. गोरक्षसिद्धांत संग्रहात राजगुह्य ह्या प्रकरणात 'नाथ' शब्दाचा अर्थ 'ना' म्हणजे अनादिरूप आणि 'थ' म्हणजे भुवनत्रयाचा असा सांगण्यात आला आहे. नाथतत्व अनादिरूप असून ते भुवनमय स्थितीचे कारण आहे. तर शक्तिसंगम तंत्रानुसार 'ना' म्हणजे मोक्षाच्या ज्ञानाचे दर्शन करणारा आणि 'थ' म्हणजे अज्ञानाचा नाश करणारा तो 'नाथ' असा अर्थ लावण्यात आला आहे. याच गोरक्षसिद्धांतात म्हटले आहे की सृष्टी-स्थितीलयाच्या प्रक्रियेत शक्ती विश्वाचे सृजन करते, शिव परिपालन करतो आणि कालसंहार करतो, तर 'नाथ' मुक्ती देतो. म्हणून मुक्तीदाता तो नाथ असे जाणावे.

नाथांची वेशभूषा हे एक वैशिष्ट्य आहे. वेशभूषेच्या निमित्ताने नाथयोग्यांनी धारण केलेल्या आयुधांना किंवा इतर बाबींना एक महत्व आहे. कारण नाथांची ब्रीदे शत्रूवर चाल करण्यासाठी, स्वतःच्या रक्षणासाठी आणि जय संपादन करण्यासाठीच असतात. त्रिशूल हे तीन पाते असलेले एक शस्त्र आहे. नाथाकडे त्रिशूल आणि त्याबरोबरच खड्ग् या नावाचेही एक शस्त्र असते. मृगाच्या शिंगापासून बनविलेली शृंगी किंवा सिंगी सहेलीला बांधलेली असते. नाथपंथी साधक जेवणापूर्वी प्रथम सिंगी वाजवून मगच पहिला घास घेतात. शिवा, सिंगी, मृदुंग, किन्नरी, सारंगी हे दशनादापैकी नाद आहेत. संत ज्ञानेश्वरांच्या मते हे दशनाद खालीलप्रमाणे आहेत.

(१) **शृंगीनाद :** एकाग्रता करून कवित्व शक्ती देतो. (२) **तंतुनाद :** संकल्पविकल्पाचे हरण करतो. (३) **टाळनाद :** अखंड ध्वनी चालून वाचासिद्धी देतो. (४) **मुरलीनाद :** भविष्य वर्तमान समजावतो. (५) **गर्जनाद :** दूरदृष्टी देतो. (६) **शंखनाद :** चौदा विद्या शिकवितो. (७) **भेरीनाद :** सर्वांतरीचे कळवितो. (८) **घोषनाद :** सर्वसिद्धी प्राप्त करून देतो. (९) **मेघनाद :** मनाने चिंतलेल्या ठाई घेऊन जातो आणि (१०) **मृदुंगनाद :** ब्रह्मानंदी डोलवितो. नाथपंथात नादाचे महत्व हे असे आहे.

## महाराष्ट्रातील प्रमुख नाथस्थाने

महाराष्ट्रातील नाथपंथाच्या स्थानाबद्दल आपण याआधी विचार केला आहे. या व्यतिरिक्त महाराष्ट्रात आणखी अशी कित्येक ठिकाणे आहेत की जिथे आजही नाथयोग्यांची स्थळे दिमाखाने उभी आहेत. आळंदीचा सारा परिसर तर ज्ञानेश्वरांच्या स्मृतींनी भरलेला आहे. तेथून जवळच असलेले अडबंगनाथाचे डुडुळगांव, कोल्हापूरचा गगनगड, शिरूर तालुक्यातील कान्होबा, पाठकांचे केंदूर, सासवडला जाताना वाटेत दिवेघाटात लागणारे कानीफनाथांचे मंदिर इत्यादी स्थाने लक्षणीय आहेत. याशिवाय विदर्भात अंभोरे, चिंधवाडा, खेडले जोगाई, राशिन, परळी वैजनाथ, आणि खानदेशातील तोरणमाळ इत्यादी ठिकाणी नाथांचे प्रसिद्ध मठ आहेत. पाथर्डीजवळील 'खोकरमोहो' या गावापासून सहा मैलावर एका डोंगरात जालंधरनाथांचे प्रसिद्ध स्थान आहे. तर गर्भाद्रीच्या परिसरात कानीफनाथांची समाधी आहे. खुलदाबादला ह्याच जालंधरनाथांचे जर्जरीबक्ष या नावाचे प्रसिद्धस्थान आहे. तर कऱ्हाडजवळ रेवणी या गावी रेवणसिद्धांचे मंदिर आहे. लातूरजवळ वडवळनाथांचे स्थान आहे. चिंचोलीजवळ गहिनीनाथांची समाधी आहे. डोंगरगण येथे गोरक्षनाथांचे प्रसिद्ध मंदिर आहे. आणि शेवगाव येथे अडबंगीनाथांचे स्थान आहे. उमरखेडला आईनाथांचे स्थान फार प्रसिद्ध आहे. महाराष्ट्रात अशी कितीतरी स्थाने ह्या नाथयोग्यांच्या तपश्चर्येनी आणि वास्तव्यानी पुनीत झालेली आहेत. त्यापैकी कांही प्रसिद्ध स्थानांचा आता आपण थोडक्यात आढावा घेऊं आणि या लेखाची समाप्ती करू.

(१) **त्र्यंबकेश्वर :** नाशिकपासून केवळ अठरा मैलावर असलेले हे ठिकाण शिवक्षेत्र म्हणून फार पूर्वीपासून प्रसिद्ध आहे. भारतात असलेल्या बारा ज्योतिर्लिंगापैकी त्र्यंबकेश्वराचे मंदिर हे एक स्थान आहे असे मानले जाते. इथेच नाथपंथीय योगी गहिनीनाथ यांचे फार काळ वास्तव्य होते.

त्यांची साधना करण्याची गुहाही येथे प्रसिद्ध आहे. हा शिव त्र्यंबकेश्वर ब्रह्मगिरीच्या विस्तीर्ण रूपात येथे उभा असल्याची भाविकांची श्रद्धा आहे. नाथपंथाचे प्रवर्तक गोरक्षनाथ यांचे शिष्य गहिनीनाथ यांचे इथे वास्तव्य शिवाय निवृत्तिनाथाची समाधीही इथेच आहे. शिव हे तर नाथपंथाचे परमदैवतच. त्याचे वास्तव्य इथे. अशा त्रिवेणी संगमामुळे नाथपंथीयांचे हे एक प्रमुख श्रद्धास्थान आहे.

या क्षेत्रात गंगा, कृष्ण, परशुराम, राम, लक्ष्मीनारायण इत्यादी देवतांची मंदिरे आहेत, उत्तरेस अर्ध्या मैलावर नील पर्वतावर देवी निलांबिकेचे मंदिर आहे. ही निलांबिका म्हणजेच रेणूका असल्याचे म्हटले जाते. इथेच गोसाव्यांचा एक आखाडा आहे. गंगासागर तलावाच्या पश्चिमेला निवृत्तीनाथांचे समाधिमंदिर आहे. दरवर्षी जेष्ठ वद्य द्वादशीला निवृत्तीनाथांच्या पुण्यतिथीनिमित्ताने इथे फार मोठी जत्रा भरते. इथलं कुशावर्त तीर्थ तर फारच प्रसिद्ध आहे. ब्रह्मगिरी पर्वताच्या उतारावर नाथपंथीय योग्यांचा फार प्राचीन मठ असून येथे दर बारा वर्षांनी कुंभमेळ्याच्या निमित्ताने नाथपंथाच्या बारा शाखांचा फार मोठा मेळा भरतो.

नाथपरंपरेच्या अनेक खुणा या परिसरात आढळतात. इथे जवळच सप्तशृंग नावाची टेकडी आहे. तिथली सप्तशृंगीदेवी प्रसिद्ध आहे. शक्तीच्या साडेतीन पिठात हीची गणना होते. या सप्तशृंगावरच मच्छिंद्रनाथ फिरत फिरत आले असताना त्यांना हात-पाय तोडून टाकलेला युवक दिसला. मच्छिंद्रनाथांना दया येऊन त्यांनी त्याला पूर्ववत केले. हेच ते प्रसिद्ध चौरंगीनाथ. इथेच गहिनीनाथ आणि निवृत्तीनाथांची भेट झाली. आणि 'शांभव अद्वयानंद वैभव' असा नाथसंप्रदायाचा अमोल ठेवा महाराष्ट्राच्या हाती आला. इथला त्र्यंबकेश्वर हा सद्योजात, वामदेव, अघोर, तत्पुरूष आणि ईशान अशा पाच लिंगांनी युक्त आहे. तसेच निलांबादेवीचे वसतिस्थान असणारा निलगिरी हा गुरूदत्तात्रयांचे सिद्धिक्षेत्र म्हणूनही फार प्रसिद्ध आहे. पर्शुरामानेही इथेच तपसामर्थ्याने सिद्धी प्राप्त करून घेतली असे मानले जाते. ब्रह्मगिरीच्या दक्षिणभागी कोलांबा नावाच्या देवीचे स्थान आहे. या ठिकाणाला कोलागिरी असे म्हणतात. याच कोलाचलावर नाथपंथीयांना पूज्य वाटणारी अनुपानशिळा अथवा नवनाथ तप:स्थली नावाचे एक पवित्र स्थान आहे. व्याघ्रचर्माकृती अशी काळ्या रंगाची ही विस्तिर्ण शिळा असून या शिळेवर पांढरे बिंदू आणि रेघा दिसतात. ''खडे सिद्ध बैठे पाषाण, ताहाँ आये श्री शंभू जति गुरू गोरक्षनिर्वाण, श्री सत्यनाथपीरी बैठे'' अशी सांप्रदायिकांची या स्थानाबाबत अपार श्रद्धा आहे.

(२) **कानीफनाथांची मढी :** अहमदनगरपासून २७ मैलावर असलेल्या पाथर्डी रोडवर निवडुंगे गावापासून दोन मैल पुढे गेले की मढी हे स्थान लागते. इथे कानीफनाथांची संजीवन समाधी आहे. या परिसरात कानीफनाथांना 'कान्होबा' या नावाने ओळखले जाते. समाधीस्थान उंच टेकडीवर असून समाधिमंदिराच्या तीनही बाजूच्या दरवाजामधून मंदिरात प्रवेश करता येतो. या मंदिराच्या दक्षिण दरवाजात मच्छिंद्रनाथांच्या पादुका आहेत. तर मंदिराच्या मागल्या बाजूस विठ्ठलाचे मंदिर आहे. इथे काही शिलालेख देवनागरी लिपीत आणि उर्दूमध्ये लिहिलेले आढळतात. या स्थानाच्या बांधकामात आणि डागडुजीत मराठे सरदार पिलाजी गायकवाड आणि चिमाजी सावंत यांनी विशेष लक्ष घातले होते. या संबंधात जी हकिकत सांगितली जाते ती अशी की, जेव्हा युवराज शाहू महाराज जेव्हा औरंगजेबाच्या कैदेत होते तेव्हा त्यांची सुटका व्हावी आणि ते सुखरूप घरी परत यावेत म्हणून महाराणी येसूबाईने कानीफनाथांना नवस केला होता. त्याप्रमाणे शाहूमहाराजांची सुखरूप सुटका झाली. कानीफनाथ नवसास पावले. म्हणून या स्थानाकडे मराठे सरदारांनी विशेष लक्ष पुरविले. या कानीफनाथांची भक्ती करणारे मुसलमानही बरेच आढळून येतात.

(३) **गर्भाद्रीवरचा वृद्धेश्वर :** आदिनाथाचे हे स्थान घाटशिरसजवळ गर्भाद्रीच्या दरीत असून त्यास म्हातारदेव किंवा वृद्धेश्वर असेही नाव आहे. सुमारे आठशे वर्षापूर्वीच्या या स्थानास कोणा श्रमणदेव नावाच्या राजाने घंटा अर्पण केली आहे. या देवळाच्या मुख्य गाभाऱ्यात एक स्वयंभूलिंग असून त्यात पाण्याचा झरा नेहमी वहात असतो. कित्येक वर्षापूर्वी पेटवलेली एक धूनीही अजून तिथे जळती आहे. यामागची आख्यायिका अशी आहे की, फार पूर्वी इथे एक भंडारा झाला होता. त्यावेळी प्रत्यक्ष शिवाने वृद्ध तपस्व्याचे रूप घेऊन पंगत वाढण्याचे काम केले होते. म्हणून या स्थानाला म्हातारदेव किंवा वृद्धेश्वर हे नाव रूढ झाले. या स्थानाच्या पलीकडल्या दरीतच मच्छींद्रनाथाचा निवास होता. तिथेच त्यांनी पौष वद्य ३० रोजी सावरगावच्या परिसरात समाधी घेतली. या मच्छींद्रनाथाना लोक मायंबा किंवा मायबाप म्हणून संबोधित असत. या मायंबाची यात्रा अजूनही तिथे भरत असते. नगरजवळ डोंगरगणाच्या दरीत गोरक्षनाथांचे स्थान आहे. त्याला गोरक्षनाथांचा डोंगर म्हणूनच लोक ओळखतात. तर जामखेड भागात अमळनेरजवळच्या चिंचोलीच्या रानात गहिनीनाथांचा आश्रम होता. त्यांची समाधीही तिथेच आहे असे सांगतात.

(४) **अंबाजोगाई :** मराठवाड्यातील अंबाजोगाई या नगरीचा उल्लेख सांस्कृतिक दृष्टीकोनातून फार महत्वाचा मानावा लागेल. इथे सांस्कृतिक परंपरांचा फार मोठा इतिहासच घडलेला आहे. नाथपरंपरेतले फार मोठे योगीपुरूष कवि मुकूंदराज यांचे इथे चिरकाल वास्तव्य होते; आणि त्यांची समाधीही इथेच आहे. त्यामुळे नाथपंथियांना या स्थानाचे महत्व विशेष वाटले तर नवल नाही. ''योगेश्वरी महात्म्य'' या संस्कृत ग्रंथानुसार अंबेजोगाई हे शहर जैनधर्मीय राजा जैत्रपाळ याची राजधानी म्हणून फार पूर्वी प्रसिद्ध होते. इथे खोलेश्वराचे एक मंदिर असून त्यापुढील असलेल्या गढीला ''शाहबुरूज'' म्हणून ओळखले जाते. परंतु ही गढी

प्रत्यक्षात जैत्रपाळ राजाची गढी होती असे इतिहास सांगतो. या जैत्रपाळ राजाला सिद्धी प्राप्त करून घेण्याची इच्छा झाली आणि नाथपंथीय योगी मुकुंदराज यांनी ती पूर्ण केली. याबद्दलचा उल्लेख 'विवेकसिंधू' या ग्रंथात आढळतो.

'अंबेजोगाई' हे स्थान जयंती नदीच्या रमणीय अशा पश्चिम तीरावर वसलेले आहे. इथली देवी 'योगेश्वरी' या नावाने फार प्रसिद्ध असून महाराष्ट्रात अनेक कुलांची ती कुलदेवता आहे. या देवीमुळेच या शहराला अंबेजोगाई हे नाव पडले आहे. या शहरापासून दोन मैलावर वालाघाटाच्या उतरंडीत एका गुहेत मराठीमधले आद्यकवि आणि नाथपंथातले योगी मुकुंदराज यांची समाधी आहे. मुनी मुकुंदराज अश्वदरीजवळच्या गुहेत अजूनही चैतन्यरूपाने निवास करतात अशी भाविकांची श्रद्धा आहे. 'विवेकसिंधु' आणि 'परमामृत' ह्या दोन महान ग्रंथाचे ते कर्ते आहेत. दत्तात्रयांचे महान उपासक दासोपंत यांचाही निवास इथेच आहे. दासोपंतांचा वाडा, त्यांची हस्तलिखीत पासोडी, शिवलेण्यातील भूचरनाथ, जैन, वैष्णव लेणी, रामेश्वर मंदिर, नृसिंहतीर्थ, बुटेनाथ, बाणगंगा - जयंती संगम, अनेक सिद्धांची स्थाने, खोलेश्वर मंदिर, नागझरी तीर्थ, अमृतेश्वर मंदिर, काशीविश्वनाथ मंदिर, रेणूकामाता मंदिर, पापनाशीतीर्थ, सकलेश्वर मंदिर, आरोग्यवैद्यनाथ मंदिर इत्यादी अनेक महत्वाची स्थाने इथे पाहण्यासारखी आहेत.

(५) **पैठण :** संत ज्ञानेश्वरांच्या काळात म्हणजे सन १२०० मध्ये धर्मपीठ म्हणून प्रसिद्ध असलेले पैठण क्षेत्र मराठवाड्यात गोदावरीच्या तीरी वसलेले आहे. ऐतिहासिकदृष्ट्या राजकारण, व्यापार, धर्म आणि संस्कृती या चारही बाबतीत या शहराचे महत्त्व फार मानले जात होते. पूर्वीच्या सातवाहन राजाची ही राजधानी. दक्षिणेची काशी म्हणून या क्षेत्राचा लौकिक आहे. पूर्वी या शहरात विद्या आणि कला यांची चांगलीच वाढ झालेली होती. इथल्या धर्मपीठासमोर ज्ञानेश्वर महाराजांनी केलेले चमत्कार सर्वप्रसिद्धच आहेत. याच स्थानाला पुढे संत एकनाथ महाराजांनी भक्तीपीठाचा मान मिळवून दिला. कृष्णदयार्णवस्वामी, शिवदिनकेसरी इत्यादी योगीपुरूषांचे इथे मठ असून त्यांच्या कार्यामुळेच या स्थानाला क्षेत्राचे महत्व प्राप्त झाले. शिवदीननाथांनी इथे हटयोगावर 'ज्ञानप्रदिप' हा ग्रंथ लिहिला आणि महाराष्ट्रात नाथपंथीययोगाची परंपरा जतन केली. शिवदीननाथांच्या मठाला पेशव्यांनी तीनशे गावांची जहागिरी देऊन स्थैर्य प्राप्त करून दिले. वैष्णवी योगी परंपरेच्या गृहस्थी बाण्याच्या योगधारणेला आणि नामजपाचा खरा प्रचार आणि प्रसार इथूनच झाला. आजही पैठणचे महत्व फार मोठे आहे.

(६) **नाशिकजवळची वाकी :** निफाड फाट्यापासून पुढे लासलगावाजवळ हे स्थान आहे. इथे पूर्वी गोरक्षनाथांचा मठ होता. एका भूयारात गोरक्षनाथांचे मंदिर आणि त्यावर एका सिद्धांची समाधी आहे. कानीफनाथांचे एक थोर भक्त संत निंबाळक बाबा नावाचे इथे एक पुजारी होते. त्यांचीही समाधी इथेच आहे. इथे कानीफनाथांची गादी आहे. या गादीवर सर्व नाथपंथी मुद्रा आहेत. त्यातली एक चंद्रकोरीची असून दुसरी सूर्यकोरीची आहे. गादीवर दोन 'मांही' आहेत. त्यातली एक चंद्रकोरीची असून दुसरी सूर्यकोरीची आहे. या मांही काठीला लावून या दोन काठ्या ध्वजाच्या काठीबरोबर मढीला येतात. दोन पादुकाही यावेळी बरोबर असतात. तसेच कान्होबाचा मुखवटाही बरोबर नेला जातो. कुणी 'काळापहाड' नामक पठाण नाथपंथात आला आणि इथेच स्थिरावला. त्याची समाधीही इथेच आहे.

(७) **अडबंगनाथाचे डुडुळगाव :** २५-३० वर्षापूर्वीच आळंदीजवळच्या डुडुळगावी अडबंगनाथाचे समाधिस्थान असल्याचे उघडकीस आले आहे. अडबंगनाथ हे नवनाथांपैकी एक म्हणून मानले जातात. डुडुळगावात एका शेतात पाच थडगी फार पूर्वीपासून होती. ही थडगी इस्लाम धर्मातील कुणा अवलियाची असावीत असा पूर्वी समज होता. त्या दृष्टीनेच इस्लाम धर्मियांकडून त्यावर उपचार होत होते आणि उरूसही भरत होता. परंतु त्या गावानजिकच्याच धायरी नामक गावातले एक नाथभक्त गोविंदबुवा धायरीकर यांना अचानक स्वप्नदृष्टांत होऊन ही स्थाने नाथांची आहेत हे उघडकीस आले. याप्रकरणी बराच काळ हिंदू-मुस्लिमांत बखेडा निर्माण झाला होता. परंतु याचा निवाडाही चमत्कार दाखवून नाथांनीच केला. एक दिवस अचानक त्या पाच थडग्यांपैकी दोन थडग्यावरील वरची कवचे मोठा आवाज होऊन उकलली गेली. आणि आतील समाध्या उघड्या झाल्या. त्यापैकी एका समाधीवर महादेवाची पिंड तर दुसरीवर पादुका कोरल्याचे चिन्ह स्पष्टपणे दिसू लागले. अर्थातच त्या हिंदू धर्मियांच्या समाध्या आहेत हे सिद्ध झाले. तिथे लोकांची रीघ लागू लागली. लोकांना त्याचा प्रत्ययही येऊ लागला. आज तिथे भव्य मंदिर उभे आहे. बाजूलाच गणपती, दत्त, शंकर या देवतांची स्थापना करण्यात आली आहे. पाण्यासाठी मोठी विहीर खोदली आहे. आज या ठिकाणी मोठमोठ्या नामवंत लोकांचा सतत राबता असतो. नाथपंथाचे आजचे हे जागते स्थान आहे. दरवर्षी माघ वद्य अष्टमीला इथे नाथांचा उत्सव साजरा केला जातो.

(८) **दिवाघाटातील कनीफनाथ :** सासवड रस्त्याने दिवाघाटातून जाताना घाटाजवळील सुमारे तीनशे फूट उंचीच्या डोंगरावर एक प्रचंड झाड दिसते. इथेच कानीफनाथाची समाधी आहे असे मानले जाते. परंतु प्रत्यक्ष हे स्थान पाहताना ते समाधिस्थान नसून नवनाथांचे ध्यान धारणास्थान असावे असे वाटते. पूर्वी या ठिकाणी जाण्यासाठी रस्ता नव्हताच. जायचे झालेच तर कसेतरी चाचपडत काटेकुटे तुडवित जावे लागत असे. आता मात्र चांगली सडक झाली आहे. या डोंगरावर एक मंदिर असून त्याच्याजवळ ओटेवजा नऊ बैठका एका मोठ्या वृक्षाजवळ आहेत. पूर्वी हे मंदिर अगदीच

(पृष्ठ क्र. १७ वर)

# नाममहात्म्याचा महिमा

- शाम जुवळे
दादर, मुंबई.

**नाम हे सर्वश्रेष्ठ आहे. तसेच नाम हे साधन आहे आणि साध्यही आहे. नामासारखे सोपे व सुलभ साधन नाही. देहबुद्धी त्यागून देवबुद्धीने नामस्मरण करावे. नामाची संगत म्हणजेच सत्संग होय. नामाचे हे महात्म्य लक्षात घेऊनच सर्व साधूसंतांनी नामावर भर दिलेला आढळतो. संत ज्ञानदेवांनी तर नामाला 'नामा परते तत्त्व नाही रे अन्यथा' असे तत्त्वाचे स्थान दिलेले आहे. अशा या नामाच्या अगाध महात्म्याचा महिमा श्री. जुवळे यांच्या शब्दांत....**

ॐ हे पवित्र अक्षर एकाक्षरी-ब्रह्म आहे. विश्व हे ब्रह्माच्या संकल्पातून साकारले आहे. 'यज्ञ' हे विश्वाचे सर्वप्रथमचे दिव्य कर्म होय. या दिव्य कर्माचे सुफळ म्हणून पर्जन्याची निर्मिती झाली. पर्जन्याचा परिणाम म्हणून अन्न-निर्मिती झाली. अन्नामुळे प्राणाचे रक्षण झाले आणि ह्या प्राण-शक्तीमुळे ॐ चा जप करणे शक्य झाले आहे. ॐ, ब्रह्म, यज्ञ, कर्म, पर्जन्य, अन्न आणि प्राण या सप्त आद्यक्रिया आहेत आणि 'कर्म' हे त्यांचे केंद्रस्थान आहे. विश्व ही कर्म-भूमी आहे. कर्म हे त्याचे पावित्र्य सांभाळून करावे लागते. या पावित्र्य-शक्तीमुळे विश्व तारले गेले आहे. जितके पावित्र्य अधिक तितके सौजन्य अधिक नांदले जाते. आज पावित्र्य लोप पावल्यामुळे सौजन्य हतबल झाले आहे. आणि अहंकार बळावला आहे.

## मनाचे पावित्र्य महत्त्वाचे

नाम हे मनाच्या पावित्र्याने घ्यावे लागते. मनाचे पावित्र्य राखण्यासाठी सद्गुण जोपासणे अत्यावश्यक आहे. अहंता, दंभ, चौर्य, परिग्रह यासारखे दुर्गुण अंगी असू नयेत. कारण दुर्गुणातून विकार निर्माण होत असतात. नम्रता, निर्भयता, अक्रोध, निरहंकार, आत्मियता वगैरे सद्गुणांची जोपासना करूनच मनाचे पावित्र्य राखता येणे शक्य होत असते. मूलत: मन म्हणजेच माणूस होय.

मानव म्हणजे जो नवा (नव) नाही (मा) तो. मानव हा सनातन आहे. सनातन मानवाने विज्ञानशास्त्रात कल्पनातीत केलेली प्रगती आज स्पष्टपणे दिसून आलेली आहे. परंतु बाह्यजगात प्रगती साधित असता मानवाचे अंतरंग उपेक्षित राहिल्याचे स्पष्ट दिसत आहे. याचा दुष्परिणाम म्हणून मनाचे पावित्र्य माणूस गमावून बसला आहे. मन म्हणजे दैवी अंश असल्यामुळे हा अंश वाढ खुंटल्यामुळे दुर्बल बनला आहे. मनाची अतर्क्य शक्ती वासना-कामना यांच्यात खर्च झाल्याचे सर्वत्र दिसून येत आहे. ही मनाची अक्षम्य हानी मानवाला शोभा देणारी नाही. यामुळे मानवाने स्वत:चे शील गमावले आहे. निष्कलंक चारित्र्य हेच मानवाचे खरे भूषण आहे. मनाची झालेली ही भयंकर हानी भरून काढण्यासाठी देवाचे सतत नामस्मरण करणे हाच एक प्रभावी उपाय आहे. कोणत्याही देवाचे नाम ॐ चा प्रथम उच्चार करून घ्यावे लागते. कारण ॐकारात असणारी दिव्य-शक्ती नामात उतरली जाते आणि नामधारकाला ही दिव्य-शक्ती तारक ठरते. नामाचे हे अनन्यसाधारण महत्त्व जाणूनच नामाश्रय घेणे सूज्ञपणाचे ठरते. ॐ म्हणजे आत्म्याचा संकेत (खूण) होय. नाम हे धारकाचे मार्गदर्शन करीत असते.

## व्यवहार-वेदांत एकत्र

''साई'' या पवित्र नामाचा आश्रय घेणे म्हणजे त्या दिव्य-नामातून स्रवणारी भगवान बाबांची अमृतवाणी हृदयात जतन करून ठेवणे होय. दयाशील अंत:करणाला हा नामाश्रय लाभत असतो. नामाश्रय सर्वोच्च होय. प्रपंचात नामाश्रय लाभला असता प्रपंच नीटनेटका करण्यास लागणारी सद्बुद्धी नामधारकाला उपलब्ध होत असते. खरे म्हणजे पंचप्राणाचा प्रकाश म्हणजेच जीवन होय. हा प्रकाश जोपर्यंत देहात आहे तोपर्यंतच व्यक्तीचे चलनवलन चालू असते. हा प्रकाश लोप पावला म्हणजे व्यक्तीचा वैयक्तीक प्रपंच संपुष्टात येत असतो. पंचप्राणाचा प्रकाश म्हणजे प्रपंच असे यावरून म्हणता येईल. प्रपंचातील नामाश्रय म्हणजे परमार्थ असेही म्हणता येईल. खरे म्हणजे प्रपंच-परमार्थ असे दोन विभाग पाडणे भक्तीच्या क्षेत्रात बरोबर असत नाही. स्वामी विवेकानंद व्यवहार आणि वेदांत एकच मानित असत. असे मानणे जगाच्या विकासाच्या दृष्टीने सर्वथैव योग्य होय. असा कल्याणकारी विकास सात्त्विक गुणाद्वारे होत असल्यामुळे देशात सात्त्विक गुणालाच प्रोत्साहन मिळेल व असे वातावरण सतत उपलब्ध राहील, हे बारकाईने पहाणे अत्यावश्यकच आहे. देशाची खरी उन्नती या मार्गानेच साधता येईल यात मुळीच संशय नाही.

श्री साईबाबांनी सर्व भक्तांना नामाश्रय घेण्याचा सदुपदेश सतत केलेला त्यांच्या जीवनावरून दिसून येतो. त्यांच्या मुखातून देवाचे नाम सतत स्रवत असे. देवाचे शुद्ध व पवित्र नाम व प्रेमाची भाषा हीच त्यांची अमृतवाणी होती. म्हणून **त्यांचे जीवन हाच त्यांनी साऱ्या जगाला दिलेला महान संदेश आहे.** हा महान संदेश म्हणजे बाबांनी जगाला प्रेमाने प्रदान केलेली संजीवनी होय. हीच जगाची तारक-शक्ती होय.

## नाम सर्वश्रेष्ठ

कोणत्याही व्यक्तीला नामाश्रय घेण्यास बाह्य परिस्थिती आड येत नाही. बाह्य परिस्थिती अनुकूल असो वा प्रतिकूल, नामाश्रय कोणत्याही वेळी, कोणत्याही स्थळी व्यक्तीला घेता येतो असा बाबांचा दिव्य संदेश आहे. किंबहुना नामाश्रय घेत असता अडचणी, संकटे दूर पळून जातात असे बाबा सांगतात. नामात एवढी प्रचंड शक्ती आहे की पर्वताचे दरड कोसळून पडले तरी नामधारकाच्या अंत:करणात नाम निर्भयपणे चालूच रहाते. नाम हे सर्वश्रेष्ठ आहे. नामात अखेरचा श्वास जाणे यासारखे सद्भाग्य जगात दुसरे नाहीच नाही. नाम हे जसे साधन आहे तसेच ते साध्यही आहे. नामाशिवाय इतर कशातही साधन आणि साध्य एकत्र असत नाहीत. नाम घेण्यासाठी जगातील कोणत्याही वस्तूची मदत लागत नाही; नाम हे स्वयंभू आहे. नाम घेतल्याने मनाला आनंद व शांती लाभते. नामासारखे सुलभ आणि सोपे साधन दुसरे नाही. नाम मनात रूंजी घालू लागले म्हणजे जीव चिदाकाशात स्वच्छंदपणे विहरत असतो, असा नामधारकांचा अनुभव आहे.

रस्त्यावरून लोक चालत असतात परंतु रस्ता आपल्या ठिकाणी स्थिर असतो. त्याप्रमाणे देह हा प्रपंचात फिरत असता मन मात्र रस्त्यासमान स्थिर असावे लागते. मन स्थिर ठेवण्यासाठीच नाम-साधनेचे आयोजन केलेले आहे. ढग आकाशात इतस्तत: फिरत असतात पण आकाश मात्र स्थिर असते. त्याप्रमाणे मन आकाशासमान व्यापक व स्थिर ठेवल्यास मनात नाम रूजले जाते व नामातील गोडी मनाला आकर्षित करून घेते. स्थिर मन ही जीवाची खरी संपत्ती होय. संत ज्ञानेश्वर म्हणतात की नाम हे सगुण ध्यान होय; अशा ध्यानामुळे प्रपंचात राहूनही फार मोठ्या प्रमाणावर परमार्थ साधता येतो; कालांतराने प्रपंचाचे रूपांतर परमार्थात होत असते. नामाश्रयाचा हा उच्चांक होय.

नामधारकाला मनाच्या मौनाची साथ मिळाल्यास दुधात साखर मिसळण्यासारखे होत असते. "अधिकस्य अधिकं फलम्" या म्हणीनुसार मितभाषी बोलण्याने शक्तीची जी बचत होते ती शक्ती अधिकाधिक नाम घेण्यास उपयोगी पडत असते. व्यर्थ भाषण न करता योग्य तेवढेच थोडक्यात बोलण्याने समय व शक्ती वाचविण्यास मदत होत असते. वेळेची व शक्तीची जाणीव असणे हे सूज्ञपणाचे लक्षण होय. या दोहोंची दखल न घेतल्यास सबंध जीवन वाया जात असते. नाम घेत राहिल्याने ही अतिशय महत्वाची गोष्ट लक्षात येते व जीवन कृतार्थ करण्यास चांगलीच मदत मिळते.

श्री साईबाबांनी साठ वर्षांहून अधिक काळ श्रीक्षेत्र शिरडी येथे राहून हाच-संदेश देवून ठेवला आहे. त्यांचे जीवन लोककल्याणार्थच होते. देहबुद्धी न धरता देवबुद्धी असावी हेच श्रेयस्कर होय. नामाची संगत म्हणजे सत्संग होय.

साईचे पुण्यस्मरण म्हणजे चित्त-शुद्धी होय. या चित्तशुद्धीने अंत:करण प्रेमाने भरून येत असते. प्रेमातून शब्द सहजगत्या साकार होतात आणि उत्स्फूर्त काव्य जन्मास येते.

## साईचा सत्संग

**साई–साई नाम तुझे हे**
**वेड मनाला लावितसे ।**
**वेड तरी हे मम साईचे**
**मनास माझ्या सुखवितसे ॥१॥**

**साई नाम हे साधन माझे**
**साध्यहि माझे तेच असे ।**
**साध्य–साधन एकचि माझे**
**ऐक्य त्यामुळे नांदतसे ॥२॥**

**साई–साई नाम गोड हे**
**ह्रदयासी बिलगून वसे ।**
**प्रेमातुन जव प्रेम स्रवतसे**
**सुखास सुख हे लाभतसे ॥३॥**

**साईनाम हे साथ देतसे**
**भय न मुळी ते वाटतसे ।**
**जिवासवे शिवसाई वसतसे**
**आगळेच हे भाग्य असे ॥४॥**

**नाम सुखाचे असता संगे**
**दूर कुठे जाणेच नसे ।**
**नामामृत हे जीवन माझे**
**विश्वचि माझे हेचि असे ॥५॥**

---

(पृष्ठ क्र. १५ वरून)

छोटे होते. परंतु मूळ मंदिराचे प्रवेशद्वार दीडफूट बाय दीडफूटाचे असून यामधून आधी डोके आत घालूनच आडवे होऊन प्रवेश करावा लागतो. आत ५-६ माणसे उभी राहू शकतील इतकीच जागा आहे. गुरूवारी इथे लोकांची फार गर्दी असते.

महाराष्ट्रातील ह्या प्रसिद्ध नाथ संप्रदायाच्या स्थानांचा परामर्ष घेऊन आपण या लेखाचा समारोप करूया. उत्तर भारतात नाथ संप्रदायाची अनेक प्रसिद्ध स्थाने आहेत. परंतु हा लेख महाराष्ट्रातील नाथसंप्रदायाच्या इतिहासापुरताच मर्यादित असल्यामुळे आपल्याला त्याचा इथे विचार करता येत नाही. नाथपंथ ज्या काळात उदयास आला, त्यावेळची स्थिती पाहता सनातन हिंदू धर्माला फार मोठी उतरती कळा लागली होती. परकीय इस्लामी धर्माने आक्रमण करून जबरदस्त तडाखा दिलेला होता. अशावेळी गोरक्षनाथासारखा बुद्धीवान महायोगी पुढे आला आणि त्याने नाथसंप्रदायाचा प्रसार करून सनातन हिंदू धर्माला पडलेले खिंडार बुजवून टाकले. परकीय आक्रमण थोपवून धरले. इतकेच नव्हे तर त्यांच्या प्रचाराची धार बोथट करून टाकून त्यांनाच आपल्याकडे आकर्षित करून घेतले हे केव्हढे महान कार्य आहे. सनातन हिंदू धर्मावर नाथसंप्रदायाने करून ठेवलेले हे अनंत उपकार आहेत. आणि हे उपकार कधीही न फिटणारे आहेत. गोरक्षनाथ अतिबुद्धीमान आणि उत्कृष्ठ संघटक होते यांत त्यांचे हे महान कार्य पाहील्यानंतर कांहीच शंका उरत नाही. कबीरांचा सुफी पंथही नाथसंप्रदायाची एक शाखा आहे. आज गावोगावी फिरणारे फकीर ह्या सुफी पंथाचे अनुयायी आहेत आणि महाराष्ट्रात असणारे बहुसंख्य दर्गेही नाथपंथीय सिद्धांची समधिस्थाने आहेत आणि म्हणूनच ह्या दर्ग्यांमधून मुस्लिम धर्मियांइतकीच हिंदू बांधवांची गर्दी असते. जे काही असो. परमेश्वराजवळ धर्माचा भेदभाव नाही, संतांजवळ नाहीच नाही. तसा तो त्यांच्या भक्तांजवळही असू नये हीच अपेक्षा ठेवून हा लेख पूर्ण करतो. श्री साईबाबांचीही हीच शिकवण आहे.

---

# अग्नि : देवांचा दूत

– वि. सा. जाजू
भिंगार.

**शिरडी येथे असलेली श्री साईबाबांची अखंड धूनी मानव जातीच्या जीवनातील पूजेचे महत्व कथन करणारी आहे. अग्निचे अनन्यसाधारण महत्व लक्षात घेऊन त्याविषयी देवत्वभावाने प्राचीनकाळी ऋषीमुनींनी अनेक सूक्ते–ऋचा रचलेल्या आहेत. अग्निहोत्री वि. सा. जाजू यांनी कथन केलेले अग्निमहात्म्य....**

अनेकदा जीवनातील अडचणींचे वेळी आपण मेटाकुटीस येतो. समोर असलेल्या बिकट प्रश्नाची सोडवणूक करण्यासाठी आपली साधनसंपत्ती, बल, बुद्धि, नियोजन कमी पडलेले असते व समोरचा प्रश्न मोठी डोकेदुखी बनून आव्हान स्वरूपात आपणासमोर उभा असतो, आणि सहाजिकच आपण मेटाकुटीस आलेलो असतो.

अशा विवंचनेत आपण विचारमग्न विमनस्क अवस्थेत असतांना सहजच मनात येऊन जाते की आम्हालाही कोणी 'गॉडफादर' असता तर किती बरे झाले असते ?

दैवगतीने ज्यांचे काही वशिले वरपर्यंत असतात किंवा कोणी धनवान नातेवाईक ज्यांचे पाठीशी असतो किंवा कोणी खरा वजनदार समाजसेवक ज्यांना मार्गदर्शक आणि मदतनीस म्हणून लाभलेला असतो, अशा मंडळींनी 'गॉडफादर' ही संकल्पना जन्मास घातलेली असते. अशा मंडळीकडे पाहूनच इतरजण म्हणत असतात की 'त्यांना काय काळजी बुवा, त्यांचे अमुक अमुक गॉडफादर आहेत ना त्यांच्या अडचणी दूर करून त्यांचा मार्ग सुकर करायला'. एकंदरित **'गॉडफादर'** म्हणजे जीवनात येणाऱ्या आपल्या अडचणी दूर करून जीवन सुखमय सुकर करणारे एक चालते बोलते वजनदार साधन.

सर्वसामान्यांस ज्यांना दैवाने कोणी गॉडफादर लाभलेला नसतो, त्यांना त्याबद्दल कधीमधी किमान चुटपुटतरी लागलेली असते.

लौकिककार्याने ज्याचा लोकसंग्रह जास्त, ज्याचे संपर्क वर्तुळ मोठे त्याची प्रतिष्ठा मोठी असे गणित असते. लोकसंग्रह किंवा संपर्क कमी जास्त असण्याचे प्रमाणावर व्यक्तीच्या प्रतिष्ठेची पातळी ठरत असते. हे सहाजिक आहे. आपले जीवनातून आपला लोकसंग्रह व त्यानुसार असणारा संपर्क वजा केला तर कल्पना करावी. जीवन अगदी पोकळ व मिळमिळीत होऊन जाईल. लग्नकार्याचे किंवा इतर शुभकार्याचे वेळी आपणास याची जाणीव होते. शुभकार्याची निमंत्रणे ज्यांना पाठवायची त्यांच्या झाडून गाववार याद्या केल्या जातात. यादीत कोणाचे नाव चुकून राहून तर गेले नाही ना याची वारंवार खात्री करून घेतली जाते. या याद्यांमध्ये, मित्रांची, नातेवाईकांची यादी असते, व्यावसायिक संबंध असणारांची यादी असते, सामाजिक, राजकीय संबंध असणाऱ्यांच्या याद्या असतात. याबाबतीत आपण जाणीवपूर्वक चोखंदळ असतो.

या याद्यांमध्ये ज्यांची नावे असतात त्यांचेशी आपले संबंध जीवंत रहावेत म्हणूनही आपली नेहमी धडपड असते. त्यासाठी पत्रव्यवहार, भेटीगाठी, येणे-जाणे चालू ठेवतो. हा जीवनाचा एक अविभाज्य भागच बनून जातो.

या याद्यांमध्ये आपण एका व्यक्तीचे नाव घालण्यास विसरलेले असतो. ही व्यक्ती इतर सर्व व्यक्तींपेक्षा अगदी वेगळी असते. सदरची व्यक्ती परमपित्या परमेश्वराचा प्रतिनिधी म्हणून भूतलावर नियुक्त झालेली असते. या व्यक्तीचे नाव आहे 'अग्नि'. तसे पाहिले तर आपण अग्नीस विसरलेलो असतो. कारण आपल्या लोकसंग्रहातील इतर व्यक्ती, परिवार यांचेशी आपला संपर्क जीवंत ठेवण्यासाठी आपण जी काही धडपड करतो तशी काही धडपड अग्नीचा संपर्क जागृत ठेवण्यासाठी आपण जाणीवपूर्वक करीत नसतो.

अग्निस परमपित्या परमेश्वराने आपला दूत म्हणून पाठवले व त्यास सूचना दिल्या की 'मानवामध्ये व माझ्यामध्ये तू दुवा बनून रहा. मानवाच्या हाकेस प्रतिसाद देऊन त्यांचे कल्याण कर'. त्याचवेळी मानवासही सूचित केले की 'अग्नी या माझ्या भूतलावरील दूताशी घनिष्ठ मैत्री ठेवून तुम्ही आपले सर्वप्रकारे कल्याण करून घ्या'. वेदमंत्राचे आशय याप्रमाणे आहेत.

आपले मित्र, सगे, सोयरे, नातेवाईक यांचेशी आपले संबंध आपल्या व समोरच्यांच्या कामक्रोध लोभादि षडरिपु व अहंकार यावर आधारलेले असतात. 'तुम्ही बरे तर आम्ही बरे' असा व्यवहार त्यात असतो. त्यांच्या आपल्या प्रेमाच्या स्तरात चढउतार येण्याची शक्यता असते. पण अग्निशी आपला असणारा संबंध हा प्रेमाचा आणि फक्त प्रेमाचाच संबंध असतो. प्रेम !

(पृष्ठ क्र. २० वर)

बोधकथा

# परमात्म्याचे साधन बना

**हल्लीच्या काळात सद्‌गुण आणि सद्‌वर्तन दोन्हीही फार दुर्लभ होत चालले आहेत. आणि ज्यांच्याकडून ते केले जाते तेसुद्धा एखादा विशिष्ट हेतु मनात ठेऊन अथवा फळाच्या अपेक्षेने केले जाते. या संदर्भात खालील बोधकथा आपल्याला बरच काही सांगून जाईल.**

गौतम बुद्धांचा एक मोठा अनुयायी 'बोधिधर्म' चीनला गेला. चीनचा सम्राट त्याचे स्वागत करायला आला. स्वागत केल्यानंतर तो बोधिधर्माला म्हणाला, 'मी हजारो बुद्धविहार बनवले. वाटसरूंना विश्रांती आणि सावली मिळावी म्हणून लाखो दाट वृक्ष रस्त्यावर लावले. अनेक भोजनालये उघडली ज्यांत हजारो लोक विनामूल्य जेवतात. शाळा उघडल्या. आश्रम बनवले. हजारो शास्त्रं छापली, वाटली.... या साऱ्याचे शेवटी फळ काय असेल ?

बोधिधर्माने त्याच्याकडे शांतपणे पाहिले आणि म्हणाला, 'क्षमा असावी सम्राट ! पण आपण सरळ नरकांत जाल !' सम्राट चमकला ! अशी गोष्ट ते बोलतील हे त्याला अपेक्षित नव्हते. 'एवढी पूण्यकर्मे करून मी नरकांत जाईन ? हे कसं शक्य आहे ?'

बोधिधर्म म्हणाला, 'तुम्ही काय केलं, यानं कुणी नरकांत किंवा स्वर्गात जात नाही. तुम्ही काय केलं याची तुम्ही चर्चा करू नका. तुम्ही केलं, बस्, इतकच् पूरेसं आहे. तुम्ही म्हणालात तुम्ही बनवले ! परमात्म्यानं तुमच्या अंतर्यामातून काही नाही केलं, तुम्ही केलं ! तुम्ही साधन नाही बनला. तुम्ही त्याचे हात नाही बनला, तुम्ही आपल्या अहंपणाने वेढून गेलात. तुम्ही नरकांत जाल.'

चीनी सम्राटाला काही ते पटले नाही. कारण आजवर जे जे भिक्षू आले त्यांनी त्याला असे काही सांगितले नव्हते. त्या साऱ्यांनी हेच समजावले होते की पूण्य करा, दान करा तर हजारो-लाखो पटीने जास्त मिळेल. तो म्हणाला, 'स्वर्ग-नरकाच्या गोष्टी सोड. कारण तो तुही पाहून आला नाहीस की मीसुद्धा पाहिला नाही. मला फक्त एवढंच सांग की मी जे केलं ते पवित्र तरी आहे का नाही ?'

बोधिधर्म म्हणाला, 'पवित्र ! याहून जास्त अपवित्र अजून काय असेल ? कारण तुम्ही काय केलं याचा कुठलाही संबंध नाही आहे. 'तुम्ही' केलं. मग ते पवित्र नाही राहीलं. 'त्यानं' केलं. पवित्र झालं.'

बोधिधर्माचे हे उत्तर ऐकून सम्राटाचे डोळे उघडले आणि तो विनयाने नतमस्तक झाला.

कोणतीही चांगली गोष्ट करताना परमात्म्याचे साधन बना. त्याचे हात बना. फळाची इच्छा करू नका आणि आपला अहंपणा सोडून दया.

– विनीत भोईर
पाचपाखाडी, ठाणे
यांचे संग्रहातून

---

# भावमंदिरी

**माझ्या भावमंदिरात
चालू पूजन मनांचे
कधी साक्षात्कारे त्यांच्या
देह ब्रह्मानंदी नाचे ।**

**सगुणांचे नंदादीप
माझ्या भोवती तेवती
स्नेहज्योतीनं तयांच्या
वृत्ती साऱ्या तेजाळती ।**

**निळ्या अनंताची छाया
उतरते माझ्या नेत्री
आणि गात्रागात्रांतून
झरे भक्तीची गंगोत्री ।**

**देव्हाऱ्यातील तरीही
मूर्ती भंगल्या न कधी
ओतीन मी त्यांच्या पदीं
जीवनाचा तेजोनिधी**

**त्यांच्या गुणविशेषानें
माझे जीवन भारले
छंदोमय होऊनिया
मनोभाव झंकारले ।**

**– शरद गणेश अत्रे
पुणे.**

# साईभक्तांचे अनुभव

**शरण मज आला आणि वाया गेला**
**दाखवा दाखवा ऐसा कोणी**

**ही** उक्ती माझ्याबाबतीत अगदी सार्थ ठरली. मी पहिल्यापासूनच साईबाबांची भक्त आहे. त्यांच्यावर माझी श्रद्धा आहे. प्रत्येक संकटातून त्यांनीच मला तारले आहे, व यावेळी तर फार मोठ्या अडचणीतून त्यांनी मला सुखरूप सोडविले.

मी गरोदर असताना मला प्रत्येक महिन्यात थोडे थोडे ब्लिडींग व्हायचे. फक्त तिसऱ्या व चवथ्या महिन्यातच झाले नाही पण दूसऱ्या महिन्यात ब्लिडींग झाल्यावर मी डॉक्टरकडे गेले. डॉक्टरांनी मला प्रवासही करण्यास मनाई केली होती पण मला तेही जमले नाही. त्यामुळे पाचव्या महिन्यात मला थोडे जास्त ब्लिडींग झाले व मला हॉस्पिटलमध्ये हलवावे लागले. दोन दिवस हॉस्पिटलमध्ये रहावे लागल्यानंतर पून्हा डॉक्टरांनी बेडरेस्ट घेण्यास सांगितले. तरीही एका जवळच्या नात्याच्या लग्नात मला थोडी दगदग झाली व ७ व्या महिन्याच्या शेवटी मला पून्हा खूपच ब्लिडींग व्हायला लागले. लगेच हॉस्पिटलमध्ये ॲडमिट झाले. ५ दिवस हॉस्पिटलमध्ये होते. मनात प्रत्येकवेळी साईबाबांचा धावा करतच होते. त्याला म्हटले देवा, यातून मला तार तरी, नाहीतर मार तरी. झाले, हॉस्पिटलमधून घरी आल्यावर थोडे थोडे ब्लिडींग चालूच होते. पूर्ण थांबतच नव्हते. मग एक दिवशी तर इतके झाले की मला उभे राहणे ही कठीण झाले. लगेच पून्हा हॉस्पिटलला ॲडमिट झाल्यावर दोन दिवसांनी मला कळाही यायला सुरुवात झाली. मग मात्र डॉक्टरांनी निर्णय घेतला की माझे सीझरीन करावे लागेल. मुख्य अडचण ही होती की मला त्यावेळेस आठवा महिना चालू होता व सगळेजण म्हणतात की आठव्या महिन्यातील मूल जगत नाही. म्हणून मी तर मनातून घाबरूनच गेले होते.

मी डॉक्टरांना वारंवार विचारायचे 'डॉक्टर, माझे मूल जगेल ना.' त्यांनी मला थोडी आशा दाखवली होती. नंतर माझे ऑपरेशन झाले, मला मुलगी झाली. ती खूपच नाजूक होती. तिला तीन दिवस लाईटवर ठेवले होते. आता ती अगदी व्यवस्थित आहे.

साईबाबांच्या कृपेनेच माझी मुलगी सुखरूप माझ्या पदरात पडली.

खरंच म्हणतात ना.

**देव तारी, त्याला कोण मारी ।** याचीच मला प्रचिती आली.

**– सौ. प्रिया साने**
ठाणे.

---

**मी** एका खाजगी शाळेमध्ये पूर्व प्राथमिक शिक्षिका म्हणून आठ वर्ष नोकरी केली. २९ एप्रिल हा शाळेचा शेवटचा दिवस. नेहमीप्रमाणे कामकाज आटपून मी मुख्याध्यापक सरांना भेटण्यास गेले. सरांशी बोलणे झाल्यावर त्यांनी मला आश्चर्याचा धक्का दिला की तुम्ही जून महिन्यापासून शाळेत येऊ नका. मला फार वाईट वाटले. काही करावे सुचेना. माझ्या हातून अशी कोणती चूक झाली ते मला समजेना.

मी ऑफीसमधून बाहेर पडले. संध्याकाळी बाबांजवळ दिवा लावला. बाबांना सकाळी जे शाळेत घडले याबद्दल सांगितले. ''बाबा माझी काही चूक नसताना मला कामावरून कमी केले. ह्याविषयी तुम्हीच काय तो निवाडा करा. तुम्ही सर्व जाणता.'' ह्या झालेल्या घटनेबद्दल मी घरामध्ये काहीच बोलले नाही. मला विश्वास होता की बाबा ह्यातून मार्ग काढणार. आणि अगदी तसेच झाले बरोबर एक महिन्याने म्हणजे गुरूवार, १ जून रोजी माझ्या मैत्रिणीचा मला फोन आला, सरांनी तुला ४ जूनला शाळेत पुन्हा कामावर बोलावले आहे. ते ऐकून मला अतिशय आनंद झाला.

खरोखरच बाबांना आपल्या भक्तांविषयी किती काळजी.

धन्य ती साईमाऊली !

**– सौ. गीता मटकर**
कुर्ला (पश्चिम), मुंबई.

---

(पृष्ठ क्र. १८ वरून)

निखळ प्रेम ! रागद्वेष अहंकारविरहित प्रेम ! परमपित्या परमेश्वराचे सांगणे आहे की 'अग्नि या माझ्या श्रेष्ठ दूताशी मैत्री घनिष्ठ ठेवा आणि आपल्या सर्व अडचणी दूर करून घ्या.'

अशा या श्रेष्ठ अग्निदूताशी घनिष्ठ मैत्री कशी साधायची ? ती साधण्याची युक्तिही वेदांनी सांगितलेली आहे. ती आहे 'अग्निहोत्र'. गायीच्या तुपाने माखलेल्या अक्षत् तांदुळाच्या सूर्योदय सूर्यास्ताचे ठीक स्थानिक समयी. गायीच्या गोवऱ्यांच्या अग्निमध्ये पिरॅमिड आकाराचे विशिष्ट मापाचे अग्निपात्रांत विशिष्ट मंत्रोच्चारणासह दररोज नित्य दोन आहुत्या देणे म्हणजे अग्निहोत्र होय. अडाण्यांत अडाणी व गरीबात गरीबही हे सहज करू शकतो.

बस्स ! सकाळी १०-१५ मिनिटे व सायंकाळी १०-१५ मिनिटे लागतात. श्रेष्ठ अशा अग्निदूताशी आपली मैत्री घनिष्ट ठेवण्यासाठी एवढा वेळ निर्धाराने बाजूला काढून अग्निहोम नित्याचरण सुरू केल्यास अग्निशी उचित स्तरावर जवळीक साधली जाते. परमपित्या परमेश्वराचाच दूत, तोही आम्हास मदत करण्यास पाठविलेला म्हटल्यावर आपल्या कसल्याही आधिभौतिक, आधिदैविक व आध्यात्मिक अडीअडचणी, प्रेमाने, श्रद्धेने व हक्काने त्यांच्याकडे सांगण्यास हरकत नाही. आणि मग अनुभव येईल की आमचाही 'गॉडफादर' आहे. अग्नि ! असला श्रेष्ठ गॉडफादर असल्यावर लौकिक जीवनात इतर कोणाकडे आम्ही काय म्हणून काही मदतीची मागणी करावी ? याचाही अनुभव हळूहळू येईल. हा अग्निदूत संकटावर मात करण्याचे श्रेष्ठ धैर्य देईल. म्हणजे संकट दूर केल्यासारखेच आहे. मग कसल्याही संकटाने मेटाकुटीस येणे वगैरे आमचे जीवनात असणार नाही आणि साहजिकच जीवन जास्त सुखमय शांती समाधानाचे होईल.

---

## जाणतेनि गुरु भजिजे । तेणे कृतकार्या होईजे ।

# ज्ञानेश्वरांची गुरूभक्ती

– विद्याधर ताठे

**कै. गो. र. दाभोळकरकृत श्री साईसच्चरित म्हणजे गुरुचरित्रच आहे. श्री साईबाबांच्या श्रीकृपेचेच ते फल आहे असे त्याबद्दल दाभोळकरांनी म्हटलेले आहे. गुरु करण्याची गरजच काय ? असे म्हणणाऱ्या दाभोळकरांची श्री साईबाबांची भेट होते व दृष्टीभेटीतच ते बाबांना गुरू मानू लागतात. पुढे सद्‌गुरूवाचून तरणोपाय नाही हे त्यांच्या लक्षात येते आणि ते बाबांना श्री सद्‌गुरूसाईनाथ महाराज असे संबोधू लागतात.**

**भारतीय संस्कृतीत गुरूसंस्थेला विशेष महत्त्वाचे स्थान आहे. आई-वडिलानंतर सर्वात मोठा मान गुरूला दिला जातो. अनेक शिष्य स्वत:ऐवजी गुरूचे नाव लावूनच कार्य करतात. संत ज्ञानदेवांनीही असे स्वत:स 'निवृत्तीनाथदास' असे म्हटले आहे. अशा गुरूरूप झालेल्या ज्ञानदेवांनी गायलेले हे गुरुमहात्म्य साईभक्तांना निश्चितच उद्‌बोधक वाटेल.**

कुटुंबसंस्था हे जसे भारतीय संस्कृतीचे एक खास वैशिष्ट्य आहे तसे ''गुरूसंस्था'' हेही एक महत्वपूर्ण वैशिष्ट्य आहे. जन्मदात्या माता-पित्यानंतर भारतीय समाजात आदराचे स्थान दिले जाते ते गुरू-आचार्य यांना ! मातृदेवो भव !, पितृदेवो भव !, याप्रमाणे आचार्य देवो भव ! असे गुरुजनांना देवासारखे वंदनीय स्थान या संस्कृतीने दिलेले आहे. एवढेच नव्हे तर -

**गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णु:**
**गुरुर्देवो महेश्वर: ।**
**गुरु: साक्षात् परब्रह्म**
**तस्मै श्री गुरवे नम: ॥**

असे गुरूला ब्रह्मा-विष्णु-महेश यांचे म्हणजेच जन्मदात्या, पालनकर्त्या आणि मोक्षदात्या महाशक्तीच्या रूपात वंदन केले आहे.

''गुरूसंस्था'' ही भारतीय संस्कृतीतील एक अतिप्राचीन अशी गौरवशाली परंपरा आहे. वैदिक काळात ही गुरूसंस्था 'गुरुकुल'रूपात अध्ययन-अध्यापनरत होती. गुरूला आध्यात्मिक पिता समजले जात असे. ८ व्या वर्षी व्रतबंध उपनयन संस्कार करून मुलांना शिक्षणासाठी गुरूकुलात पाठविले जाई. विशेष म्हणजे मुलांप्रमाणे मुलींचेही उपनयन करून तिलाही गुरूकुलात पाठविले जात असे. सुमारे १२ वर्षे म्हणजे एक तप हे विद्यार्थी गुरुकुलात गुरूपाशी राहून विविध प्रकारच्या ज्ञानशाखांचे अध्ययन करीत. लेखन-वाचनापेक्षा पाठांतर पद्धतीने येथील अध्ययन अध्यापन होत असे.

या गुरुकुल परंपरेत भौतिक सुखसमृद्धीच्या ज्ञानापेक्षा आध्यात्मिक जीवनपूर्तीविषयक ज्ञानाला अधिक महत्व असे. हाच दृष्टिकोन शिक्षणविषयक आखणी व पद्धतीमध्ये असे. प्राचीन भारतीय ज्ञान, कला आणि साहित्य विचारांचा विकास प्रामुख्याने या गुरुकुल परंपरेतूनच झालेला आहे. या परंपरेत गुरू-शिष्य संबंध असा दृढमूल होत असे की अनेक शिष्य पित्याच्याऐवजी गुरुचे नाव लावीत. तेराव्या शतकातील संत ज्ञानदेवांचे अध्ययन गुरुकुलात झाले नाही तरीपण त्यांनी 'निवृत्तीदासू' असे नाव धारण करून भारतीय प्राचीन परंपरेतून चालत आलेला गुरूभाव पाईकाच्या भूमिकेतून व्यक्त केला आहे असे दिसते.

## ज्ञानदेवांची गुरूपरंपरा

ज्ञानदेवांचे चरित्र व कार्य जसे अलौकिक आहे तसाच त्यांचा गुरूभावही अनन्यसाधारण आहे. 'ज्ञानदेवे रचिला पाया' असे वारकरी संप्रदायामध्ये ज्ञानदेवांचे स्थान असले तरी त्यांची गुरूपरंपरा नाथपंथाची आहे हे लक्षात घेण्यासारखे आहे. आपल्या गुरूपरंपरेबद्दल ज्ञानदेवीच्या १८ व्या अध्यायात ज्ञानदेवांनी मोठ्या जिव्हाळ्याने काही ओव्या लिहिल्या आहेत. **''आदि गुरु शंकरा । लागोनि शिष्यपरंपरा । बोधाचा हा संसरा । जाला तो आमृते ॥''** अशी श्रीगुरू शंकरापासून आपली गुरूपरंपरा सुरु झाल्याचे ज्ञानदेव सांगतात. शिवाकडून अद्वयानंद वैभव प्राप्त झाले व पुढे तेच ज्ञान मत्स्येंद्रनाथांकडून सप्तश्रृंग गडावरील अवयवहीन अशा चौरंगीनाथांना आणि श्रीगोरक्षनाथांना मिळाले. गोरक्षनाथांचा गहिनीनाथांना अनुग्रह लाभला आणि गहिनीनाथाकडून हे बोधरहस्य निवृत्तिनाथांनी आकळले. निवृत्तिनाथांनी हे अद्वयानंद वैभव सप्रभव ज्ञान शिष्य ज्ञानदेवांना देऊन कलियुगग्रस्त असा प्राणिमात्राच्या कल्याणार्थ या ज्ञानाचा प्रसार करण्यास सांगितले. (अधिक माहितीसाठी जिज्ञासूंनी ज्ञानदेवीतील अध्याय १८ मधील १७५२ ते १७६० क्रमांकाच्या ओव्या पाहाव्यात)

ज्ञानदेवी प्रमाणेच अभंग रचनेद्वारेही ज्ञानदेवांनी आपल्या या गुरुपरंपरेबद्दल निवेदन केलेले आहे. तो अभंग पुढीलप्रमाणे -

**आदिनाथे बीज सांगितले कानीं ।**
**सोहं हे शिराणी कैवल्याची ।**

(ज्ञा. प्रभावळ, पान ४०२/४७)

ज्ञानदेवांची गुरूपरंपरा नाथपंथाची शिवोपासक तर वारकरी संप्रदाय एकविध विठ्ठलभक्तीचा म्हणजेच विष्णूचा उपासक. असा काहीजणांना वरवर भेद वाटतो - विरोध दिसतो. पण वारकरी संप्रदाय हा केवळ विष्णूचाच नव्हे तर शिव व विष्णूच्या ऐक्याचा-समन्वयाचा उपासक आहे. गुरू निवृत्तिनाथांचा **'आदिनाथ उमाबीज प्रकटले। मच्छिंद्रा लाधले सहजस्थिती।** हा अभंग पाहिला म्हणजे वर वाटणारा भेद-विरोध पूर्णपणे मावळून जातो. या अभंगातील शेवटच्या चरणात निवृत्तिनाथ म्हणतात -

**निवृत्ति गयनी कृपा केली पूर्ण।**
**कुळ हे पावन कृष्णनामे ॥**

म्हणजे निवृत्तिनाथांना लाभलेला गुरूउपदेश कृष्णनाम वाचक होता हे स्पष्ट होते. कृष्ण हा विष्णुभगवंताचा अवतार. कृष्ण म्हणजेच पंढरीचा पांडुरंग।

**श्रीगुरू निवृत्तिराजे**
**मार्ग दाविला सोज्वळ।**
**बापरखुमादेविवर विठ्ठल**
**दिनाचा दयाळ ॥**

हा ज्ञानदेवांचा अभंग गुरू निवृत्तिनाथांनी त्यांना विठ्ठल भक्तीचा सोज्वळ मार्ग दाखविला असे स्पष्टपणे दर्शवितो. याद्दष्टीने निवृत्तिनाथांचा 'निवृत्तीचे गुज विठ्ठल सहज। गयनीराजे मज सांगितले।' हा अभंगही उपरिनिर्दीष्ट भेदाचे योग्य निराकरण करणारा आहे.

## भक्तिप्रेमाची 'प्रेममुद्रा'

ज्ञानदेवांच्या गुरूपरंपरेबद्दल आणखी एक मुद्दा चर्चिला जातो. तो म्हणजे - नाथपंथ हा केवळ योगमार्गाचा पुरस्कार करणारा असून त्यात भक्तिमार्गास स्थान नाही. पण हा नाथलिलामृतासारख्या ग्रंथावरून काढण्यात येणारा निष्कर्ष फारसा योग्य वाटत नाही. निवृत्तिनाथांच्या 'आदिनाथ उभा बीज प्रगटले।' या अभंगामध्ये त्यांनी केवळ गुरूपरंपरेची नामावली दिलेली नसून कोणत्या साधनमार्गाने ही परंपरा चालत आली तेही स्पष्टपणे विशद केलेले आहे. या अभंगातील दुसरा चरण -

**''तेचि प्रेममुद्रा गोरक्षा रिधली।**
**पूर्ण कृपा केली गयनीनाथा॥''**

या दृष्टीने चिंतन करण्यासारखा आहे. या चरणातील **'प्रेममुद्रा'** हा शब्द गुरूपरंपरेतील साधनमार्गाचा निर्देश करणारा आहे. योगमार्गातील योगमुद्रेपेक्षा ही प्रेममुद्रा वेगळी आहे. ही प्रेममुद्रा म्हणजेच भक्तिप्रेम होय. ज्ञानदेवीमध्ये ज्ञानेश्वरांनी गुरूपरंपरेविषयी ज्या ओव्या लिहिल्या आहेत, त्यातही 'मुद्रा' शब्द योजिलेला आहे. ''ते **'मुद्रा' श्रीगोरक्षयाचा। दिधली मीनी॥''** (ज्ञा. १८:१७५५). या मुद्रा शब्दाचा ज्ञानदेवांच्या ओवीतील अर्थ 'अव्यत्यया समाधी' असा आहे. योगमार्गातील समाधी ही विशिष्ट कालापुरती असते. अव्यत्यया समाधी भक्तिप्रेमातच लाभू शकते. गुरूपरंपरेविषयी एका ओवीत ज्ञानेश्वरांनी ''**एवं गुरूक्रमे लाधले। समाधिधन जे आपुले। ते ग्रंथे बांधोनि दिधले। गोसायी मज॥**'' गुरूंनी या ग्रंथात मला प्रेमसमाधीधन बांधून दिले असे म्हटले आहे. यावरून ज्ञानदेवांची गुरूपरंपरा केवळ योगमार्गी नव्हती तर भक्तिप्रेमाचाही मार्ग त्या परंपरेत अनुस्यूत होता असे दिसते.

## माऊलीचे मोठेपण

**'महाविष्णूचा अवतार। सखा माझा ज्ञानेश्वर॥''**, **''ज्ञानराज माझी योग्याची माऊली।''**, **''ज्ञानियाचा राजा गुरू महाराव।''** असा शब्दसुमनांनी मोठ्या पूज्यभावाने ज्ञानदेवांचा संतसांगात्यांनी गुणगौरव केला आहे. कोणत्याही ऋषीस, मुनीस, आचार्यास, तत्त्वज्ञान्यास, भाष्यकारास लाभले नाही असे 'माऊली'चे जिव्हाळ्याचे स्थान ज्ञानदेवांना लाभले. ज्ञानदेवांची प्रज्ञा, त्यांची प्रतिभा आणि त्यांचा विनयभाव यांना साहित्यात उपमाच नाही. अगदी प्रयत्नपूर्वक उपमा द्यायचीच ठरविले तर त्यासाठी ज्ञानदेवीतील त्यांचीच विशेषणे द्यावी लागतात.

ज्ञानेश्वरी-ज्ञानदेवी ही त्यांची वाङ्मयमूर्ती. त्यांच्या प्रज्ञेची, प्रतिभेची, करूणेची एक अक्षर साक्ष. सकळ कौतुकाचे जन्मस्थान विवेकतरूचे अभिनव उद्यान. सर्व सुखाची आदि. प्रमेय महानिधी. नवरससुधाब्धि. खरं तर गीता-गौरवार्थ ज्ञानदेवांनी हे विशेषणालंकार वापरले आणि हीच विशेषणे त्यांच्या ज्ञानदेवीलाही सार्थ ठरणारी आहेत. ज्ञानदेवीचे श्रेष्ठत्व यापरते काय असू शकते. पण एवढा अनुपम-अद्वितीय ग्रंथ लिहूनही या रचनेचे सारे श्रेय प्रज्ञाभास्कर ज्ञानदेवांनी स्वत:कडे न घेता आपले गुरू निवृत्तिनाथ यांना दिले आहे. ऐसे निवृत्तिनाथाचे। गौरव आहे जी साचे। ग्रंथू नव्हे हे कृपेचे। वैभव तिथे॥ असे १८ व्या अध्यायात ज्ञानदेवांनी 'ज्ञानदेवी' म्हणजे गुरूकृपेचे वैभव आहे असा स्पष्ट निर्वाळा दिला आहे. तो त्यांच्या गुरूभावाचे दर्शन घडविणारा आहे.

ज्ञानदेवांचा गुरूभाव त्यांच्या प्रज्ञा व प्रतिभेसारखाच विलक्षण आहे. क्वचितच असा गुरूभाव अन्य साहित्यविश्वात सापडू शकतो. ज्ञानदेवीच्या एकूण १८ अध्यायांपैकी ४-५ अध्याय सोडले तर प्रत्येक अध्यायात ज्ञानदेवांनी आपल्या गुरूंबद्दल गौरवाने काही ओव्या लिहिलेल्या आहेत. गीतेच्या १३ व्या अध्यायातील एका श्लोकात **'आचार्योपास्ति'** अशी केवळ ४ अक्षरे आली आणि ज्ञानदेवांच्या गुरूभावाला असे उधाण आले की ज्ञानदेवीत त्यांनी या ४ अक्षरांवर तब्बल ९० ओव्यांची रचना केलेली आहे. ज्ञानदेवीत ठिकठिकाणी आढळणारा ज्ञानदेवांचा असीम गुरूभाव पाहून ज्ञानदेवी म्हणजे गुरूगौरव ग्रंथ आहे असे वाटते.

## गुरूभक्तीचे विलोभनीय इंद्रधनु

श्रीगुरूस्मरण, सद्‌गुरूगुणगौरव, गुरूपूजा, गुरूमहिमा, गुरूकृपादृष्टी, गुरूस्वरूप, गुरूसामर्थ्य, गुरूस्तोत्र, गुरूजयजयकार, गुरूदास्य, गुरूसेवा आणि